14-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SSP/ 10:30

14-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SSP/ SBT/ MHM/ 10:30

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**मुंबईत झालेल्या बाम्बस्फोटासंबंधी पश्चिम बंगाल विधानसभेचा शोक संदेश**

**सभापती** : मुंबईमध्ये दिनांक 11 जुलै,2006 रोजी झालेल्या बाम्बस्फोटांची पश्चिम बंगाल विधानसभेने दखल घेऊन या अमानुष घटनेबद्दल दिनांक 12 जुलै,2006 रोजीच्या बैठकीत तीव्र दु:ख व्यक्त करुन मृत्यूंच्या कुटुंबियांचे सांत्वन करणारा ठराव पारित केला आहे व हा संदेश मृतांच्या कुटुंबियांपर्यन्त पोहचविण्याची विनंती माननीय अध्यक्ष, पश्चिम बंगाल विधानसभा यांनी केली आहे. प्रसारमाध्यमांनी याची नोंद घेऊन यथोचित प्रसिध्दी द्यावी.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबई मधील फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये चालणाऱ्या वेश्या व्यवसायाविरुध्द**
**मुंबई पोलीसांनी तीन बड्या हॉटेलमध्ये धाडी टाकून**
**८ वेश्यासह ४ दलालांना अटक केल्याबाबत**

**(१) * १७५७६ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मधील फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये चालणाऱ्या वेश्या व्यवसायाविरुध्द मुंबई पोलीसांनी एप्रिल २००६ रोजीच्या शेवटच्या आठवड्यात तीन बड्या हॉटेलमध्ये धाडी टाकून ८ वेश्यासह ४ दलालांना अटक करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई मध्ये आणखी किती फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये सदर प्रकरणाबाबत धाडी टाकण्यात आल्या व त्या धाडीमध्ये अटक करण्यात आलेल्यांवर तसेच हॉटेल मालकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) या कलावधीत तारांकित दोन हॉटेलमध्ये धाडी घालून पाच वेश्या व पाच दलाल यांना अटक करण्यात आली व एका तारांकित हॉटेलच्या पुढे उभ्या असलेल्या एका टॅक्सीमधील दोन वेश्या व दोन दलालांना अटक करण्यात आली आहे.
(२) वरील कारवाईनंतर आणखी दोन मोठ्या हॉटेलवर धाडी घालून चार वेश्या व तीन दलालांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींविरुध्द अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, उत्तरामध्ये आपल्या अनुमतीने मला थोडीशी दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या उत्तरामध्ये आपण "हॉटेलमध्ये धाडी घालून"ऐवजी "हॉटेलमध्ये सापळा रचून " असे वाचावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ज्या वेश्यांना व दलालांना अटक करण्यात आली, त्या तीन तारांकित व दोन मोठया हॉटेलांची नांवे काय ? या हॉटेलमध्येच असा प्रकार झाल्यामुळे आपण त्या हॉटेल मालकांवर कोणती कारवाई केली ? व अशा हॉटेल्सचा आपण परवाना रद्द केला का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..३....

ता.प्र.क्र.१७५७६....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण ५ हॉटेलमध्ये सापळा रचून वेश्यांना आणि दलालांना अटक करण्यात आली. ती पांच हॉटेलची नांवे पुढील प्रमाणे आहेत. १) बाबा इंटरनॅशनल हॉटेल, २) ग्रॅण्ड हयात हॉटेल, ३) ॲम्बॅसेडर हॉटेल, अंधेरी, ४) जे.डब्ल्यू मेरिएट हॉटेल, सांताक्रूझ, व ५) बावा कॉन्टीनेनटल हॉटेल. या पाच हॉटेलमध्ये पोलिसांनी सापळा रचून वेश्यांना, दलालांना व गुन्हेगारांना पकडून अटक केलेली आहे. या पाच हॉटेलपैकी बाबा इंटरनॅशनल हॉटेलचे लायसन्स रद्द करण्याचा प्रस्ताव पोलिसांनी पाठवलेला आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही कारवाई एप्रिल,२००६ मध्ये झाली आहे व या पाच हॉटेल्समध्ये पोलिसांनी सापळा रचून अटक केली. अशाच प्रकारच्या धाडी आपण अन्य हॉटेल्समध्ये टाकल्या काय ? व अशाच पध्दतीची सापळा रचून अटक करण्याची कार्यपध्दती अस्तित्वात आहे की बंद करण्यात आलेली आहे ? आपण पाच हॉटेल्सपैकी एका हॉटेलचे लायसन्स रद्द केले. अशा प्रकारे अन्य हॉटेल्सच्या बाबतीतही सापळा रचून कारवाई करण्याचे ठरले होत का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सापळा रचून धाडी टाकण्याचे सत्र पोलीस दल नेहमीच करीत असते. पोलीस दलाला माहिती मिळाल्यानुसार त्याप्रमाणे ते सापळा रचून त्या त्याठिकाणी कारवाई करीत असतात. अशा प्रकारची कारवाई ही निरंतर चालू राहणार आहे व ४ एप्रिल नंतर अशा प्रकारची माहिती कुठेही मिळालेली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये वेश्या व्यवसाय करण्याकरिता शासनातर्फे परवानगी देण्यात येते का ? असल्यास, अशा किती परवानग्या देण्यात आल्या ? तसेच डान्सबारच्या संदर्भात आणि पंचतारांकित हॉटेल्सच्या बाबतीत आपण वेगळेपण का निर्माण केलेले आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, वेश्या व्यवसायाच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची परवानगी देण्यात येत नाही.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र.17576 पुढे सुरु.............**</u>

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अतिशय प्रतिष्ठित व्यक्ति अशा प्रकारच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये जात असतात आणि त्या हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय सुरु आहे. एप्रिल 2006 मध्ये काही तारांकित हॉटेलवर धाड टाकण्यात आली व काही लोकांना व वेश्यांना रंगेहात पकडण्यात आले. परंतु, अद्याप या हॅाटेलवर कारवाई करण्यात आलेली नाही. रंगेहात पकडल्यानंतर आणि सर्व साक्षीपुरावे असतांना या हॉटेलवर कारवाई करण्यास विलंब का होत आहे ? छोटया हॉटेलवर किंवा लॉजवर धाडी टाकण्यात येतात व त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करण्यात येते. परंतु, अशा पंचतारांकित हॉटेलवर धाड टाकल्यानंतर व त्या ठिकाणी वेश्याव्यवसाय चालतो हे प्रथमदशर्नी लक्षात आल्यानंतरही त्यांच्यावर कारवाई होत नाही. पोलीस खात्याला माहिती असतांना त्यांच्या सहकार्याने आणि सल्लामसलतीने अशा प्रकारचे धंदे होत असतील तर त्या विभागातील पोलीस अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जी मोठी हॅाटेल्स आहेत त्या ठिकाणी वेश्याव्यवसाय होत नाही. या ठिकाणी वेश्या ठेवल्या जात नाहीत तर दलालांमार्फत संपर्क साधून मुलींना हॉटेलवर बोलाविले जाते. लहान हॉटेलवर धाडी टाकल्या जातात त्या ठिकाणी प्रत्यक्ष वेश्याव्यवसाय होत असतो. बावा इंटरनॅशनल या हॉटेलमध्ये सातत्याने हा प्रकार घडत असल्यामुळे या हॉटेलचे लायसन रद्द करण्याबाबत कारवाई करण्यात येत आहे.

डॅा.नीलम गो-हे : सभापती महोदय, संपूर्ण मुंबई शहरामध्ये वेश्या आणि बालवेश्या यांच्यासाठी बाहेरुन येण्यासाठी व जाण्यासाठीचे ट्रान्झिट पॉईंट म्हणून अनेक हॉटेलचा उपयोग केला जातो. आय.टी.पी.ॲक्टनुसार वेश्यांपेक्षा वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणे हा गुन्हा असतो. या कायद्याच्या कलम 14 (2) नुसार वेश्यांना पोहोचविणारा दलाल हा गुन्हेगार ठरतो. एवढेच नव्हे तर या कायद्यात जी नवीन दुरुस्ती झाली आहे त्यानुसार गि-हाईकांनाही गुन्हेगार ठरविता येते व त्यांना शिक्षा होऊ शकते. प्रत्येक वेळी जेंव्हा या विषयावर प्रश्न विचारला जातो त्यावेळी शासनाकडून असे उत्तर मिळते की, त्या ठिकाणी अमुक एवढया वेश्यांना पकडण्यात आले आहे. परंतु, या वेश्यांचे सॉलिसिटिंग कोण करीत होते ? हा प्रश्न नेहमीच अनुत्तरीत राहतो व या लोकांना शिक्षा होत नाही, हे लोक निर्दोष सुटतात. त्यामुळे अशी शंका निर्माण होते की,

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ SBT/

**<u>ता.प्र.क्र.17576 पुढे सुरु.............</u>**

डॉ.नीलम गो-हे..........

खंडणी वसूल करण्यासाठी धाडी टाकण्यात येत असाव्यात. माझा प्रश्न असा आहे की, या गुन्हयांसाठी विशेष न्यायालयांची स्थापना करुन कलम 22 (7) नुसार या केसेस लवकरात लवकर निकाली काढण्याची कार्यवाही शासनाकडून करण्यात येईल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तारांकित प्रश्नात विचारण्यात आलेल्या प्रकरणी पोलिसांना ज्यावेळी बातमी मिळाली त्यावेळी पोलिसांनी सापळा रचून व बोगस गि-हाईक पाठवून धाड टाकलेली आहे. त्यामुळे यामध्ये गि-हाईकांवर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. तथापि, सन्माननीय सदस्यांनी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याबाबतची जी सूचना केली आहे त्याबाबत निश्चित विचार करण्यात येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, बावा इंटरनॅशनलविषयी मागच्या अधिवेशनात ज्यावेळी प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी सन्माननीय सदस्या, श्रीमती संजीवनी रायकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला सन्माननीय मंत्रीमहोदयांनी हॉटेलवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. तथापि, अद्याप या हॉटेलवर कारवाई करण्यात आलेली नाही. आजही मंत्रीमहोदय हॉटेलवर कारवाई करण्यात येईल, असेच सांगत आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, सातत्याने असे घडणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बावा इंटरनॅशनल या हॉटेलमध्ये सातत्याने असे प्रकार घडत आहेत व त्यामुळे या हॉटेलचे लायसन्स रद्द करण्याबाबत कारवाई करण्यात येत आहे. पोलीस आयुक्तांकडे यासंदर्भातील सुनावणी झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्यावेळी जेंव्हा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी सन्माननीय, उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांनी दिलेल्या उत्तराची प्रत माझ्याकडे आहे. आणि 3 महिन्यानंतर पुन्हा याच हॉटेलवर धाड पडत आहे. केवळ या हॉटेलच्या पबचे लायसन्स रद्द करुन उपयोगी नाही.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ........ 10:40

**ता.प्र.क्र.17576** ..........

श्री.विनोद तावडे .........

वारंवार त्या हॉटेलमध्ये हे घडत आहे. दलालांना पकडले जाते, मुलींना पकडले जाते. परंतु पुन्हा हे चालूच असते. हे कायम स्वरुपी थांबविण्यासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ? आणि शासनाची तशी इच्छा आहे काय ? वारंवार एकाच हॉटेलमध्ये हे घडत आहे. ते कायम स्वरुपी बंद झाले पाहिजे. म्हणून माननीय मंत्री महोदय कायद्यातील कोणत्या कलमाचा वापर करणार आहात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बावा इंटरनॅशनल हॉटेलमध्ये वारंवार हे घडत आहे. म्हणून त्या हॉटेलचे लायसन्स रद्द करण्याची शिफारस केलेली आहे. हिअरिंग झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

**श्री.रमेश डिंगरे तत्कालीन उप अभियंता, सा.बां.उपविभाग पंढरपूर यांनी सन 2002 ते 2004 या कालावधीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(2) * 19267 श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) श्री.रमेश डिंगरे तत्कालीन उपअभियंता सा.बा.उपविभाग पंढरपूर यांनी सन 2002 ते 2004 या कालावधीत शाखा अभियंता व ठेकेदार यांना हाताशी धरुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कडक कारवाई करावी म्हणून तेथील नागरिकांनी ठेकेदारांनी, अधिक्षक, अभियंता, सा.बा.विभाग, सोलापूर व मुख्य अभियंता सा.बां.वि.पुणे यांच्याकडे अनेक तक्रारी केलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) ते (4) श्री.रमेश डिंगरे यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या एका तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, श्री.रमेश डिंगरे यांच्या विरुध्द कोणी तक्रार केली होती ? तक्रार केव्हा करण्यात आली ? तक्रारीचे स्वरुप काय होते ? आणि तक्रारीची चौकशी करणा-या अधिका-याचे नाव काय आहे ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, श्री.रमेश डिंगरे यांच्या विरुध्द निनावी तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची चौकशी मुख्य अभियंता, पुणे यांच्याकडे केली असता त्या चौकशीमध्ये तथ्य नव्हते असे आढळून आले आहे.

--------

....3/-

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील नाफ्ता व केरोसीन विक्रेत्यांनी केलेल्या करचोरीची चौकशी करणेबाबत**

**(3) * 17634 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री.सागर मेघे , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. श्रीकांत जोशी : तारांकित प्रश्न क्रमांक 14927 ला दिनांक 23 मार्च, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील नाफ्त व केरोसीनच्या ज्या सोळा विक्रेत्यावर विविध पोलीस स्थानकामध्ये एफ्.आय.आर्. दाखल करण्यात आलेले होते ते कोणकोणत्या तारखाना दाखल करण्यात आलेले आहेत,

(2) या सोळा व्यतिरिक्त आणखी किती विक्रेत्यांना अटक करण्यात आली आहे व करचोरीची एकूण रक्कम किती आहे,

(3) या व्यवहारात कोट्यावधी रुपयांची करचोरी झाली असल्यामुळे व शासनाचा महसूल प्रचंड प्रमाणात बुडाल्यामुळे, तपास जलदगतीने करुन संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही करित आहे ?

**श्री. जयंत पाटील** : (1) राज्यातील नाफ्ता व केरोसीनच्या ज्या सोळा विक्रेत्यांवर विविध पोलीस स्थानकामध्ये एफ.आय.आर.दाखल करण्यात आले होते त्या व्यापाऱ्यांची यादी जोडण्यात येत आहे. त्यामध्ये एफ.आय.आर. दाखल केल्याच्या तारखा दर्शविण्यात आलेल्या आहेत.

(2) या सोळा व्यापाऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यापाऱ्यांना अजून पर्यंत तरी अटक करण्यात आलेली नाही. या 16 प्रकरणांमधील एकूण करचोरीची रक्कम अंदाजे रु.72.67 कोटी इतकी आहे. या रकमेमध्ये निर्धारणा आदेश पारीत झाल्यानंतर फेरफार हावू शकतो.

(3) करचुकवेगिरीची रक्कम निर्धारणेद्वारे निश्चित करण्यात येऊन त्या एकमेची कायदेशीररित्या मागणी निर्माण करणे. करचुकवेगिरीच्या बाबींकरिता कायदेशीररित्या शास्ती लावणे अथवा अभियोग दाखल करणे, अशा प्रकारची कार्यवाही या प्रकरणामध्ये केली जात आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**विवरण पत्र क्रमांक - 1**

**F.I.R. दाखल केलेल्या व्यापाऱ्यांची यादी व अंदाजीत अंतर्भुत महसूल.**

| क्र. | कंपनीचे नांव | पोलीस स्टेशनचे नांव | एफ.आय.आर. क्र. व दि. | अंदाजीत अंतर्भुत रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|
| 1. | मे. बी.एम. केमीकल | रसायनी पोलीस स्टेशन रसायनी जि.रायगड | 46/2004 दि. 06.12.2004 | 1922 |
| 2. | मे. वामा बोर्ड | टिळकनगर पोलीस स्टेशन, मुंबई | 27/05 दि. 03.02.2005 | 53 |
| 3. | मे. शेल ऑईल एक्झिम प्रा.लि. | पंतनगर पो.स्टेशन, मुंबई | 76/2005 दि. 01.03.2005 | 9 |
| 4. | मे. एच.एम. केमिकल्स | टिळकनगर पोलीस स्टेशन, मुंबई | 44/2005 दि. 02.03.2005 | 107 |
| 5. | मे. प्लॅनेट इन कॉर्पोरेट | पोलीस सेल, माझगांव, मुंबई | 62/2005 दि. 10.03.2005 | 5 |
| 6. | मे. विमलाई इंडस्ट्रिज | नंदुरबार पोलीस स्टेशन जि.नंदुरबार | 7/2005 दि. 14.01.2005 | 73 |
| 7. | मे. शिवा ऑर्गेनिक्स | वाडा पोलीस स्टेशन, जि.ठाणे | 125/2004 दि. 08.12.2004 | 1731 |
| 8. | मे. गुडविल इन्कॉर्पोरेट | नेहरुनगर पोलीस स्टेशन, मुंबई | 155/2005 दि. 21.06.2005 | 187 |
| 9. | मे. गुरुदेव केमॉक्स इंड. | पंतनगर पोलीस स्टेशन, मुंबई | 198/2005 दि. 22.06.2005 | 511 |
| 10. | मे. जे.के. पेट्रोलियम | विसरवाडी, नंदुरबार जि.नंदुरबार | 39/2005 दि. 30.06.2005 | 1053 |
| 11. | मे.श्याम इंटरनॅशनल | वागळे इस्टेट, पोलीस स्टेशन, ठाणे, जि.ठाणे | 223/2005 दि. 11.07.2005 | 410 |
| 12. | मे. अरविंद हुक्केरी | राजारामपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर, जि.कोल्हापूर | 97/2005 दि. 13.07.2005 | 46 |
| 13. | मे. सुलाखी केमिकल्स प्रा.लि. | खेड पोलीस स्टेशन, मु.पो.खेड, जि.रत्नागिरी | 105/2005 दि. 08.07.2005 | 385 |
| 14. | मे. अमित पेट्रोलियम प्रा.लि. | खेड पोलीस स्टेशन, मु.पो.खेड, जि.रत्नागिरी | 106/2005 दि. 08.07.2005 | 380 |
| 15. | मे. विमलाई इंडस्ट्रिज | नंदुरबार पोलीस स्टेशन, जि.नंदुरबार | 2/2005 दि. 14.01.2005 | -- |
| 16. | मे. आर.के. रेमेडिज | पारनेर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर | 245/2005 दि. 26.10.2005 | 395 |
| | | | **एकुण** | **7267** |

....5/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ........ 10:40

**ता.प्र.क्र.17634**........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, परवाने नसतांना राज्यात नाफ्ता, केरोसीन आणि सफेद केरोसीनची आयात करुन त्याची पेट्रोलमध्ये भेसळ करण्यात आली. 2 वर्षापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांची हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी 600 कोटी रुपयांची कर चोरी झाली असे सांगितले. मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये, अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आणि आता तिस-यांदा हा प्रश्न सभागृहामध्ये आलेला आहे. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले होते तेच उत्तर आता दिलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्यात नाफ्ता व केरोसीनच्या ज्या सोळा विक्रेत्यांवर विविध पोलीस स्थानकांमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आले होते त्या व्यापा-यांची यादी जोडण्यात येत आहे." या 16 व्यापा-यांवर सन 2005 मध्ये गुन्हे दाखल केले आहेत. हा प्रश्न मागच्या वर्षी उपस्थित झाला. या 16 व्यापा-यांव्यतिरिक्त विनापरवाना नाफ्ता आयात करणा-या कंपन्यांवर अजूनही कारवाई झालेली नाही. विनापरवाना नाफ्ता आयात करुन अंतिम उपयोगिता पत्र न देता त्यांनी व्यवहार केल्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभागाने त्यांच्यावर केसेस दाखल केल्या. त्यांनी विनापरवाना नाफ्ता आयात करुन विक्री केल्यामुळे शेकडो रुपयांची कर चोरी झालेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी 16 व्यापा-यांवर कारवाई केली. परंतु ज्या कंपन्यांनी परवाना नसतांना नाफ्ता आयात करुन तो संपूर्ण राज्यामध्ये विकला. त्यांनी अंतिम उपयोगिता पत्र दिले नाही. राज्यामध्ये असे व्यवहार चालू असतांना सेल्स टॅक्स विभागाच्या अधिका-यांनी यावर लक्ष ठेवले नाही. आपण काही अधिका-यांवर चौकशी नेमली होती, त्या चौकशीचे काय झाले ?

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17634 ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, नाफ्ता आयात करण्यासाठी विशेष परवानगी लागत नाही. ओजेएल खाली नाफ्ता असल्याने तो कुणीही आयात करू शकतो. अशा एकंदर 67 केसेस होत्या त्यातील 35 केसेस ज्यांचे महाराष्ट्रात ट्रँझॅक्शन झालेले होते त्यातील होत्या आणि या 35 केसेसमध्ये 18 केसेस या साधारणत: डमी व्यापाऱ्यांनी खरेदी विक्री केलेली आहे म्हणजे ज्यांचे नाव व पत्ते उपलब्ध नाहीत अशांच्या होत्या. 17 केसेसमध्ये लाभार्थी हे व्यापारी आहेत आणि त्यातील 16 लोकांची यादी आपल्यासमोर या उत्तरामध्ये दिलली आहे ज्यांच्यावर एफआयआर दाखल केलेले आहेत त्यापैकी 15 लोकांचे असेसमेंट झालेले आहे आणि त्यात मूळ करापोटी 93.47 कोटी रूपयांची मागणी होती आणि व्याजापोटी 61 कोटी रूपयांची मागणी होती. अशा प्रकारे एकंदर 155 कोटी रूपयांचा कर, मूळ कर आणि व्याज असे मिळून झालेले आहे. सभापती महोदय, यामध्ये उरलेल्या ज्या केसेस आहेत त्यांची तपासणी विक्रीकर विभागामार्फत चालू आहे. दरम्यानच्या काळात गृह विभागाने भेसळ होणाऱ्या सर्व केसेसची छाननी करावी म्हणून एक विशेष अन्वेषण पथक नेमण्याचाही विचार झालेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी प्रश्न असा विचारला आहे की, अन्न व नागरी पुरवठा विभागाने अंतिम उपयोगिता पत्र दिलेले नाही याचा अर्थ त्यांनी नागरी पुरवठा विभागाचे प्रमाणपत्र न घेता नाफ्ता चोरून विकला आणि त्यामुळे आपला कर बुडविला आहे. तर अशा लोकांचे बाबतीत आपण पुन्हा चौकशी करून त्यांचेवर गुन्हे दाखल करणार काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, यामध्ये थोडीशी गल्लत होते आहे असे वाटते. अन्न व नागरी पुरवठा विभागाने अंतिम उपयोगिता प्रमाणपत्र द्यायचे असले तरी यासाठी त्यांच्या परवानगीची गरज आहे असे नाही. त्यांचेकडून केवळ वापराचे प्रमाणपत्र द्यायचे राहिले असेल, पण अन्न भेसळ कायदा आणि विक्रीकर कायदा या दोन्ही कायद्यांखालील गुन्हे एकत्रितपणे चौकशी करण्यासाठी एक विशेष अन्वेषण पथकाची निर्मिती 9 जून 2006 रोजी करण्यात आली आहे आणि त्यांच्याकडे गेल्या चार वर्षातील वेगवेगळे असे 99 गुन्हे नोंदविले गेले आहे, त्यात वैशिष्ट्यपूर्ण गुन्हे आहेत, त्यात साधारण गुन्हे नाहीत, अशा प्रकारच्या गुन्ह्यांची तपासणी करण्यासाठी आदेश दिलेले आहेत.

...... डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17634 ...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते अधिक विस्ताराने बोलले नाहीत. म्हणून मी विचारू इच्छितो की, साधारणपणे जो नाफ्ता आयात केला गेला तो कोठे वापरला याची चौकशी केली आहे काय ? तसेच जो नाफ्ता आयात केला आहे त्याचे टनेज देखील वाढवून दाखविले गेले आहे म्हणजे 100 ऐवजी 200 टन केले होते, तर याची चौकशी केली आहे का ? तसेच आपण केरोसीनचे परवानगी देता त्यामध्ये शहराजवळच्या भागामध्ये जास्त कोटा देता पण प्रत्यक्षात तेथे तेवढा वापर होत नाही आणि त्यामध्ये मग भेसळ जास्त केली जाते. असे प्रकार धुळे, जळगाव या भागामध्ये होतात कारण तेथे केरोसीनचा कोटा जास्त आहे. तेव्हा त्याबाबतीत शासन चौकशी केली आहे काय ? असल्यास, किती लोकांवर त्याबाबत कारवाई केलेली आहे ?

( यानंतर श्री. सरफरे ...... इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17634...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नातील तिसऱ्या प्रश्नाचा संबंध अन्न व नागरी पुरवठा विभागाशी आहे. आयात केलेल्या नाफ्त्यापैकी किती नाफ्त्याचा वापर करण्यात आला असा त्यांचा पहिला प्रश्न आहे? ज्या प्रमाणात नाफ्ता आयात करण्यात आला त्या प्रमाणात तो लॉजिकली एंडपर्यंत, आवश्यक त्या ठिकाणी पोहोचलेला नाही. अशाप्रकारच्या केसेस घडल्या आहेत, त्या केसेसमध्ये आणि ज्या प्रकरणामध्ये आयात केलेला नाफ्ता अधिकृत कामासाठी वापरण्यात आला आहे, अशा केसेसमधील पुरावे मिळाल्यानंतर त्या केसेसची चौकशी करण्यात येत नाही. परंतु ज्या केसेसमध्ये पूर्वी आयात केलेला नाफ्ता त्याठिकाणी पुरविण्यात आला असेल, तो महाराष्ट्रामध्ये विकला गेला असेल, परंतु परराज्यामध्ये विकला गेल्याचा पुरावा उपलब्ध नसेल अशाप्रकारच्या संशयास्पद वाटणाऱ्या केसेस पुढे आणून त्यांची चौकशी चालू आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, कोटयावधी रुपयांचा कर चुकवून राज्य सरकारची तिजोरी रिकामी करणारी आणि नाफ्ता, केरोसिनचा काळाबाजार करणारी मंडळी आहेत. त्यापैकी अशाप्रकारचा काळाबाजार करणाऱ्या 16 विक्रेत्यांवर कारवाई केली आहे, म्हणजे एफ.आय.आर. दाखल केला आहे. त्यांचे लायसन्स रद्द केले आहे काय? त्यांच्यावर दंडासहीत फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय? असेल तर काय कारवाई केली आहे?

श्री. जयंत पाटील : मघाशी सांगितल्याप्रमाणे नाफ्ता आयात करण्याच्या संदर्भात कोणत्याही लायसन्सची गरज लागत नाही. तथापि, ज्या केसेसमध्ये एफ.आय.आर. दाखल केला आहे त्या केसेसचे असेसमेंट बऱ्याचशा प्रमाणात पूर्ण केले आहे. उदा. क्रमांक 12 वरील मे. अरविंद हुक्केरी या कंपनीची 46 लाखाऐवजी 68 लाख टॅक्स अमाऊंट झाली. मे. गुरुदेव केमॉक्सची 5 कोटी 11 लाखाऐवजी 8 कोटी 77 लाख झाली, मे. जे.के. पेट्रोलियम कंपनीची 10 कोटी 53 लाखाऐवजी 15 कोटी 29 लाख झाली. अशाप्रकारे फायनल असेसमेंट झाल्यावर ती रक्कम निश्चित करुन त्यांच्याकडून वसूल करण्यासाठी त्यांच्याकडे डिमांड रेज केली आहे. या कपन्यांवर पोलिसांनी एफ.आय.आर. दाखल केल्यामुळे त्यासंबंधी पोलीस विभाग पुढील कारवाई करीत आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, नाफ्ता हा पेट्रोल आणि पेट्रोलजन्य पदार्थामध्ये भेसळ करण्यासाठी वापरला जातो ही वस्तुस्थिती आहे. अशाप्रकारे नाफ्ता वापरणाऱ्या कंपन्यांच्या संपूर्ण व्यवहाराची चौकशी केली तर कशापध्दतीने त्याचा वापर केला जातो, त्यामध्ये सेलपेक्षा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17634...

श्री. श्रीकांत जोशी...

परचेसचे प्रमाण जास्त असल्यामुळे मोठया प्रमाणावर त्याचे युटिलायझेशन होते. आणि मोठया प्रमाणावर विक्रीकर चुकविला जातो. त्यामुळे हा फौजदारी गुन्हा होऊ शकतो, देशद्रोहाचा गुन्हा होऊ शकतो. अशाप्रकारचा गुन्हा आपण कां दाखल केला नाही?

श्री. जयंत पाटील : मुळात पहिल्यांदा या सर्व प्रकरणामध्ये अशा स्वरुपाची चर्चा चालू असल्याचे दिसत असल्यामुळे आणि माझ्या ते लक्षात आल्यामुळे मी स्वत: विक्री कर विभागाला या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेण्यासबंधी सूचना दिली होती. त्यानंतर मी स्वत: टेंकेज कंपनीकडून माहिती मागविली आणि त्यांनी विशिष्ट नमुन्यात माहिती दिली. ती माहिती प्राप्त झाल्यानंतर असे लक्षात आले की,याबाबत सर्व बंदरांवरुन माहिती मिळविली पाहिजे. दरम्यान माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी शासनाला काही माहिती उपलब्ध करुन दिली. ती मिळाल्यानंतर महाराष्ट्र नव्हेतर देशातील 10 ते 12 बंदरांवर माणसे पाठवून या देशामध्ये कुणी कुणासाठी नाफ्ता, केरोसिन आयात केले. आणि त्यामध्ये कोणकोणते वेगवेगळे पदार्थ मिक्स करण्यात येतात याची माहिती मिळविली. त्यानंतर आपल्या महाराष्ट्रात किती माल आला, याचे असेसमेंट तयार केले.तसेच, महाराष्ट्रामध्ये नाफ्ता खरेदी करणाऱ्या जवळपास सर्व कंपन्यांना भेटी दिल्या. त्यामध्ये त्यांना नाफ्त्याची किती गरज होती आणि प्रत्यक्षात त्यांनी किती नाफ्ता खरेदी केला याचे असेसमेंट तयार केले. त्यांच्याकडे असलेल्या रेकॉर्डवरुन त्यांनी खरेदी केलेला नाफ्ता आणि त्यांना असलेली नाफ्त्याची गरज यामध्ये तफावत आढळली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 10:55

ता.प्र.क्र.17634 श्री.जयंत पाटील (पुढे सुरु..

या संबंधी त्यांना पीन पॉईन्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.असेसमेंट बेसीसवर पडताळणी करावयाची असेल तर माल आयात करणा-यांवर, समजा मी नाफ्ता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांना हाय सीमध्ये विकला, त्यानंतर प्रा.बी.टी.देशमुखांनी तो नाफ्ता पुन्हा हाय सीमध्ये विरोधी पक्ष नेत्यांना विकला आणि देशाच्या सीमेच्या बाहेर हा व्यवहार झाला असेल तर काही नाही. एका माणसाच्या नावावर टँकेजमध्ये माल आला आणि तो माणूस डमी निघाला तर अशा परिस्थितीत ज्या माणसाला ते विकले असेल आणि तो व्यवहार राज्यात झाला असेल तर त्याची चार टक्के एवढा पूर्ण सेल्सटॅक्स भरण्याची जबाबदारी आहे. त्यांनी राज्याबाहेर माल विकला असेल आणि तसे सी फॉर्म भरुन दिलेले असेल तर तो व्हॅलिड होता काय ? हे पहाता येते. तो राज्यामध्ये विकला असेल आणि आपण म्हणता त्याप्रमाणे तो व्यापार करणारा असेल तर त्यांनी तो माल डायरेक्ट घेतला आहे काय,तो डायरेक्ट घेतला नसेल तर तो कोणाकडून घेतलेला आहे, हे पाहूनच त्यांच्याकडे डिमांड रेज करतो. नियमाप्रमाणे व्यवहार झाला नसेल तर त्याप्रमाणे गुन्हा नोंदविला जातो.

श्री.श्रीकांत जोशी : एखाद्या एन्ड युजरवर कारवाई केलेली आहे का ?

श्री.जयंत पाटील : तो एन्ड युजरच आहे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तरपणे अशाप्रकारची माहिती दिली. यादी मधील क्रमांक 13 आणि 14 या कंपन्या खेड, जि.रत्नागिरीमधील आहेत. त्यांच्यावर एफआयआर दाखल केलेला आहे.त्यांची नावेही दिलेली आहेत. हे जे दोन कंपन्यांचे व्यापारी आहेत, हे नॅशनल हायवे क्रमांक 17 च्या कडेला थांबून रॉकेल आणि नाफ्ता विकतात. मंत्री महोदयांनी रॉकेलचा विषय अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे येतो असे सांगितले, परंतु यामध्ये नाफ्ता आणि रॉकेल या दोन्हींचा संबंध आहे. नॅशनल हायवे क्रमांक 17 च्या बाजूला दोन ठिकाणी खुले आम रॉकेल आणि नाफ्ता विकले जात होते. याबाबत स्थानिक कार्यकर्त्यांनी अनेकवेळेला तक्रारी केलेल्या होत्या. तक्रार केल्यानंतर या कार्यकर्त्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु त्या अधिकाऱ्यांना या व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेसे वाटले नाही. मंत्री महोदयांना याबाबत सांगितल्यानंतर गुन्हे दाखल करावेसे वाटले,अशा अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात काय ?

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, नाफ्त्याची खुलेआम विक्री होत नाही कारण टँकरने नाफ्ता डायरेक्ट एन्ड युजरकडे जात असतो. रॉकेलची विक्री केली असेल. यादी मधील 13 आणि 14 मधील व्यापाऱ्यांनी अशी विक्री केली असेल तर संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल

श्री.पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी सांगितले की, नाफ्ता विकण्यास पर्वानगी लागत नाही. परंतु आपल्या देशात नाफ्ता आल्यानंतर त्याचा येथे वापर झाला तर त्याचे रेकॉर्ड आपल्याकडे उपलब्ध नाही. परंतु या सोळा व्यापाऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यापाऱ्यांना अजूनपर्यन्त तरी अटक करण्यात आलेली नाही असे म्हटलेले आहे. इतर व्यापारी कोण आहेत ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, विक्री कराच्या विवरण पत्रामध्ये दाखविल्या गेलेल्या कंपन्यांमधील गेल्या पाच-सात वर्षापासून बंद असलेल्या दोन कंपन्या आहेत. त्यामध्ये मे.निलश्री केमिकल्स, प्रा. लि. आणि मे.एस.बी.वोरा ॲण्ड कंपनी या आहेत. मे. मिनलश्री केमिकल्स लि. कंपनी दिनांक 1-4-97 पासून बंद असून वित्तीय वर्ष 2001-2002 मधील खरेदी विक्री विवरणपत्राप्रमाणे रिक्त असून विक्रीकर भरणा रिक्त आहे. दिनांक 1-4-202 पासून नोंद दाखला रद्द करेपर्यन्त विवरणे दाखल केलेली नाहीत. तसेच कराचा काहीही भरणा केलेला नाही. मे.एस.बी.वोरा ॲड कंपनीचा व्यवसाय आठ वर्षापासून बंद आहे. व्यापाऱ्याने 1-4-95 पासून विवरण पत्रके दाखल केलेली नाहीत अथवा विक्रीकराचा भरणा केलेला नाही. गेल इंडिया कंपनीकडून या दोन्हीही कंपन्यांनी नाफ्ता विकत घेतला. सन 2001-2002 मध्ये मिनलश्री केमिकल प्रा.लि.या कंपनीने 119 मे.ट., 2002-03 मध्ये 222 मे.ट. नाफ्ता घेतला.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17634 ..... श्री. पांडुरंग फुंडकर ....

2003 मध्ये 215 मे.टन, 2004 मध्ये 332 मे.टन, 2005 मध्ये 235 मे.टन नाफ्ता विकत घेतलेला आहे. एका बाजूला विवरणपत्रामध्ये सांगितले की, ही कंपनी बंद आहे. त्यांचे विवरणपत्र रिक्त आहे आणि दुसऱ्या बाजूला त्यांनी शेकडो टन नाफ्ता एका कंपनीकडून विकत घेतलेला आहे. म्हणजे व्यवहार झालेला आहे. त्यांनी आपला कर चुकविलेला आहे. या दोन कंपन्यांची चौकशी करुन शासन त्यांच्यावर काय कारवाई करणार ?

श्री. जयंत पाटील : नाफ्ता भेसळ करणे, गैरमार्गाने नाफ्ता आयात करुन विक्री करणे यासंदर्भात जी चौकशी चालू आहे त्याच पध्दतीने या दोन्ही कंपन्यांवर कारवाई होईल.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पैनगंगा (जि.वर्धा) नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेलेल्या ५ मुलांचा झालेला मृत्यू**

**(४) * १८४०३ श्री. गुरुनाथ कुलकर्णी , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. शिवाजीराव पाटील , श्री. विनायकराव मेटे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील आवारपूर येथील पाच विद्यार्थी दि. २५ एप्रिल, २००६ रोजी पैनगंगा नदीच्या कारवा डोहात बुडून मृत्युमुखी पडले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर. पाटील यांच्याकरिता** : (१) होय, सदरची घटना ही २४.०४.२००६ रोजी घडली आहे.

(२) व (३) होय, मौ. आवाळपूर गावातील (१) विजय अधिकंद दास, वय १६ वर्ष, (२) नितीन हरीदास पुढीकर, वय १६ वर्ष, (३) लक्ष्मीकांत निरपालसिंग ठाकूर, वय १६ वर्ष, (४) सतिश मदनय्या पुनियालवार, वय १६ वर्ष, (५) राजकुमार अर्जुन देवर, वय १७ वर्ष, (६) संदीप अरुण शिरसाट, वय १९ वर्ष, (७) अनुप नकुल रॉय, वय १७ वर्ष, (८) संतोष वसंतराव मेकलवार, वय १७ वर्ष, (९) रुपेश बंडूजी कुळमेथे, वय १७ वर्ष ही मुले मौ. कारवाई गावातून वाहत असलेल्या पैनगंगा नदीचे खोल पाण्यात पोहण्यास गेली असता अ.क्र.१ ते ५ येथील मुले बुडून करण पावली आहेत व इतर ४ मुले जीवंत बाहेर आली. याप्रकरणी गडचांदूर पो.ठाणे येथे अकस्मात मृत्यू क्र.१७/२००६ कलम १७४, दंड प्रक्रीया संहिता अन्वये नोंद करुन अधिक तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, दिनांक 25 एप्रिल, 2006 रोजी पैनगंगा नदीच्या कारवा डोहात बुडून काही मुले मृत्युमुखी पडलेली आहेत. माझी अशी माहिती आहे की, या डोहात नेहमी असे प्रकार होत असतात. त्या ठिकाणी 9 मुले पोहण्यासाठी गेली होती त्यापैकी क्रमांक 1 ते 5 वरील 5 मुले मृत्युमुखी पडली. दरवेळी त्या ठिकाणी असा प्रसंग घडतो. त्या ठिकाणी असे होऊ नये म्हणून शासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पैनगंगा नदीमध्ये इयत्ता दहावीची 9 मुले पोहण्यासाठी गेली होती. त्यापैकी 5 मुलांचा दुर्दैवाने मृत्यू झाला, ही गोष्ट खरी आहे. ही मुले स्वतःच त्या ठिकाणी गेली होती. क्रिकेट खेळावयास जातो असे आई वडिलांना सांगून ही मुले त्या ठिकाणी गेली होती. त्यांचा दुर्दैवाने मृत्यू झालेला आहे. असे होऊ नये म्हणून पैनगंगा नदीच्या डोहाच्या किनाऱ्यावर पोलीस नेमून वॉच ठेवावा लागेल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : त्या ठिकाणी पैनगंगा नदीच्या कारवा डोहामध्ये ही घटना घडलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी उल्लेख केला की, त्या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडत असतात. अशा डोहामध्ये मुले बुडण्याच्या घटना वारंवार होत असतील तर अशा ठिकाणी शासनातर्फे धोक्याची सूचना देणारा एखादा फलक लावणे, धोक्याचा इशारा देणारी माहिती देणे अशा प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येणे शक्य आहे. ते शासन करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. त्या ठिकाणी फलक लावण्यात येईल.

प्रा. फौजिया खान :सभापति महोदय, 9 लड़के एक साथ डूब जाने की यह एक अलग सी घटना है. 9 लड़कों का एक साथ डूबने का कारण क्या हो सकता है ? इस घटना में 9 लड़कों में से 4 लड़कों को डूबने से बचा लिया गया और 5 लड़के डूब कर मर गए. मर गए बच्चों की पोस्टमार्टेम रिपोर्ट में मृत्यु का कारण क्या बताया गया है, क्या ये बच्चें हेल्दी कंडीशन में थे, या उस जगह की कोई खासियत है,जैसे क्या वहां भँवर है, किस वजह से एक साथ 5 बच्चें डूब कर मर गए ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही इयत्ता दहावीची मुले होती. परीक्षा संपल्यावर सर्व मुले मिळून त्या ठिकाणी पोहोण्यासाठी गेलेली होती. त्यांची कंडीशन हेल्दी होती. पोहत असताना काय झाले हे माहीत नाही, पण त्या पाण्यामध्ये बुडून त्यांचा मृत्यू झाला असा पोस्टमार्टेम रिपोर्ट आहे.

श्रीमती कांता नलावडे : ज्यावेळी शाळा कॉलेजेसना सुट्टया असतात त्यावेळी अशा घटना घडतात. गणपतीपुळे तसेच ज्या ठिकाणी धबधबे आहेत त्या ठिकाणी अशा प्रकारे बुडून मुलांचा, विद्यार्थ्यांचा मृत्यू होत असतो. गणपतीपुळेसारखी अशी जी पर्यटन स्थळे आहेत त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काही जे अट्टल पोहणारे असतात त्यांची व्यवस्था करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

----

यानंतर श्री. शिगम ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 11:05

**विरार (जि.ठाणे) येथील नालासोपाऱ्यातील एका ख्रिस्ती आश्रमशाळेच्या फादरने एका अल्पवयीन अनाथ मुलीवर बलात्कार केल्याबाबत**

**(५) * १८३२० श्रीमती सुधा जोशी , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.ठाणे) येथील नालासोपाऱ्यातील एका ख्रिस्ती आश्रमशाळेच्या फादरने एका अल्पवयीन अनाथ मुलीवर बलात्कार केल्याची घटना दि. १५ एप्रिल, २००६ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू फादरवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१), (२) होय.

(३) सदर प्रकरणी दोन आरोपींविरुध्द नालासोपारा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.१०७/२००६ भा.दं.वि.सं.क. ३७६ (२), (क), ३५४, ३२३, ३४ प्रमाणे दिनांक १४.०४.२००६ रोजी ००/१५ वा. गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फादरसह अन्य एक आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपासात आरोपीने फिर्यादी मुलीवर बलात्कार केल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती सुधा जोशी : कुंपणानेच शेत खाण्याचे प्रकार अतिशय वाढत आहेत. त्याच बरोबर अल्पवयीन मुलींवर बलात्कार करण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा परिस्थितीमध्ये समोरच्याला अशा प्रकारचा गुन्हा करण्याची कधीच हिंमत होऊ नये अशी कडक शिक्षा गुन्हेगाराला होणे आवश्यक आहे. अशा गुन्हयासाठी गुन्हेगाराला कमीत कमी आणि जास्तीत जास्त किती शिक्षा होते.? हा फादर त्या आश्रमशाळेशी काय म्हणून संबंधित आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या गुन्ह्याबाबत जी कलमे लावलेली आहेत त्या प्रमाणे गुन्हेगाराला कमीत कमी 15 वर्षाची शिक्षा होऊ शकते. जास्तीत जास्त शिक्षा ही न्यायाधीशांच्या निर्णयावर अवलंबून असते.

श्रीमती सुधा जोशी : फादरचा आश्रमशाळेची काय संबंध आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्या फादरने स्वत: अनाथालय चालू केले होते.

श्री. विनोद तावडे : हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. नालासोपा-यातील या ख्रिस्ती अनाथालयातील फादर अलेक्झांडर याने 10 वर्षाच्या मुलीवर अतिप्रसंग केला, बलात्कार केला. ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घटना त्या मुलीने आपल्या शिक्षिकेला सांगितली. 10 तारखेला ही घटना घडली. श्रीमती बनसोडे या जेव्हा तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनला गेल्या त्यावेळी पोलिसांनी सांगितले की, मुलीच्या नातेवाईकांची तक्रार नाही, तुम्ही कशाला तक्रार करण्यासाठी येता ? असा सल्ला नालासोपारा पोलीस स्टेशनने दिला. तेथील राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्या मुलीला घेऊन तक्रार करण्यास लावली. ही तक्रार 14 तारखेला दाखल करण्यात आली हे खरे आहे काय ? तक्रार दाखल करुन 90 दिवस होऊन गेले. गुन्ह्याचा तपास चालू आहे असे उत्तर दिलेले आहे. 90 दिवस होऊन देखील अजून आरोपपत्र दाखल केलेले नाही, याचा अर्थ त्या फादरला मोकळे सोडायचे आहे काय ? 90 दिवसामध्ये आरोपपत्र का दाखल केले नाही ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे श्रीमती बनसोडे मॅडम ह्या तेथे टयूशन घेतात. त्यांना 15 दिवसापूर्वी ही घटना सांगितली होती हे खरे आहे. श्रीमती बनसोडे मॅडम ह्या तेथे टयूशन घेत असल्यामुळे त्यांनी घाबरुन पोलीस स्टेशनला ही घटना सांगितली नाही. जेव्हा तेथील मुली अनाथालयातून पळून श्रीमती बनसोडे मॅडमकडे गेल्या त्यावेळी त्यांनी त्या मुलींना सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती छाया पाटील यांच्याकडे नेले. त्यानंतर श्रीमती छाया पाटील यांनी त्या मुलींना घेऊन तक्रार नोंदविली. अगोदर कोणीही पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास आले नव्हते. 90 दिवसाच्या आत आरोपपत्र दाखल होईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. मधुकर चव्हाण : ख्रिश्चन फादरला अटक करु नये असा दिल्लीवरुन दबाव आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : 20 एप्रिलला गुन्हा दाखल झालेला आहे...

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 11:10

ता.प्र.क्र.18320.........

(दोन्ही बाजुचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, ही अत्यंत गंभीर घटना आहे. ही घटना पचविण्याचा सुध्दा प्रयत्न चाललेला दिसत आहे. याबाबत अन्य सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन ही बाब पोलिसांच्या लक्षात आणून दिली. सदनाचे आणि सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे मत आहे की, 90 दिवसांच्या आत या घटनेबाबत कोर्टात जर चार्जशीट दाखल केली नाही तर तो आरोपी मोकळा सुटण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत या केसमध्ये कठोर कारवाई करण्यासाठी 90 दिवसाच्या आत चार्जशीट दाखल केली जाईल का हा खरा प्रश्न आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : गुन्हा 20.4.2006 रोजी दाखल झाला असून 90 दिवसाच्या आत कोर्टात चार्जशीट दाखल करण्यात येईल.

(दोन्ही बाजुचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, आपण दिलेले उत्तर पाहिले तर त्यात असे म्हटले आहे की, 14.4.2006 रोजी 00/15 वाजता सदरहू गुन्हा दाखल झालेला आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 14.4.06 ला गुन्हा दाखल झाला असून आरोपीला अटक केल्यापासून अजून 90 दिवस झालेले नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी भीती बाळगण्याचे कारण नाही. त्या फादरला वाचविण्याचे काही कारण नाही. फादरला वाचवावयाचे असते तर त्याला अटक झाली नसती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रथमत: मी आपल्याला धन्यवाद देतो. या प्रश्नाचे गांभीर्य आपण स्वत:मंत्रीमहोदयांच्या लक्षात आणून दिले आहे. मंत्रीमहोदय याठिकाणी सदनात आहेत, विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. हा प्रश्न 45 दिवस अगोदर देण्यात आला आहे. प्रश्न देण्यात आल्यानंतर सभागृहामध्ये उत्तर द्यावे लागेल याची मंत्रीमहोदयांना कल्पना असावयास हवी होती. 90 दिवसांच्या आत चार्जशीट दाखल करणार का या प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी अनुकूल उत्तर दिले. 90 दिवस पूर्ण होण्यास दोन दिवस शिल्लक आहेत. बलात्काराच्या घटनेमध्ये गुन्हा दाखल करण्यास विलंब होतो. हा प्रश्न लागल्यानंतर सुध्दा चार्जशीट दाखल केली नाही. आता दोन दिवस शिल्लक असताना चार्जशीट दाखल करणार आहोत असे सांगितले गेले. ही अकार्यक्षमता ज्या पोलीस अधिकाऱ्यांची आहे त्या संदर्भात काय कारवाई करणार आहात?

..2..

14-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) I.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18320.........

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चार्जशीट दाखल करण्यामध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली आहे, त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : आरोपी मोकळे सुटणार आहेत?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : आरोपी अटकेत आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 45 दिवस अगोदर प्रश्न देऊनही चार्जशीट दाखल करण्यासाठी 90 दिवस होण्याची वाट पाहणे हे बरोबर आहे का? संबंधित पोलीस अधिकाऱ्याला आजच्या आज निलंबित करावे आणि 90 दिवसाच्या आत चार्जशीट दाखल केली पाहिजे. या दोन बाबीसंबंधी काळजी घेण्यात येईल का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांच्या आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्याला आजच्या आज निलंबित करण्यात येईल.

---------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथे शादी डॉट कॉम या इंटरनेट विवाह संस्थेत नाव नोंदविणाऱ्या महिलांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याबाबत**

**(६) * १८३६९ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे शादी डॉट कॉम या इंटरनेट विवाह संस्थेत नाव नोंदविणाऱ्या महिलांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे दि. ६ मे, २००६ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या टोळीचा शोध घेऊन त्यांचेवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील, यांचेकरिता श्री. सिध्दराम म्हेत्रे..** : (१) होय.

(२), (३) व (४) होय, प्रस्तुत प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन चतुश्रृंगी पो.स्टे. येथे गु.र.नं.१९४/०६ भा.दं.स. कलम ४२०,४०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला आहे. तपासात त्याची टोळी अगर इतर सह आरोपी निष्पन्न झालेले नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, शादी डॉट कॉम या इंटरनेट विवाह संस्थेत किती व्यक्तींची नावे नोंदविण्यात आलेली आहेत? तसेच शादी डॉट कॉम या इंटरनेट विवाह संस्थेने किती रुपयांची लूट नोंदणी करणा-या महिलेकडून केलेली आहे?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, शादी डॉट कॉम या इंटरनेट संस्थेने संबंधित महिलेकडून कोणतेही पैसे घेतले नव्हते. संबंधित महिलेने आपले नाव या संस्थेवर रजिस्टर केल्यानंतर दुस-या व्यक्तीने तिच्याशी संपर्क साधून तिला फसविले.

-------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**किल्ले धारुर (जि.बीड) येथे एका मागोमाग बोगस नोटांची उघडकीस आलेली प्रकरणे**

**(७) * १७७०८ श्री. श्रीकांत जोशी , श्री. नितीन गडकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १३४०६ ला दिनांक २३ मार्च, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील किल्ले धारुर येथे दिनांक २६ डिसेंबर, २००५ व १५ जानेवारी, २००६ रोजी रु.५००/- च्या बनावट नोटा दुकानदाराला देऊन सोन्याचे दागिने खरेदी केले व भुसावळ रेल्वे स्टेशन येथे दोन आरोपींना ५०० रुपयांच्या बनावट नोटांसह अटक करण्यात आली त्याचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, किती आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्यांच्याकडून सोने परत मिळविण्यात पोलीसांना यश आले आहे काय,

(३) उदगीर भोकरदन, औरंगाबाद मराठवाड्यात इतर अनेक ठिकाणी बनावट नोटांचे रॅकेट यापूर्वी उघडकीस आलेले आहे. त्यातील किती आरोपींना शिक्षा झाली ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे श्री. आर.आर. पाटील, यांचे करिता..**: (१) अ) किल्ले धारुर जि.बीड येथे दाखल झालेल्या गुन्ह्यांचा तपास अद्याप चालू आहे.

ब) भुसावळ रेल्वे स्टेशन येथील गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला आहे.

(२) अ) बीड ब्रॅच पोलीस स्टेशन येथे गुन्हेगाराना सदर प्रकरणी अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

ब) भुसावळ रेल्वे स्टेशन येथील गुन्ह्यात एकूण १५ आरोपीना अटक करण्यात आलेली असून त्यांच्याकडून बनावट नोटा रु.९१,५०० रु. जप्त करण्यात आलेले आहेत.

(३) अ) किल्ले धारुर पोलीस स्टेशनच्या हद्दीत अशा प्रकारचे गुन्हे उघडकीस आलेले नाहीत.

ब) सिल्लोड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०४/०६ अन्वये नोंदविण्यात आला होता. सदर गुन्ह्यात १५ आरोपीताविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केलेले आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मला आपल्या परवानगीने उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. प्रश्न भाग १ व २ चे उत्तर पुढील प्रमाणे वाचावे, "किल्ले-धारुर, जि. बीड येथे दाखल झालेल्या गुन्हयाचा तपास अद्याप चालू असून त्यामधील सोन्याचे दागिने मिळून आलेले नाहीत. सिल्लोड पोलीस स्टेशन येथे नोंद गुन्हा र.नं. ०४/०६ मधील गुन्हयातील १५ आरोपीतांना भुसावळ रेल्वे स्टेशन व अन्य ठिकाणी अटक करुन त्यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले असून त्यांचेकडून रुपये ९१,५००/- मूल्यांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. "तसेच प्रश्न भाग ३ चे उत्तर पुढील प्रमाणे वाचावे,"खटला न्यायालयात प्रलंबीत असल्याने अद्यापी आरोपीतांना शिक्षा झालेली नाही."

....३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १७७०८०

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, तिस-या उत्तरामध्ये सुध्दा गडबड करण्यात आलेली आहे. उदगीर, भोकरदन,औरंगाबाद तसेच इतर अनेक ठिकाणी बनावट नोटांचे रॅकेट उघड झालेले आहे. असे असतांनाही या आरोपींना शिक्षा झालेली नाही. बनावट नोटा घेऊन मार्केटमध्ये जाणा-याला लोकांनाच पकडले जाते परंतु जे बनावट नोटा तयार करतात अशांना मात्र अटक झालेली नाही. पहिल्यांदा उदगीर येथे ५ तते ७ लाख रुपयांच्या बनावट नोटा पकडण्यात आल्या होत्या. परंतु या प्रकरणाच्या संदर्भात उत्तरामध्ये काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या बनावट नोटा कोठे प्रिंट झाल्या होत्या? तसेच बनावट नोटांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन विशेष तज्ज्ञ अधिका-याकडे हे प्रकरण दिले जाणार आहे काय?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, बनावट नोटाच्या संदर्भात विविध ठिकाणी गुन्हे घडलेले आहेत व त्यामध्ये विविध आरोपिंना अटक देखील करण्यात आलेली आहे. बनावट नोटांचा मेन सुत्रधार उत्तर प्रदेशात होता. त्याला पकडण्यासाठी आपल्या पोलिसांनी उत्तर प्रदेश मध्ये त्यांच्या घरी जाऊन दोनदा रेड टाकलेली आहे. परंतु या रेडमध्ये संबंधिताच्या घरी केवळ संगणक आणि प्रिंटर मशिन मिळाले तसेच त्या घरात त्याची म्हतारी आईच आढळून आली.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अधिवेशन चालू असतांना सुध्दा काल-परवा बनावट नोटा सापडल्या आहेत. बनावट नोटांच्या संदर्भातील प्रश्न एकदा तरी सभागृहात उपस्थित होत असतो. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, गेल्या पूर्ण वर्षभरात सर्वसाधारणपणे किती बनावट प्रकरणे आढळून आली व किती किमतीच्या बनावट नोटा उघडकीस आल्या?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन २००५ मध्ये एकूण बनावट नोटांची रजिष्टर गुन्हे ३७५ होते व त्यातील १०७ गुन्हे डिटेक्ट झाले. तसेच जून २००६ पर्यंत १३८ गुन्हे दाखल झाले व त्यातील ५८ गुन्हे डिटेक्ट झाले.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.जुन्नरे... 11:20

ता.प्र.क्र.17708.......

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, अभी माननीय सदस्य श्री श्रीकांत जोशी जी ने यह पूछा था कि ऐसे मामलों में कितने लोगों को सजा हुई है ? इसका उत्तर नहीं मिला है, इसलिए इस प्रश्न का उत्तर दिया जाए. क्या नकली नोट बनाने वाला कोई रॅकेट कार्यरत है, यदि है तो विशेष पथक बनाकर जांच क्यों नहीं की जा रही है, इस रॅकेट के रुट काज तक पहुंचने की कोशिश क्यों नहीं की जा रही है, केवल नकली नोट चलाने वालों को पकड़कर कब तक जांच चलती रहेगी ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या घटनेबाबत पोलिसांनी तपास केलेला असून जे आरोपी सापडले त्यांची मालमत्ता जप्त केलेली आहे. यामध्ये काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. विशेष पोलीस पथक नेमण्याची आवश्यकता नाही. आमचे सध्याचे पोलीस कार्यक्षम आहेत. या गुन्ह्याचे धागेदोर दुसऱ्या राज्यात आहेत.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, एका राज्यमंत्र्यांचा उल्लेख होऊन जालना जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला होता. संभाजीनगरमधील दोन आमदारांकडून केसेस दाबल्या जात आहेत अशा बातम्या सातत्याने येत आहेत. तेव्हा या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विशेष पोलीस पथक नेमण्याची आवश्कता आहे. पोलीस जर गुन्हेगारांपर्यंत पोहोचत नसेल तर लोकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते. तेव्हा रुट कॉजपर्यंत पोहोचण्यासाठी शासन विशेष पोलीस पथक का नेमत नाही ? बनावट नोटांची प्रिंटींग कुठे होते ? त्यासाठी लागणारा कागद कोठून येतो ? याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात येणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी प्रश्नाचे उत्तर अगोदरच दिलेले आहे. बनावट नोटींची प्रिंटींग उत्तर प्रदेशमध्ये झालेली आहे. त्याठिकाणी छापा घातला असता पोलिसांना आरोपी सापडले नाहीत, परंतु त्याठिकाणी संगणक व प्रिंटर्स सापडले.

**सभापती** : उत्तर प्रदेशमध्ये जाऊन पोलिसांनी छापा घातला, त्यावेळी त्यांना आरोपी सापडले नाहीत, परंतु काही साहित्य मिळाले. परंतु त्याठिकाणी आरोपी सापडले नाहीत, याचा अर्थ पोलीस तपास संपला असा होत नाही. यापुढेही सातत्याने पाठपुरावा करुन गुन्हेगारांचा शोध घेतला पाहिजे. त्यादृष्टीने पुढील कारवाई करण्यात यावी, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आम्ही तपास थांबविलेला नाही. आमचा तपास सुरुच आहे.

............................ ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भूमी अभिलेख नियोजक धनराज गिरी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे अटक करण्यात आल्याबाबत**

**(8) * 19775 श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) भूमी अभिलेख नियोजक धनराज गिरी यांना दि. 26 मे, 2006 वा त्यासुमारास लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे एका शेतकऱ्यांकडून अटक करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गिरी यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप काय आहे,
(3) त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय.
(2) व (3) फिर्यादी श्री.अनंत कुलकर्णी यांच्या भावाची शेतजमीन मोजून न्यायालयास सविस्तर अहवाल सादर करण्याच्या अनुषंगाने शेतजमीन मोजण्यास श्री.धनराज गिरी, प्रभारी तालुका निरीक्षक, औसा यांनी लाचेची मागणी करुन ती स्वीकारली असता त्यांना दिनांक 26-5-2006 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून पकडण्यात आले. त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे, औसा, जि.लातूर येथे भाग-6 गु.र.नं. 3010/2006, कलम 7, 13 (1) (ड) सह 13(2) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून श्री.धनराज गिरी यांना दिनांक 26-5-2006 रोजी अटक करण्यात आली. गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, श्री.धनराज गिरी यांना अटक केल्याचे उत्तरात म्हटलेले आहे. त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले किंवा कसे याबाबतचे उत्तर देण्यात आलेले नाही, तेव्हा या प्रश्नाचे उत्तर मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, भूमी अभिलेख नियोजक श्री.धनगराज गिरी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे रंगेहात पकडण्यात आलेले आहे. त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, दिनांक 26 मे 2006 रोजी श्री. गिरी यांना अटक करण्यात आली असे उत्तरात म्हटलेले आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सध्या ते तुरुंगात आहेत की, जामीनावर सुटलेले आहेत ?

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19775........

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दिनांक 26 मे, 2006 रोजी श्री.गिरी यांना अटक करण्यात आली. त्यांनी न्यायालयातून जामीन मिळविलेला आहे. ते सरकारी नोकर असल्यामुळे त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

-----------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाड जवळील रायगड सैनिक शाळेने उन्हाळी सुट्टी निमित्त आयोजित केलेल्या शिबिरातील कल्याण येथील ११ वर्षाच्या विद्यार्थ्याचा तरण तलावात बुडून झालेला मृत्यू**

**(9) * 17760 श्री. अनिल परब , श्री. विलास अवचट , डॉ. निलम गोऱ्हे** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाड जवळील रायगड सैनिक शाळेने उन्हाळी सुट्टी निमित्त आयोजित केलेल्या शिबिरातील कल्याण येथील 11 वर्षाच्या एका विद्यार्थ्याचा दिनांक 18 एप्रिल, 2006 रोजी वा त्यासुमारास तरण तलावात बुडून मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(3) असल्यास, या अपघाताबाबत शासनाने चौकशी केली काय,

(4) असल्यास, सदर विद्यार्थ्याच्या मृत्यूस जबाबदार असलेल्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर. पाटील यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) होय.

(४) याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाणे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३१/२००६, भा.दं.वि.सं. कलम ३०४(अ), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, महाड जवळील रायगड सैनिकी शाळेने उन्हाळी सुट्टी निमित्त आयोजित केलेल्या शिबिरामध्ये कल्याण येथील 11 वर्षाचा मुलाचा तरण तलावात बुडून मृत्यू झाला, या प्रकरणी तीन आरोपिंना अटक करण्यात आलेली आहे असे उत्तरात म्हटलेले आहे. या तीन आरोपिंना कशासाठी अटक करण्यात आलेली आहे ? त्यांनी त्या मुलाला पाण्यात ढकलून दिले म्हणून त्यांना अटक करण्यात आलेली आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या तीन आरोपिंना यासाठी अटक करण्यात आली की, ते त्या संस्थेचे प्रमुख आहेत. ज्या संस्था उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये स्विमिंग, घोडेस्वारी इत्यादींचे ट्रेनिंग कॅम्प घेतात, तेव्हा मुलांची काळजी घेणे हे त्यांची जबबादारी असते. त्यांनी निष्काळजीपणा दाखविल्यामुळे त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ठाणे शहरातील एका जलतरण तलावामध्ये सुध्दा अशाचप्रकारे एका मुलाचा मृत्यू झालेला आहे......

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17760...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारावेत, सर्वच माहिती देत बसू नये.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शिबीर लावले जात नाहीत, त्यासंदर्भात विशेष दक्षता घेण्याच्या दृष्टीने शासनामार्फत काही सूचना दिल्या जातील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, यासंदर्भात गुन्हा दाखल झालेला आहे.

----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विविध ठिकाणच्या विक्रीकर विभागात विक्रीकराचे बनावट सी फॉर्म छापून गेल्या काही वर्षापासून कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(१०) * १८३०५ श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुधाकर गणगणे , श्री. रमेश निकोसे , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध ठिकाणच्या विक्रीकर विभागात विक्रीकराचे बनावट सी फॉर्म छापून गेल्या काही वर्षापासून कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे मार्च, २००६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) होय.
(२), (३) सदर प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, यांच्या मार्फत चौकशी चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सदर फॉर्मचा उपयोग करुन व्यापाऱ्यांनी आत्तापर्यंत किती रुपयांचा विक्रीकर बुडविला ? व सी फॉर्मच्या नवीन पध्दतीनुसार मुद्रांक छापण्याच्या बाबतीत शासनाचे धोरण काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आत्तापर्यंत सी फॉर्मच्या संदर्भात व्यापाऱ्यांनी किती कर बुडविला याबाबतची चौकशी चालू आहे. या प्रकरणाबाबतीत पोलीस दलातील सी.आय.डी.चे वरिष्ठ अधिकारी, एस.पी. लेवलचे अधिकारी व सेल्स टॅक्स विभागाचे आयुक्त स्तरावरील अधिकारी तपास करीत आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा सेल्स टॅक्सच्या बाबतीतील प्रश्न असून याचे उत्तर वित्त मंत्र्यांनी देणे अपेक्षित आहे. याठिकाणी सी फॉर्मचा दुरुपयोग करुन किती रुपयांचा टॅक्स बुडविला याबाबत माननीय गृह राज्यमूंत्र्यांनी वित्त मंत्रालयाकडे विचारणा केली होती का ? असल्यास, त्याबाबत वित्त मंत्रालयाने काय सांगितले ? प्रत्यक्षात किती रुपयांचा टॅक्स बुडविला आहे ?

..३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१८३०५...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा वित्त विभागाशी संबंधित प्रश्न असून याबाबतीत आपण दोन अधिकाऱ्यांना नेमलेले आहे. हा प्रश्न वित्त वित्त मंत्रालयाकडे पाठविण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी सी फॉर्म बनावट डिटेक्ट झाले, तेव्हा त्याबाबतचा तपास करण्यासाठी ते प्रकरण गृह विभागाकडे पाठविण्यात आले. आता या प्रकरणामध्ये किती विक्रीकर बुडविला याबाबतची पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय असेसमेंट करता येणार नाही.

-----

..४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील वन जमीनी सर्वेक्षणानुसार कमी होत असल्याचे आढळून आल्याबाबत**

**(११) * १७८१५ श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे , श्री. मधुकर चव्हाण** **:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९९५ साली केंद्र सरकारने केलेल्या वन क्षेत्राच्या सर्वेक्षणानुसार किती वनक्षेत्र आढळून आले होते,
(२) यानंतर २००२ व पुढील कालावधीत केलेल्या सर्वेक्षणात वनक्षेत्र किती आढळले,
(३) सन १९९५ व त्यानंतरच्या वनजमीनीच्या सर्वेक्षणाची तुलना करता सुमारे३ लाख हेक्टर वनक्षेत्र कमी झाल्याचे आढळून आले हे खरे आहे काय,
(४) सदर वनक्षेत्र कमी होण्याची कारणे काय आहेत, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे,
(५) कारवाई केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) केंद्र शासनाच्या भारतीय वन सर्वेक्षण विभागामार्फत वनक्षेत्राचे सर्वेक्षण केल्या जात नाही. वनाच्छादनाबाबत सर्वेक्षण केल्या जाते. तथापि वनक्षेत्राची माहिती संबंधित राज्य शासनाकडून घेवून भारतीय वन सर्वेक्षण विभाग, त्यांचे स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्टमध्ये प्रकशीत करतात. त्यानुसार सन १९९५ च्या भारतीय वन सर्वेक्षण, डेहराडून स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्टमध्ये महाराष्ट्र राज्याचे वनक्षेत्र ६३८४२ चौ.कि.मी.असल्याचे नमूद केले आहे.
(२) भारतीय वन सर्व्हेक्षण, डेहराडून यांच्या स्टेट ऑफ फॉरेस्टच्या सन २००३ च्या द्विवार्षिक अहवालात ६१९३९ चौ.कि.मी.क्षेत्र असल्याचे नमूद केले आहे.
(३), (४) व (५) ३ लाख हेक्टर वनक्षेत्र कमी झाले नसून राज्यातील वेगवेगळ्या यंत्रणेकडे अधिसूचित वन क्षेत्राबाबत माहिती संकलित करण्यात येत असल्याने सदरहू आकडेवारीत तफावत दिसून येते. ही वस्तूस्थिती असली तरीही त्यांचे ताळमेळीचे काम सुरु आहे. या कार्याची व्याप्ती मोठी असल्याने यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वन क्षेत्राच्या बाबतीत आपल्या रिपोर्टमध्ये व डेहराडूनच्या रिपोर्टमध्ये फरक का ? व वन क्षेत्राच्याबाबतीत आपण एक्झॅक्ट किती दिवसांमध्ये माहिती गोळा करणार ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, याठिकाणी वनाचे संरक्षण आणि वनाच्छदन असे दोन विषय आहेत. केंद्रीय वन मंत्रालयाकडून सन १९८८ प्रमाणे ६३८४२ चौ.कि.मी.एवढे क्षेत्र असल्याचे सांगितले.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17815 पुढे सुरु.........**

श्री.बबनराव पाचपुते.........

वेगवेगळया खात्यांकडे जे वनक्षेत्र आहे त्याची तपासणी करुन त्यांच्या वर्गीकरणासंबंधीची कार्यवाही चालू आहे. ही कार्यवाही प्रत्येक गावागावात सुरु आहे व हे काम लवकरात लवकर संपविण्याचा आमचा प्रयत्न आहे. या ठिकाणी वनक्षेत्र कमी दाखविण्यात आले असले तरी सॅटेलाईटव्दारा केलेल्या सर्व्हेक्षणानुसार वनाच्छादित क्षेत्र हे सन 1995 पेक्षा वाढलेले दिसून येत आहे. सन 1995 मध्ये 43843 चौरस किलो मीटर एवढे वनक्षेत्र होते ते वाढून आता 46865 चौरस किलो मीटर एवढे झालेले आहे. विविध खात्यांकडे असलेल्या वनक्षेत्राच्या हस्तांतरणाची कार्यवाही जोरात सुरु असून लवकरात लवकर हे काम संपविले जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी कार्यवाही पूर्ण करण्याचा कालावधी एवढयासाठी विचारला होता की, महसूल खात्याकडे जे वनक्षेत्र आहे त्या जमिनी वेळेत जर वन विभागाकडे हस्तांतरीत झाल्या नाहीत तर त्या जमिनींचा विकास होऊन त्या ठिकाणी इमारती उभ्या राहतील व मग रहिवाश्यांवर दया दाखविण्यासाठी त्या नियमित करण्याचा प्रश्न निर्माण होईल. म्हणून सन्माननीय वनमंत्र्यांनी ही कार्यवाही निश्चित किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल ? याबाबतचा खुलासा करावा.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भात हायकोर्टामध्ये रिट दाखल झाले होते. मुंबई परिसरातील महसूल विभागाकडे असलेल्या वनजमिनींची नोंद आमच्या विभागाकडे आलेली असून ही कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण होईल. मुंबईव्यतिरिक्त इतर भागातील जे वनक्षेत्र विविध विभागांकडे आहे त्यांचे हस्तांतरण करण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. जरी नोटिफिकेशन झालेले असले तरी या जमिनी जोपर्यन्त वन खात्याकडे वर्ग होत नाहीत तोपर्यन्त या जमिनी आमच्या ताब्यात येऊ शकत नाहीत. मुंबई परिसरातील काम झालेले आहे इतर भागातील काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------------------

SRR/ SBT/ KGS/ MHM/ MAP/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.जयंत पाटील (वित्तमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन नियम 2006 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मसिंप 1006/(275/06)/सिंव्य (धोरण), दिनांकित 23 मे 2006.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----------------

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन 2003-2004 चा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------------------

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन 2003-2004 चा महालेखापाल-1 यांचा लेख्यांवरील लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------------------

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005-2006 या वर्षात स्थायी पदात रुपांतरीत केलेल्या अस्थायी पदासंबंधीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ KGS/ MHM/ MAP/

**<u>औचित्याच्या मुद्यासंदर्भात</u>**

श्री.कपील पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मुंबई विभागातील माध्यमिक शाळातील शिक्षकांचे पगार गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने उशिरा होत आहेत. 1 तारखेला पगार झाले पाहिजेत असे असतांना माध्यमिक शाळेतील 30 हजार शिक्षकांचे पगार 15 तारखेपर्यन्त होत नाहीत. त्यामुळे गृहकर्ज परतफेडीचे जे धनादेश शिक्षकांनी विविध बँकांना दिलेले असतात ते बाऊन्स होतात व त्यांना बँकांकडून 500 रुपये दंड होतो.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपील पाटील ...........

हे मागच्या 6 महिन्यांपासून सुरु आहे. तक्रारी देऊन, निवेदन देऊन सुध्दा कार्यवाही झालेली नाही. यासंदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी माननीय गृहमंत्र्यांचे अभिनंदन करतो. मुंबईच्या दोन प्रश्नासंबंधी त्यांनी चांगले निर्णय घेतले. 3 तारखेला मुंबईमध्ये वाहतुकीची कोंडी झाली होती. ज्यावेळी बॉम्बस्फोट झाले त्यावेळी ॲम्ब्युलन्स, बसेस, टॅक्सी रस्त्यावरुन जाऊ शकत नव्हत्या. त्यांनी वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून त्यांनी संबंधित अधिका-यांना 10 दिवसापूर्वी आदेश दिले होते. माननीय गृहमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे मुंबईमध्ये वाहतुकीची कोंडी होत आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, माननीय गृह मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी आणि याबाबत काय कार्यवाही झाली याचे कार्यवृत्त आज संध्याकाळपर्यंत सभागृहाला देण्यात यावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यांची शासनाने नोंद घ्यावी आणि संबंधित विभागाला कार्यवाही करण्यासंबंधी सूचना द्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 12 वी नंतर अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईनवर प्रवेश अर्ज भरणे सुरु आहे. परंतु त्याची बँडविड्थ कमी आहे. सायबर कॅफेमध्ये जाऊन फॉर्म भरणे ही वेळ घेणारी प्रोसेस आहे. 18 तारीख ही फार्म भरण्याची शेवटची तारीख आहे. वेब साईटची बँडविड्थ स्लो असल्यामुळे मुलांना फॉर्म भरण्यासाठी वेळ लागतो. सायबर कॅफेच्या बाहेर मुलांच्या रांगा लागलेल्या आहेत. माझी शासनाला अशी विनंती आहे की, वेबसाईटची बँडविड्थ वाढविली पाहिजे. वेबसाईटची गती कमी आहे ती वाढविली पाहिजे. सायबर कॅफेच्या बाहेर मुले ताटकळत बसलेली आहेत, तेव्हा यातून मार्ग काढावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

**सभापती** : शासनाने याची नोंद घ्यावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

--------

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या सूचनांबाबत.**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे व इतर यांनी "राज्य शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतल्याने कर्मचारी संघटनेत निर्माण झालेला असंतोष." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण व इतर यांनी "मुंबईत डेंग्यु, लेप्टो, गॅस्ट्रो, कॉलरा व ॲथॅक्स आदी साथींच्या रोगाची झालेली सुरुवात व जुलै, 2006 च्या पहिल्या सप्ताहात लेप्टोचा पहिला रुग्ण दगावणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "जळगाव (जामोद) आणि संग्रामपूर या तालुक्यांमध्ये 55 गावे व पाडयांतील भिल्ल, पावरा तसेच भिल्ल धानके या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची ग्रामपंचायतीच्या जन्म मृत्यू नोंदणी बुकात नोंद नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या संदर्भात मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण आम्ही दिलेल्या या नियम 93 खालील सूचनेवर निवेदन करण्यास सांगितले आहे. परंतु मागील आठवड्यामध्ये अशाच प्रकारे मी दिलेल्या तीन नियम 93 खालील सूचनांवर निवेदन करण्यास आपण शासनाला सांगितले होते पण आजपर्यंत निवेदन त्यावर आलेले नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, मी या नियम 93 खालील सूचनेमध्ये सातपुडा पर्वतराजीतील 55 पाड्यांमध्ये राहणारे जे भिल्ल, पावरा समाजाचे लोक राहतात त्यांना ग्रामपंचायतीची नोंद नसल्याने जातीचे प्रमाणपत्र दिले जात नाही. परिणमी तेथील या समाजाच्या मुलांवर, विद्यार्थ्यांवर अन्याय होतो आहे, त्यांना कोणत्याही शासकीय सवलतीचा लाभ मिळत नाही. त्यामुळे या सातपुडा परिसरातील भिल्ल, पावरा समाजासंबंधात दिलेल्या नियम 93 खालील सूचनेवर पुढील आठवड्यामध्ये, सोमवारी किंवा मंगळवारी आपण शासनाला निवेदन करण्यास सांगावे.

**सभापती** : ठीक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आज नियम 93 खाली दिलेल्या सूचनेवर निवेदन करण्यास शासनाला सांगितले आहे. शासनाने हे निवेदन पुढील आठवड्यामध्ये, मंगळवारी करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 13 जुलै 2006 रोजी वा त्या सुमारास मंगळवार पेठेतील कै.बाबुराव सणस कन्या शाळेतील विद्यार्थीनी कुमारी स्नेहल ऊर्फ अश्विनी चंद्रकांत गायकवाड, वय 16 वर्षे, हिने वर्गातच गळफास घेऊन केलेली आत्महत्या" या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ही बाब गंभीर असल्याने शासनाने याबाबत निवेदन करावे. मात्र हा विषय नियम 93 चा विषय होऊ शकत नसल्याने मी या सुचनेस अनुमती नाकारतो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर यांनी "मुंबई शहरातील फोर्ट परिसरात वाहनांसाठी वाहनतळ उपलब्ध न होणे, त्यामुळे होत असलेली वाहतुकीची कोंडी." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय देखील नियम 93 चा होत नसल्याने मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असल्याने शासनाने याबाबत निवेदन करावे असे मी सांगतो.

आज आलेल्या अन्य नियम 93 खालील सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे. आता यानंतर नियम 93 खाली आलेल्या सुचनांवर मी दिलेल्या निदेशानुसार शासनाकडून निवेदने करण्यात येतील.

***

..... ओ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : श्री.किशोर बोंडे या बेरोजगार युवकाने मुख्यमंत्र्यांच्या दालना समोर आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न.

**मु.शी.** : श्री.किशोर बोंडे या बेरोजगार युवकाने मुख्यमंत्र्यांच्या दालना समोर आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न याबाबत श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

----

श्री. सतीश चतुर्वेदी (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी "श्री.किशोर बोंडे या बेरोजगार युवकाने मुख्यमंत्र्यांच्या दालनासमोर आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

..... ओ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 11:40

( माननीय रोजगार मंत्र्यांच्या नियम 93 खालील निवेदनानंतर ... )

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या निवेदनामध्ये मूळ विषयालाच बगल दिलेली आहे. श्री.किशोर बोंडे या बेरोजगार युवकाने माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनासमोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता त्यामागे या सरकारचे अपयश आहे. निवडणूक काळामध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्यामुळे बेरोजगार असलेल्या युवकांमध्ये वैफल्य येण्यातून असे प्रकार होत असतात. आमचे सरकार सत्तेवर आल्यास 7 लाख जागा भरण्यात येतील अशा प्रकारची घोषणा निवडणुकीच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी राणा भीमदेवी थाटामध्ये केली होती. त्यानंतर आतापर्यंत त्या जागा भरल्याच गेल्या नाहीत. आज देखील मी या संबंधात माहिती घेण्यासाठी जीएडीमध्ये गेलो होतो तेव्हा मला माहिती मिळाली की, त्या 7 लाखा पैकी 1 लाख 35 हजार जागा अजूनही रिक्त आहेत. तेव्हा शासकीय, निमशासकीय तसेच महामंडळांमधील अशा एकूण किती जागा अद्याप रिक्त ठेवलेल्या आहेत ? निवडणुकीमध्ये दिलेली आश्वासने किती कालावधीमध्ये आपण पूर्ण करणार आहात ? तसेच नोकरी-कामधंदा न मिळाल्याने वैफल्यग्रस्त स्थितीत असलेल्या बेरोजगार युवकांना, की जे प्रसंगी आत्महत्या देखील करू शकतात, अशांच्या साठी कायम स्वरूपी उपाययोजना आपण काय करणार आहात ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, माननीय सदस्य का पहला प्रश्न यह है कि निवडणुक काल में जाहिरनामा में नौकरी देने के संबंध में जो घोषणा की गई थी, वह कब तक पूरी होगी. निवडणुक काल में राजकीय पक्ष की तरफ से जो घोषणा की जाती है, वह 5 वर्ष की कालावधि के लिए होती है. अभी सरकार को 2 वर्ष भी पूरे नहीं हुए हैं. इसके पहले भी लाखों लोगों को रोजगार देने के संबंध में घोषणाएं हुई हैं, उन घोषाणाओं की क्या स्थिति हुई, यह पूरे राज्य को मालूम है. हमारी ओर से की गई घोषणाओं को पूरा करने के लिए घोषणा पत्र की कमेटी है और वह कमेटी इस बारे में विचार करती है. यह घोषणा 5 वर्ष के लिए रहती है.

माननीय सदस्य का दूसरा प्रश्न है कि उस युवक ने आत्महत्या करने का प्रयास किया है तो शासन क्या कर रहा है. वह युवक 10 वीं पास है, उनका नाम मुंबई के रोजगार कार्यालय में रजिस्टर्ड है तो योग्यता के अनुसार सीनियरिटी से जब कॉल आएगा, शासन उनकी जरुर मदद

...o-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सतीश चतुर्वेदी जारी

करेगा. कोई भी सरकारी नौकरी के लिए टाइपिंग या कम्प्यूटर की जानकारी आवश्यक होती है. टाइपिंग और कम्प्यूटर की जानकारी उनके पास न रहने की वजह से योग्यता के अनुसार जो भी कॉल आएगा, शासन की ओर से पूरी मदद दी जाएगी.

सभापति महोदय, माननीय सदस्य ने तीसरा सवाल पूछा है कि कितनी सरकारी नौकरियां रिक्त हैं. सन् 2001 में शासकीय पद भरने के बारे में बंधन लाया गया था, ताकि सरकार का खर्च कम हो. सन् 2004 के आदेश के अनुसार मुख्य सचिव की अध्यक्षता में हर डिपार्टमेंट को रिक्त पदों के बारे में आढावा लेना है. जिन डिपार्टमेंट का आढावा पूर्ण हो गया है, उन डिपार्टमेंट के अन्दर भर्ती शुरु हो गई है. मागासवर्गीय लोगों का बॅकलॉग पूरा करने के लिए भर्ती शुरु है. यह युवक विशेष मागासवर्गीय प्रवर्ग का है. शासन ने बॅकलॉग भरने के हिसाब से भर्ती शुरु की है. जिन डिपार्टमेंट का आढावा पूर्ण नहीं हुआ है, उसमें 50 प्रतिशत भर्ती करने के शासन की तरफ से आदेश दिए गए हैं.

. . . नंतर सरफरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, श्री. किशोर बोंडे या तरुणाने आत्महत्तेचा प्रयत्न केला त्यावेळी अनेक मंत्र्यांचे वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले स्टेटमेंट वाचले की, मुख्यमंत्र्यांच्या दालनासमोर आत्महत्त्या करुन नोकरी मिळणार आहे काय? तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी पाच ते सहा महिन्यात 5 लाख तरुणांना नोकऱ्या देऊ अशी घोषणा केली होती. त्यामुळे अनेक तरुण माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनासमोर नोकऱ्या मागण्यासाठी येतात. तेव्हा श्री. बोंडेवर ज्याप्रमाणे आपण आत्महत्तेचा गुन्हा दाखल केला आहे, त्याप्रमाणे खोटी घोषणा करणाऱ्या मुख्यमंत्र्यांवर देखील गुन्हा दाखल करणार काय? त्यावेळी मुख्यमंत्री ती जाहिरनाम्यातील प्रिटींग मिस्टेक होती असे म्हणाले होते. तेव्हा श्री. बोंडे यास माननीय मुख्यमंत्र्यांचे स्टेटमेंट खरे वाटले, ते या राज्याचे पालक आहेत, ते आपल्याला नोकरी देतील. परंतु नोकरी न मिळाल्यामुळे व नैराश्य आल्यामुळे त्याने आत्महत्तेचा प्रयत्न केला. तेव्हा आपण त्याला नोकरी देऊ नका, परंतु त्याच्यावर लावलेला आत्महत्तेचा गुन्हा आपण मागे घेणार काय?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, माननीय सदस्य ने पहले जो मूल प्रश्न पूछा था, वह निवडणुक काल के जाहिरनामे के बारे पूछा था. अब उन्होंने पूर्व मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे जी की घोषणा के बारे में सवाल पूछा है. उन्होंने जो घोषणा की थी, उसके बाद उनका खुलासा भी आया है. वह आप पढ़ लीजिए. जाहिरनामे के बारे में मैने पहले ही उत्तर दे दिया है कि वह 5 साल के लिए है.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी जाहीरनाम्याचा उल्लेख केलेला नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या निवेदनासंबंधी

**सभापती** : नियम 93 चे दुसरे निवेदन...

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे नियम 93 चे दुसरे निवेदन पुनर्वसन खात्यासंबंधी आहे. या खात्याचे माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम हे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. माझा यासंबंधी हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेते म्हणाल्याप्रमाणे अधिवेशनाचा दुसरा आठवडा संपत आला तरी पहिल्या आठवडयातील निवेदनावर चर्चा होत आहे. काल फक्त दोनच निवेदनावर चर्चा झाली. सभापती महोदय, आपण निदेश दिल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी सभागृहामध्ये निवेदन करण्यात येते, तशी प्रथा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,...

श्री. जयंत प्र. पाटील : परंतु दोन-दोन आठवडे झाले तरी निवेदने वेळेवर येतच नाहीत. आणि जर निवेदन वेळेवर आले तर संबंधित मंत्री सभागृहामध्ये उपस्थित राहत नाहीत. ही जी नवीन प्रथा पडत आहे, ती बरोबर नाही.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलावयास उठल्यानंतर माननीय सदस्यांनी खाली बसावयाचे असते, अशी प्रथा आहे. तेव्हा आपण ही प्रथा पाळली पाहिजे. कृपया आपण खाली बसावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मघाशी यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. 93 ची निवेदने नियमाप्रमाणे या ठिकाणी उपस्थित केली जातात. त्यामध्ये अत्यंत महत्वाचे विषय असतात. लक्षवेधी सूचना लागत नाहीत, इतर आयुधांमध्ये ते प्रश्न बसत नाहीत, म्हणून 93 च्या सूचना दिल्या जातात. त्यावर निवेदन करावे, असे आपण आदेश देता. परंतु अधिवेशनचा कालावधी संपेपर्यन्त 93 ची निवेदने शासनाकडून येत नाहीत. आमचा मागच्या अधिवेशनाचा अनुभवही असाच आहे. त्यामुळे शासनाकडून येथे निवेदने येण्यासाठी कालमर्यादा घातली पाहिजे. सभापती महोदय,आपण निवेदन करा, असे आदेश दिल्यानंतर दोन-तीन दिवसामध्ये त्या विषयातील निवेदन येथे आले पाहिजे.

श्री.विलास अवचट : काही सन्माननीय सदस्यांची 93 ची निवेदने विभागाकडून येतात, परंतु मंत्रीमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नसतात. अशावेळेस किमान त्या विभागाचे राज्य मंत्री महोदय तरी उपस्थित असायला पाहिजेत.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : एप्रिल महिन्यामध्ये आपण माझ्या सूचनेवर निवेदन करा, असे सांगितले होते. परंतु अजून निवेदन आलेले नाही. त्यानंतर मी आपल्याला आठ दिवसापूर्वी याबाबत पत्र दिले, ते आपण विभागाकडे पाठविले, तरीही अजून निवेदन आलेले नाही.

**सभापती** : संसदीय कामकाज राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत. त्यांनी सर्व विभागाच्या मंत्री महोदयांना सूचना द्याव्यात. संबंधित विभागाचे जे कोणी अधिकारी, कर्मचारी उपस्थित असतील त्यांनी दररोज 93 च्या सूचनेवर काय निर्णय दिला, त्याचे त्यांनी टाचण करावे. त्याचबरोबर मी विधिमंडळ सचिवालयाला सांगेन की, निवेदन करण्याबाबत मी सूचना दिल्या असतील तर त्या विभागाकडे त्या पाठवून द्याव्यात. या आठवड्याचा विचार केला तर आपले कामकाज तीन दिवस अनेक कारणांमुळे पुढे ढकलले गेले. मला वाटते, काल चार निवेदनांवर चर्चा झाली. आज एकूण चार 93 ची निवेदने आहेत. त्यापैकी एका निवेदनाच्या संदर्भात सभागृहात राज्यमंत्री, मंत्री उपस्थित नसणे ही पध्दती बरोबर नाही. त्यांना माझी नापसंती कळवावी. आज मंत्रीमहोदय उपस्थित राहिले तर ते निवेदन आज घेतले जाईल. अन्यथा ते सोमवारी घेण्यात येईल. असा प्रसंग कोणत्याही परिस्थितीत येऊ नये, अशी दक्षता घेणे गरजेचे आहे.

श्री.राजेश टोपे : आपण दिलेल्या सूचनांची निश्चितपणे गांभीर्याने नोंद घेतली जाईल आणि सर्व संबंधित मंत्री महोदयांना कळविले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.जयंत प्र.पाटील : मी गेली तीन अधिवेशने झाली पहात आहे की, 40-50 निवेदने एकदम सभागृहासमोर सादर करण्याची प्रथा सुरु झालेली आहे. त्यावर चर्चा होऊ नये,असाच उद्देश दिसतो. ही गंभीर बाब आहे. गेली तीन अधिवेशने शेवटच्या दिवशी 40 निवेदने एकावेळी आलेली आहेत. तीन आठवडे अधिवेशन चालते, असे असतांना शेवटच्या दिवशी निवेदने सादर केली तर चालू शकते, अशी त्यांची भावना झालेली आहे. आमची अपेक्षा निवेदनावर चर्चा व्हावी, अशी आहे. यावर कडक बंधन आणावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी निर्णय घेतलेला आहे की, किमान दररोज पाच निवेदने झाली पाहिजेत. या अनुषंगाने हिशोब केला तर एका आठवडयामध्ये 25 निवेदने होतील. मी जर 93 च्या सूचना 30-40 स्वीकारल्या असतील, त्यापैकी किमान 25 सूचनांवर निवेदने या ठिकाणी झाली पाहिजेत. अशाप्रकारच्या माझ्या स्टँडींग ऑर्डर्स आहेत, या सूचना सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी त्या त्या विभागाच्या मंत्र्याना कठोरपणाने देण्याची व्यवस्था करावी.

--

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लोटे परशुराम येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये होत असलेले स्फोट.

**मु.शी.** : लोटे परशुराम येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये होत असलेले स्फोट याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "लोटे परशुराम येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये होत असलेले स्फोट" .या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असतांना, मी आपल्या अनुमतीने या निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो.

निवेदनामध्ये चौथी जी कंपनी दाखविलेली आहे त्यामध्ये "हरिश्री ॲरोमॅटिक यांची चौकशी चालू आहे", असे म्हटलेले आहे त्याऐवजी आहे. "चौकशी पूर्ण झालेली आहे आणि भोगवटादारावर केसेस भरण्याच्या अनुषंगाने नोटिस पाठविलेली आहे, पुढची कारवाई चालू आहे," असे वाचावे.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यान्नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एक गोष्ट मी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. परवा बॉम्बस्फोट झाले त्याबद्दल आपण श्रध्दांजली अर्पण केली. त्या ठिकाणी हे दुसरे बॉम्बस्फोट करणारे लोक आहेत. निवेदनामध्ये पाच सहा उल्लेख केलेले आहेत. त्यांच्यावर जे खटले भरले ते प्रलंबित आहेत. त्या ठिकाणी हे लोक जनतेच्या जीविताशी खेळत आहेत. हे कारखाने कोकणातील असल्यामुळे दुर्लक्ष करावयाचा असा अर्थ नाही. निवेदनामध्ये जी वस्तुस्थिती दिलेली आहे त्यामध्ये गावकऱ्यांची बैठक घेणे वगैरेबाबत उल्लेख आहे. हे सगळे निवेदन दिशाभूल करणारे आहे. निवेदनामध्ये पृष्ठ क्रमांक ३ वर असे म्हटले आहे की, लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे भुयारी गटर यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. वसाहतीतून कारखान्यांचे प्रक्रिया केलेले सांडपाणी या यंत्रणेव्दारे एका साठवण टाकीमध्ये आणले जाते व या साठवण टाकीच्या जवळ सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्र उभारण्यात आलेले आहे. हे साफ खोटे आहे. गेल्या दोन महिन्यांमध्ये त्या ठिकाणी अनेक अपघात झाले. गावकऱ्यांनी निदर्शने केली, रास्ता रोको आंदोलन केले. निवेदनामध्ये शेवटी थोडे सत्य सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे स्थानिक अधिकारी, इंडस्ट्रियल असोसिएशनचे पदाधिकारी, सीईटीपीचे अध्यक्ष व सदस्य, सरपंच व ग्रामस्थ यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये एमआयडीसीमधील पावसाच्या पाण्याच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारामध्ये काही कारखान्याचे सांडपाणी सोडले जात आहे, असे सांगण्यात आले. यासंबंधी संयुक्त पाहणी करण्याचे काम महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यावतीने सुरु करण्यात आले आहे. ही सुरुवात केव्हा केली आणि त्यामध्ये काय सापडले ? त्यासंबंधी शासन कोणती कारवाई करणार आहे ? दुसरा प्रश्न असा की, लोटे भाळवाडी व चाळकेवाडी या वाड्या थोड्याच अंतरावर आहेत. स्फोट झाला की, लोक बाहेर पडतात. त्यांचे पुनर्वसन त्या ठिकाणी निवासी क्षेत्रामध्ये करणार काय ? त्या ठिकाणी वारंवार प्रदुषणाचा प्रश्न निर्माण होतो तसेच त्या ठिकाणी स्फोट होऊन माणसे जखमी होतात. काही लोक मृत्युमुखी पडतात. त्या ठिकाणी प्रदुषण नियंत्रण मंडळ अधिक सक्षम करण्यासाठी प्रयोगशाळा आणि कार्यालय निर्माण करणार काय ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, कोणतीही कंपनी स्थापन करण्यापूर्वी कन्सेप्टीव एस्टॅब्लिशमेंट दिली जाते. कंपनी सुरु करण्यापूर्वी केमिकल कारखाना असेल तर त्या कारखान्याच्या प्रक्रियेमध्ये जे केमिकल्स वापरले जाणार आहेत ते केमिकल्स बाधक असतील तर ते सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांनी एफ्ल्युएंट ट्रिटमेंट प्लँट बांधणे सक्तीचे असते. त्यांच्याकडून प्रक्रिया केलेल्या पाण्यावर नंतर कॉमन एफ्ल्युएंट ट्रिटमेंट प्लँटमध्ये प्रक्रिया केली जाते आणि विहित प्रमाणामध्ये बीओडी आणि सिओडी आल्यानंतर ते पाणी समुद्रामध्ये सोडले जाते. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांनी सांगितले ते खरे आहे की, लोकांना भीती वाटते. मागे काही ठिकाणी ओव्हर फ्लो झाला होता. काही कंपनीच्या मालकांनी निष्काळजीपणा दाखविला होता. त्यांच्यावर कारवाई केली होती. तेथील औद्योगिक वसाहतीमध्ये जाऊन मी स्वत: बैठक घेतली होती. त्यावेळी अधिकारी आणि स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते. भविष्यामध्ये अशा घटना घडणार नाहीत याची दक्षता घेतलेली आहे. त्यानंतर अशी घटना घडलेली नाही. स्फोटाबाबत सांगावयाचे म्हणजे एका कंपनीमध्ये एका कामगारचा मृत्यू झालेला आहे आणि एक कामगार जखमी झालेला आहे. ज्या भोगवटादाराने निष्काळजीपणा केला त्यांच्यावर केसेस भरलेल्या आहेत. अन्य 4 ठिकाणी स्फोट झाले परंतु त्या ठिकाणी मनुष्यहानी झालेली नाही. औद्योगिक सुरक्षा आणि औद्योगिक परिसरामध्ये अलर्ट करणारी किंवा प्रशिक्षण देणारी शासनाची जी यंत्रणा आहे त्या माध्यमातून त्या ठिकाणी जो मालकवर्ग आहे किंवा जो कामगारवर्ग आहे त्यांच्याशी सातत्याने संपर्क साधून स्फोटच्या अनुषंगाने दक्षता घेण्याबाबत प्रशिक्षण दिले जाते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्या सात अधिवेशनांमध्ये प्रत्येक वेळी लोटेपरशुराम येथे झालेल्या एका तरी स्फोटाचा विषय येतो. चार प्रकरणे मी स्वत: मांडलेली आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच माजी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी दोन तीन प्रकरणे मांडलेली होती. महाराष्ट्रात केमिकल झोन फक्त लोटे येथेच आहे काय आणि त्याच ठिकाणी अपघात होतात काय ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:00

(श्री. विनोद तावडे..

याबाबतीत दखल घेतली जात आहे असे वारंवार उत्तर दिले जाते. तेथील लोक त्या औद्योगिक वसाहतीमध्ये कामाला असल्यामुळे त्यांच्या तक्रारी ते आमच्याकडे मांडत असतात. माननीय मंत्री महोदयांनी तेथील लोकप्रतिनिधींना बरोबर घेऊन त्या वसाहतीला भेट द्यावी म्हणजे तेथील स्थानिक लोकांचे या रासायनिक स्फोटांबाबत काय काय म्हणणे आहे हे समजू शकेल. तेव्हा स्थानिक नागरिक, लोकप्रतिकनिधी, सरकारी यंत्रणा, स्वत: मंत्री महोदय, या सर्वांची एक व्हिजिट त्याठिकाणी करण्यात येईल काय ?

श्री. गणेश नाईक : मी एक वर्षापूर्वी त्या परिसरामध्ये भेट देऊन तेथील कारखान्यांचे प्रतिनिधी, कामगारांचे प्रतिनिधी, स्थानिक प्रतिनिधी यांची बैठक लावली होती. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांचा आग्रह असेल तर तशी बैठक लावण्यात येईल. परंतु माझे म्हणणे असे आहे की, यंत्रणा कार्यक्षमतेने काम करीत आहे. दिनांक 10.7.06 रोजी एमआयडीसीचे अधिकारी, उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांची बैठक घेण्यात आलेली होती. निरीक्षक वाढविण्यात येणार आहेत. हे अपघात कसे टाळले जातील यानुषंगाने कामगारांना देखील प्रशिक्षण दिले जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे दीड वर्षापूर्वी तेथील पाण्याच्या प्रदुषामुळे मासे मेले होते. स्थानिक शेतक-यांनी तक्रार केल्यानंतर मी तेथे भेट दिली. त्यानंतर तसा प्रकार घडला नाही. देशाच्या कानाकोप-यामध्ये जेथे जेथे असे रासायनिक कारखाने आहेत त्याठिकाणी अपघात होत असतात. काही ठिकाणी हे अपघात निष्काळजीपणामुळे तर काही ठिकाणी सबस्टॅण्डर्ड साधने, आयुधे वारपल्यामुळे अपघात होतात. सबस्टॅण्डर्ड साधने, आयुधे वापरणा-यांवर कारवाई केली जाते. त्याठिकाणी व्हिजिट करण्याचे नेमके प्रयोजन काय, हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे. जर एखाद्या छोट्या रिॲक्टरमधून स्टीम बाहेर निघाली तर ती व्हिजिट करण्यासारखी बाब नाही. त्याठिकाणी कोणतीही गंभीर अशी घटना घडलेली नाही. त्यामुळे तेथे व्हिजिट करण्याचे काही प्रयोजन नाही असे मला वाटते.

डॉ. दीपक सावंत : त्याठिकाणी व्हिजिट करण्याची गरज नाही असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. त्याठिकाणच्या एक कि.मी. रस्त्यावरुन आपण जरी ए.सी. गाडीतून गेलो तरी आपला श्वास कोंडतो ही वस्तुस्थिती आहे. मग तेथील रहिवाशी कसे राहात असतील ? मंत्री महोदयांनी त्या औद्योगिक वसाहतीतील यंत्रसामग्री तपासून पहावी. तेथील हवेमध्ये ऑक्सिजन, हायड्रोजन,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

कार्बनडायऑक्साईड, हायड्रो सफाईड, नायट्रोजन सल्फाईड यांचे प्रमाणे किती आहे हे प्रदुषण माफकयंत्राने तपासून त्याचा अहवाला देण्यात येईल काय ?

श्री. गणेश नाईक : औद्योगिक सुरक्षेच्या संदर्भात जे नियम केलेले आहेत त्यानुसार विहित कालखंडामध्ये कारखान्यातील यंत्रांची तपासणी अतिशय काटेकोरपणे केली जाते. असे असताना देखील काही अपघात घडतात. मुद्दा असा आहे की, महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: कोकणामध्ये औद्योगिकीकरण झाल्यानंतर पाण्याचे प्रदुषण झाले, हवेचे प्रदुषण झाले. त्याबाबतीत उपाययोजना आपण करीत आहोत. आता मुंबईतील दुषित हवेचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहेत. रासायनिक कारखान्यांमुळे तेथील आजूबाजूच्या परिसरामध्ये विशिष्ट प्रकारचा वास येत असतो. परंतु तो वास बाधक आहे असे नाही. अशा कारखान्यांची वारंवार तपासणी होत असते. एखादी चुकीची गोष्ट केलेली असेल तर त्याबाबतीत कारवाई केली जाते. सन्माननीय सदस्यांनी एखादी बाब निदर्शनास आणली तर त्याबाबतीत निश्चित कारवाई केली जाईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : या सदनामध्ये या प्रदुषणाच्या विषयावर वारंवार चर्चा होत असते. ज्या ज्या ठिकाणी औद्योगिक वसाहत आहे मग ती महाडमध्ये असेल, रोहा येथे असेल, चिपळूणमध्ये असेल, ...

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.........

तेच तेच ठराविक प्रश्न सभागृहात मांडले जातात आणि तीच तीच उत्तरे दिली जातात. विभागाचे मत आहे की, सर्व काही ठिकठाक आहे. ठाणे जिल्हयामध्ये ठाणे जिल्हयातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी पालकमंत्री महोदय जनता दरबार भरवितात. असा जनता दरबार चिपळूण, रोहा, महाड याठिकाणी भरवून तेथील जनतेचे प्रश्न मंत्रीमहोदय जाणून घेतील का?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी बाब मांडली आहे, मी सुध्दा विनोदाने म्हणायचो, एस.टी.बसमध्ये बसल्यानंतर डोळे उघडायची गरज नाही. विविध केमिकल्सच्या गंधाने किंवा सुगंधाने कोणता परिसर आला हे कळते. परंतु यामध्ये आता बदल घडत चालला आहे. हवेच्या प्रदुषणावर, पाण्याच्या प्रदुषणावर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी जनता दरबारचा उल्लेख केला. ठाणे जिल्हयाचा पालकमंत्री या नात्याने माझा दर शुक्रवारी सकाळी ठाणे येथे, दुपारी नवी मुंबई येथे, शनिवारी भाईंदर, कल्याण, डोंबिवली येथे जनता दरबार भरविण्याचा कार्यक्रम सुरु असतो. मी रायगड जिल्हयाचा पालकमंत्री नसलो तरी सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे, त्या परिसरात 3-4 महिन्यांनी किंवा 6 महिन्यातून एकदा असा दरबार भरविण्याच्या अनुषंगाने निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : या निवेदनामध्ये म्हटले आहे की, रस्त्याच्या कडेला असलेल्या पावसाळी पाण्याच्या गटारामधून सांडपाणी सोडले जाते की नाही याची संयुक्त पाहणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केली. ही पाहणी केव्हा केली व त्यात काय सापडले? दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे. मंत्रीमहोदयांनी त्या ठिकाणी नजिकच्या काळात भेट द्यावी म्हणजे यंत्रणा कशी टाकावू आहे, कालबाह्य झाली आहे हे आम्ही दाखवून देऊ. केवळ माणसांच्या जीवाशी खेळ खेळत आहात. पाहणी केव्हा केली आणि पाहणीत काय आढळले?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, जे घटक पाण्याच्या प्रदुषणाला, हवेच्या प्रदुषणाला जबाबदार ठरतात अशा सर्व घटकांवर तात्काळ कारवाई केली जाते. सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण व श्री.विनोदजी तावडे यांचा त्या परिसरातील भेटीबाबत आग्रह असेल तर त्यांच्या खर्चाने जाण्याऐवजी आपण सर्वजण एकत्र जाऊ. पूर्वीच्या कालखंडातील एकूण घडलेल्या घटनांच्या

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 12:05

श्री.गणेश नाईक........

अनुषंगाने कारवाई केलेली आहे.......(अडथळा)... या मायनर घटना आहेत...(अडथळा)...मायनर म्हणजे नॉन कॉग्निजेबल घटना आहेत. एखाद्या स्टोव्हचा स्फोट होतो, मोठ्या रिॲक्टरचा सुध्दा स्फोट होऊ शकतो. कोणत्या बाबीचे गांभीर्य ठेवायचे हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांची त्या परिसरातील नदीची, नाल्यांची पाहणी करावयाची इच्छा असेल, तेथील गावकऱ्यांबरोबर चर्चा करावयाची असेल, परंतु माझ्याकडे जो अहवाल प्राप्त झाला आहे त्यानुसार तेथे जाऊन पाहणी करावी अशी निकड नाही. सन्माननीय सदस्यांचा आग्रहच असेल तर आम्ही तेथे व्हीजिट करु.

(नंतर श्री.जुन्नरे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी कंपनीच्या संदर्भात बरीचशी चर्चा झालेली आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे की, इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीजने या कंपन्यांना कधी आणि किती वेळा भेटी दिल्या होत्या?व्हीजीट बुकात कोणकोणत्या नोंदी केलेल्या आहेत? तसेच त्यांच्या गेल्या चार महिन्यातील अहवाल आणि शिफारशी काय होत्या? स्फोट होण्याच्या शक्ते संदर्भात त्यांनी काही उल्लेख केला होता काय? तसेच इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीजने दिलेल्या शिफारशींच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या कंपन्यामध्ये जे स्फोट झाले त्यामध्ये जे कामगार मृत झाले, जखमी झाले, त्यांना काय भरपाई दिली, यासंदर्भात काय कार्यवाही केली अशा संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी विचारले आहे की, इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीजने किती भेटी दिलेल्या आहेत व त्यांनी कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत. परंतु इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीजने या कंपन्यांना कधी आणि किती वेळा भेटी दिल्या याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. कंपनीत स्फोटामुळे झालेल्या मृत कामगारांना, तसेच जखमी झालेल्या कामगारांना दिलेले पैसे, केलेली कार्यवाही यांसदर्भातील सर्व माहिती मी सभागृहाला पटलावर ठेवतो. कामगार खाते आपल्या जबाबदा-या ओळखून योग्य प्रकारे काम बजावत आहे. अपघात होऊ नये यासाठी कामगार खाते लक्ष देत असते. अपघात होता कामा नये यासाठी एमआयडीसीचे उद्योग प्रतिनिधी, कामगार युनियनचे प्रतिनिधी, संचालक औद्योगिक यांच्या वेळोवेळी बैठका होत असतात.

---------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाने अनुकंपा तत्वारील नियुक्त्या बंद करणे.

**मु. शी.** : शासनाने अनुकंपा तत्वारील नियुक्त्या बंद करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, यांनी "शासनाने अनुकंपा तत्वारील नियुक्त्या बंद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार तरुणांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.. अनुकंपा तत्वावर मयत झालेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांना नोकरीत सामावून घ्यावे यासाठी दिनांक 3 जुलै, 2006 रोजी मराठवाडयातील शेकडो तरुणांनी आझाद मैदानावर घरणे आंदोलन केले होते. सध्या अनुकंपाच्या संदर्भात मोठया प्रमाणात घोळ चालू आहे. पूर्वी अनुकंपाची यादी कलेक्टरांकडे असायची परंतु मध्यंतरी यासंदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित झाल्यामुळे आता हे अधिकार नियुक्ती अधिका-याला देण्यात आलेले आहेत. 7-8 वर्षापासून अनुकंपा तत्वावर बेरोजगारांना नोक-या मिळालेल्या नाहीत. निवेदनातील पृष्ठ क्रमांक 2 वर म्हटले आहे की, " राज्य शासनाने सरळसेवा भरतीसाठी मागासवर्गीयांकरिता एकूण 52 टक्के उभे आरक्षणा व्यतिरिक्त प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, अपंग महिला, खेळाडू अशा विविध घटकांना जे समांतर आरक्षण विहित केले आहे, त्या घटकांतील उमेदवारांना त्यांच्या प्रमाणात सेवा भरतीचा वाटा मिळणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे अनुकंपा तत्वावरील नियुक्त्याकरिता काही मर्यादा घालणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा सामाजिक तसेच इतर घटकांकरिता विहित केलेल्या आरक्षणाची पूत्रता होऊ शकणार नाही. यासर्व परिस्थितीचा विचार करुनच अनुकंपा नियुक्तीसाठी प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांपैकी 5 टक्के पदे अनुकंपा नियुक्तीसाठी नियम करण्याचा राज्य शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला असून तसे आदेश दि. 22/8/2005 रोजी निर्गमित केले आहेत. तसेच पुढे असे म्हटले आहे की, वित्त विभागाने पदांचा आढावा घेऊन आकृतीबंध निश्चित होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील पदे भरण्यावर निर्बंध घातले होते. तथापि हे निर्बंध नंतर दि. 1.7.2004 च्या शासन निर्णयाद्वारे वित्त विभगाने काही प्रमाणात शिथिलही केले आहेत. मात्र वित्त विभगाचे निर्बंध हे एकमेव कारण पदे उपलब्ध न हाण्यास पुरेसे नाही. या आढाव्याअंती अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-यांना इतर कार्यालयातील पदांवर सामावून घेणे, रोजगार हमी योजनेतील हजेरी सहाय्यकांना मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशान्वये शासकीय सेवेत सामावून घ्यावे लागणे, यामुळे देखील अनुकंपाप्रमाणेच इतर घटकांतील उमेदवारांच्या नियुक्त्यांवर काही मर्यादा आल्या ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

मात्र आता काही प्रमाणात का होईना अनुकंपा नियुक्या मिळण्याची निश्चिती झाली आहे. एका बाजुला असे म्हटले आहे की, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्यावर मर्यादा घालणे आवश्यक आहे. तर दुसऱ्या बाजुला अनुकंपा तत्वावर काही प्रमाणात का होईन नियुक्त्या मिळण्याची निश्चिती झाली आहे. म्हणजे नेमके खरे काय आहे ? अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी सूटसूटीत पध्दत का अवलंबिण्यात येत नाही ? ज्यांच्या कुटुंबातील माणूस जाऊन 10-10 वर्षे झाली तरी त्या कुटुंबातील बेरोजगार तरुणांना नोकरी मिळत नाही. तेव्हा शासन याबाबतीत कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विधानसभा सभागृहात अर्थसंकल्पीय अधिवेशामध्ये एप्रिल 2005 मध्ये या विषयावर लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली होती. त्यावेळी सदस्यांनी सांगितले की, अनुकंपा नियुक्तीकरिता जिल्हाधिकाऱ्यांकडे एकत्रित प्रतिक्षासूची ठेवण्याची पध्दत रद्द करुन संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांना अनुकंपा नियुक्तीचे अधिकार देण्याबाबत सांगितले होते. तेव्हा सभागृहाची एकूण भावना लक्षात घेऊन दिनांक 22.8.2005 च्या शासन निर्णयाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येणारी प्रतिक्षासूची रद्द करुन नियुक्ती अधिकाऱ्यांना गट "क" व "ड" पदांवर अनुकंपा नियुक्ती देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. राज्य शासनाने सरळसेवा भरतीसाठी मागासवर्गीयांकरिता एकूण 52 टक्के आरक्षण दिलेले आहे त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी 5 टक्के, अपंगासाठी 3 टक्के, महिलांसाठी 30 टक्के, खेळांडूसाठी 5 टक्के, माजी सैनिक यांसाठी आरक्षण ठेवलेले आहे. तसेच अंशकालीन पदवीधर यांना सुध्दा प्राधान्य दिलेले आहे.............

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करण्याचा विषय चर्चेसाठी आहे. माननीय मंत्रिमहोदय 52 टक्के आरक्षणासंबंधी सांगत आहेत. त्याचा या प्रश्नाशी काहीही संबंध नाही. आम्ही नियम 93 अन्वये अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबत होत असलेल्या विलंबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सभागृहाला अधिकची माहिती देत आहे. आरक्षणाची पध्दत कोणती आहे याबाबतची माहिती देत आहे. मी वेगळा विषय मांडत नाही. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी सर्वसाधारणपणे केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे असतात. अनुकंपा तत्वासंबधी केंद्र शासनाचे जे धोरण आहे तेच धोरण राज्य शासनाने स्वीकारलेले आहे. केंद्र शासनामध्ये अनुकंपा तत्वासाठी 5 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे त्याप्रमाणे येथेही वर्ग "क" आणि "ड" साठी 5 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार दोन वर्षापूर्वी 750 जणांना अनुकंपातत्वावर नोकरी देण्यात आलेली आहे. अनुकंपा हा वारसाचा हक्क असू शकत नाही, ही फक्त अतिरिक्त सवलत आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, अनुकंपा नियुक्तीकरिता कोणतेही आरक्षण नाही. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 5 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. तसेच अनुकंपा नियुक्तीसाठी जी वेटींग लिस्ट करण्यात येणार आहे त्या वेस्टींगलिस्टच्या 5 टक्के आरक्षण ठेवणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 5 टक्के याचा अर्थ वर्षभरामध्ये ज्या रिक्त होणाऱ्या जागा आहेत त्या जागेवरील 5 टक्के जागा अनुकंपा तत्वावरील नोकऱ्यांसाठी ठेवण्यात याव्यात. अनुकंपाच्या बाबतीत केंद्र शासनाचे धोरण आहे व इतर राज्यांचे जे धोरण आहे याचा अभ्यास करुनच अशा प्रकारचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे व त्यानुषंगानेच शासन निर्णय निर्गमित केला आहे. हा निर्णय सर्वच विभागासाठी आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, पूर्वी जर शासकीय किंवा निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या वारसांना कागदपत्रांची सर्व पूर्तता करुन 2-4 महिन्यांमध्ये नोकरी मिळत असे. परंतु आता केंद्रीय पध्दती आल्यामुळे अनुकंपाची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येते व 8-10 वर्षापर्यंत ही प्रतिक्षा यादी तशीच राहते, त्यामध्ये कोणालाही नोकरी मिळत नाही. त्यामध्ये भ्रष्टाचारही होण्याची शक्यता असते. त्यामुळे एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असेल तर त्याच्या वारसांना लवकरात लवकर, विहित मुदतीत अनुकंपा तत्वावरील नोकरी देण्यासंबंधी सुटसुटीत धोरण शासन स्वीकारणार का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आता आपण जो शासन निर्णय काढला आहे तो अतिशय व्यवस्थितपणे काढलेला आहे. त्यामध्ये आपण अनुकंपाच्या बाबतीत 40 वर्षांची वयोमर्यादा दिलेली असून एक वर्षापर्यंत मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांनी नोकरीसाठी अर्ज करण्यासंबंधीचा त्यामध्ये नियम आहे. सभापती महोदय, पूर्वी अनुकंपा तत्वावरील नोकरी लवकर मिळत नव्हती, हे मी मान्य करतो. पूर्वी या विषयी सुस्पष्टता नव्हती. त्यामुळेच आपण यासंदर्भात अतिशय चांगल्या प्रकारचा स्पष्ट असा शासन निर्णय काढलेला आहे. याबाबतीत नियुक्ती प्राधिकाऱ्यास आपण सिनिऑरिटी यादीचे अधिकार दिलेले आहेत. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही अशी एक यादी आपल्याकडे ठेवता येईल, अशा प्रकारे शासन निर्णयात अधिकार दिलेले आहेत. तसेच, दर सहा महिन्याला अनुकंपा तत्वाच्या लोकांच्या भरतीचा आढावा घेण्याच्या संदर्भातही शासन निर्णयामध्ये स्पष्ट करण्यता आले आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय जे सांगत आहेत, ते रास्त आहे. परंतु यासंदर्भात सुप्रिम कोर्टाने असा निर्णय दिला आहे की, नोकर भरतीच्या 5 टक्के जागा अनुकंपा तत्वावर भराव्यात. आता आपल्याकडे नोकर भरतीच होत नाही, त्यामुळे आपण त्या कुठून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

भरणार ? त्यामुळे याला डायर्व्हशन करावे लागेल व यामध्ये धोरणात्मक बदल करण्याची आवश्यकता आहे. आपण सुप्रिम कोर्टाचे क्लॅरिफिकेशन घेण्याच्या दृष्टीने तशा प्रकारचा प्रस्ताव आपण पाठवावा. त्यामुळे आपण अशा प्रकारचा प्रस्ताव पाठवून शासन सुप्रिम कोर्टाकडून क्लॅरिफिकेशन घेईल का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याबाबतची नोंद घेण्यात आली आहे.

------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 52 टक्के ओ.बी.सी.प्रवर्गाला 19 टक्के शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे

**मु. शी.** : 52 टक्के ओ.बी.सी.प्रवर्गाला 19 टक्के शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे यासंबंधी सर्वश्री सुधारकर गणगणे, संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुधाकर गणगणे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील 52 टक्के ओ.बी.सी. प्रवर्गाला 19 टक्के शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात येणे, परंतु त्यांना वेळोवेळी पदोन्नती देण्यापासून डावलण्यात येणे, यावर शासनाकडे लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करुनही शासनाने विशिष्ट कालवधीत आदेश देण्याचे आश्वासन देऊन कोणतीच कार्यवाही न होणे या महत्वाच्या प्रश्नावर कोणतीच कार्यवाही न झाल्याने शासकीय व निमशासकीय इतर मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व निराशा, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, याच विषयावर या सभागृहात यापूर्वी 4/5 वेळा लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. आजच्या लक्षवेधी सूचनेला शासनाने जे निवेदन दिलेले आहे तेच मुळात दिशाभूल करणारे आहे. राज्यातील 52 टक्के ओबीसींचा हा महत्वाचा प्रश्न असून तो अद्याप शासनाने निकाली काढलेला नाही. आरक्षण कायद्याला न्यायालयात चॅलेंज झ ालेले आहे पण त्यामध्ये ओबीसींचा समावेश नाही. शासनाने स्पष्टपणे असे म्हटले आहे की, 19 टक्के आरक्षणानुसार ओबीसी प्रवर्गाला सरळ शासकीय व निमशासकीय सेवा देतो. परंतु, त्यांना पदोन्नती देत नाही. त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. आरक्षणातील जे विविध मागास प्रवर्गांचे आरक्षण आहे त्याच्याशी ओबीसी प्रवर्गाच्या आरक्षणाचा संबंध नसतांना निवेदनामध्ये मात्र संबंध दाखविण्यात आलेला आहे. त्यामुळे ही माहिती दिशाभूल करणारी आहे आणि शासनाने हे निवेदन दुरुस्त करावे, अशी माझी पहिली मागणी आहे. मागील कालावधीत जेंव्हा 4/5 वेळा लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करण्यात आली त्यावेळी शासनाने आम्हाला असे आश्वासित केले होते की, महाराष्ट्र शासन एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेईल व ओबीसी प्रवर्गाला 19 टक्के आरक्षणानुसार पदोन्नती देण्यात येईल. परंतु, अद्याप अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला नाही. तेंव्हा, हा निर्णय शासनाकडून घेण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.सुधाकर गणगणे यांनी यापूर्वी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला मीच उत्तर दिले होते. त्यावेळी मी असे सांगितले होते की, मंत्रिमंडळाची एक उपसमिती गठीत करण्यात येईल. त्यानुसार अशी उपसमिती गठित करण्यात आली होती व ओबीसी प्रवर्गाला 19 टक्के आरक्षणानुसार सर्व टप्प्यांवर आरक्षणाचा फायदा द्यावा, अशा प्रकारचा अहवाल या उपसमितीने दिलेला आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंत्रिमंडळाने तशाच प्रकरचा निर्णय घेतलेला आहे. माझी विनंती एवढीच आहे की, हा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. दिनांक 25 मे 2004 रोजी सर्व टप्प्यांवर 33 टक्क्यांपर्यन्त पदोन्नती देण्याबाबतचा निर्णय झाला होता. सन 1974 पासून जे आरक्षण लागू झाले होते त्याला कोर्टामध्ये चॅलेंज करण्यात आलेले आहे व हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाचा निर्णय लवकरात लवकर लागावा यादृष्टीकोनातून शासनाकडून विशेष प्रयत्न केले जातील. मी सभागृहाला निश्चितपणे सांगू इच्छितो की, ओबीसी प्रवर्गाला 19 टक्क्यांपर्यन्त सर्व टप्प्यांवर आरक्षण असावे, अशीच शासनाची

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ KGS/ MHM/ MAP/

श्री.राजेश टोपे............

भूमिका आहे. परंतु, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त व्हावा, यादृष्टीने शासनाकडून विशेष प्रयत्न केले जातील.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही. जे निवेदन करण्यात आलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, निवेदन दिशाभूल करणारे नाही. यासंदर्भात न्यायालयीन निर्णय लवकरात लवकर प्राप्त व्हावा यादृष्टीने प्रयत्न केले जातील, एवढेच मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2003 पासून हा प्रश्न सभागृहामध्ये येत आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये ही लक्षवेधी सूचना आम्ही देत असतो. प्रत्येक अधिवेशनामध्ये असे उत्तर दिले जाते की, एक महिन्याच्या आतमध्ये हा विषय मंत्रिमंडळासमोर आणून निर्णय घेऊ. उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "मागासवर्गीय प्रवर्गाच्या कर्मचा-यांच्या सर्व टप्प्यावरील पदोन्नतीस आरक्षण लागू करण्याबाबतच्या दिनांक 25 मे, 2004 च्या शासन निर्णयाला याचिका क्र.8452/2004 अन्वये माननीय उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 25 मे,2004 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत करु नये." हे मागासवर्गीय प्रवर्गासाठी आहे. ओ.बी.सी. साठी असे म्हटलेले नाही. ओ.बी.सी. साठी कोणी कोर्टात गेलेले नाहीत. आपण न्यायालयाचा आधार घेऊन प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करु नका ? ओ.बी.सी. संबंधी उल्लेख असता तर मागच्या अधिवेशनामध्ये उत्तर देतांना आपण त्याचा उल्लेख केला असता. शासनाचा असा स्पष्ट उद्देश आहे की, ओ.बी.सी. ला 19 टक्के आरक्षण पदोन्नतीसाठी द्यावयाचे नाही. माननीय उच्च न्यायालयाच्या आड दडून ओ.बी.सी. वर अन्याय करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सन 2003 पासून आम्ही ओ.बी.सी.च्या आरक्षणाचा प्रश्न सभागृहामध्ये मांडत आहोत. ओ.बी.सी. वर आपण अन्याय करीत आहात. निवडणुकीच्या आधी शासनाने त्यांना आरक्षण दिले आणि निवडणूक संपल्याबरोबर आरक्षण बंद केले. ओ.बी.सी. चा निवडणुकीमध्ये वापर करुन घेतला आणि आता याबाबत शासन निर्णय घेत नाही. सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. माननीय मंत्री महोदयांनी दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हायकोर्टाने स्टे दिलेला आहे तो स्टे ओ.बी.सी. साठी आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ओ.बी.सी. साठी जरी स्पेसिफिक नसले तरी मी मान्य करतो की, ......

( काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. ही लक्षवेधी सूचना यापूर्वी जवळपास 4-5 वेळा आलेली आहे. दुसरी गोष्ट अशी की, शासनाने याबद्दल निश्चित धोरण स्वीकारुन

...2/-

**उपसभापती** ..........

यासंदर्भात लवकर निर्णय घेतला पाहिजे. आपण पहिल्यांदा सांगितले की, कोर्टाचा स्टे आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण हे कबूल केले की, ओ.बी.सी. करीता स्टे नाही. कोर्टाचा स्टे निश्चित कशावर आहे याची सभागृहाला माहिती द्यावी. कोर्टाच्या आड दडून शासनाला आपल्या भूमिकेपासून दूर जाता येणार नाही. यासंदर्भात ठोस निर्णय घ्यावा अशी सभागृहाची प्रतिक्रिया आहे. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. लवकर निर्णय घ्यावा असे मी कोर्टाला निर्देश देऊ शकत नाही. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, स्थगिती आदेश कोणत्या संदर्भात आहे ते मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या संबंधात 25 मे 2004 रोजी म्हणजे दोन वर्षापूर्वी शासन निर्णय झालेला आहे. त्यानुसार सर्व टप्प्यांवर पदोन्नतीसाठी आरक्षण लागू केले आहे. आता हे आरक्षण कोणासाठी आणि किती आहे ? तर अनुसूचित जातींसाठी 13 टक्के, अनुसूचित जमातींसाठी 7 टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी 11 टक्के आणि एसबीसी साठी 2 टक्के अशा प्रकारे एकंदर 33 टक्के आरक्षण पदोन्नतीसाठी दिलेले आहे. यामध्ये सरळ सेवा भरती असेल तर त्या ठिकाणी व्हर्टीकल रिझर्वेशन 52 टक्के आहे आणि त्यात 19 टक्के ओबीसींसाठी देखील आहे. म्हणजे 33 अधिक 19 असे 52 टक्के आहे. .....

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा ... )

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी माझे बोलणे, माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे. सभापती महोदय, अशा प्रकारे माझ्या बोलण्यामध्ये अडथळा आणून मला थांबविले जाते आहे ते बरोबर नाही. मी येथे कोणत्याही प्रकारे चुकीचे उत्तर देत नाही. माझे सगळे उत्तर ऐकून घेतल्यानंतर त्यावर सदस्यांनी जरूर उपप्रश्न विचारावेत मी त्यावर उत्तर देण्यास तयार आहे. ...

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली शांत बसावे. माननीय राज्यमंत्री आपल्या प्रश्नाला उत्तरदेत आहेत. मी यापूर्वीही सांगितले आहे की, या लक्षवेधी सुचनेवर चर्चेसाठी मी भरपूर वेळ देणार आहे. कारण या विषयाबाबत गांभीर्यपूर्वक चर्चा होऊन निर्णय झाला पाहिजे असे मला वाटते. माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराने, त्यातील एखादा मुद्दा आपणास पटला नाही तर आपण त्यावर उपप्रश्न विचारू शकता, मी त्यासाठी आपणा सर्वांना निश्चितपणे संधी देईन. तरी आता माननीय राज्यमंत्र्यांना त्यांचे उत्तर पूर्ण करू द्यावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्यापूर्वी मी एकच मुद्दा मांडून त्यावर माननीय राज्यमंत्र्यांनी खुलासा करावा अशी विनंती करतो. ओबीसी आणि मागासवर्गीय प्रवर्ग हे वेगवेगळे आहेत ना ? असेल तर कोर्टाने यातील मागासवर्गीय प्रवर्गाला स्टे दिलेला आहे. तर मग तेवढ्याच मुद्यावर माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

श्री. राजेशे टोपे : सभापती महोदय, मी या ठिकाणी स्पेसिफिकली सांगितले आहे की, 25 मे 2004 रोजी या संबंधात जो शासन निर्णय आलेला आहे त्याच्या विरोधात कोर्टामध्ये काही लोक

....... झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

गेलेले आहेत. त्यामध्ये ओबीसी नाहीत हे मी सांगितलेच आहे. या संबंधात आपल्या विधी व न्याय विभागाकडूनदेखील आम्ही मत, सल्ला मागितला होता. कारण कोठल्याही प्रकारे कोर्टाचा अवमान आपल्याकडून होऊ नये यासाठी कोणत्याही कोर्ट प्रकरणांमध्ये आपण विधी व न्याय विभागाचे मत, त्यांचा सल्ला घेत असतो. त्याप्रमाणे याही बाबतीत आपण त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले आहे. त्यात त्यांनी जे काही सांगितले आहे ते मी आपल्याला येथे वाचून दाखवितो. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "Reservation in the matter of promotion can be provided only in respect of S.C. & S.T. in view of clause 4(a) of Article 16 of the Constitution of India." म्हणजे घटनेमध्ये आर्टिकल 16(4)(a) ही जी तरतूद ॲड केली आहे त्यामध्ये केवळ एस.सी., एस.टी.साठीच प्रमोशन्समध्ये आरक्षण राहील अशी तरतूद आहे. "There appears to be no enabling provision in the Constitution enabling the State Government to provide reservation in the matter of promotion in favour of backward classes other than S.C. and S.T." इतके हे स्पेसिफिक आहे, एससी, एसटी सोडून तुम्ही कोठल्याही प्रवर्गाला प्रमोशन देऊ शकत नाही असे आर्टिकल 16(4)(a) म्हणते. खरे म्हणजे व्हीजेएनटी त्यामध्ये आलेले आहे 1997 पासून चालत आलेले आहे म्हणून. या सगळ्या गोष्टी न्यायप्रविष्ट असल्याने त्यांनी शेवटी असे यात म्हटले आहे की, "However, as the provisions of the said Act and the G.R. dated 25-05-2004 has already been challenged in the High Court, it would be desirable to wait till the final decision is taken in the matter. If any decision in the matter of providing reservation in favour of OBC is to be taken it could be taken after the decision of the High Court."

( यानंतर श्री. सरफरे ..... एए 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

इतके स्पेसिफिक ओ.बी.सी. च्या संदर्भात विधी व न्याय विभागाने मत दिले आहे. "If any decision in the matter of providing reservation in favour of OBC is to be taken, it could be taken after the decision of the High Court." ज्यावेळी शासनाचा विधी व न्याय विभाग याबाबत स्पष्टपणे सांगतो की, यामध्ये कोर्टाचा अवमान होऊ शकेल. त्यामुळे या सभागृहाच्या भावना, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भावना, माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे व अन्य माननीय सदस्यांच्या भावनांची त्यांची नोंद घेऊन पुन्हा एकदा विधी व न्याय विभागाकडे ही बाब फेरविचारासाठी पाठवून 15 दिवसाच्या आत त्यांचेकडून फेर अहवाल मागवून घेण्यात येईल. असे करीत असतांना त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कोर्टाचा अवमान होणार नाही या गोष्टींचे पालन होणे आवश्यक आहे. याबाबत या सभागृहाची भावना विधी व न्याय विभागाला कळवून त्यांच्याकडून फेर अहवाल मागवून त्या दृष्टीकोनातून निश्चितपणे पुनर्विचार करण्यात येईल.

**उपसभापती** : मंत्रिमहोदय आपण आता दिलेल्या उत्तरामध्ये सन्माननीय कोर्टाचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे विधी व न्याय विभागाकडून या संबंधी अहवाल मागवून त्या अहवालाचा आधार घेऊ असे सांगितले. आमच्यासारख्या सदस्यांना कधी कधी असा प्रश्न पडतो की, हे शासन कोर्ट चालवीत आहे कां? काही प्रश्न हे जनजीवनाशी किंवा जनतेच्या भवितव्याशी निगडीत असतात अशावेळी विधी व न्याय विभागाकडून किंवा अन्य कुणाकडून कोर्टाच्या निर्णयाचा बाऊ केला जातो. आणि कधी कधी त्या गोष्टीचे खापर कोर्टाच्या निर्णयावर फोडण्याची शक्यता असते. अशावेळी कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेतल्यामुळे आपणा सर्वांना गप्प बसावे लागते. आमच्यासमोर दोन प्रश्न उभे राहतात की, शासन याठिकाणी कोर्टाच्या निर्णयाची ढाल म्हणून वापर करीत आहे काय? आणि आजकाल प्रशासन हे शासनामार्फत न चालविले जाता ते कोर्टामार्फत चालविले जाते काय? यासंबंधी विचार करण्याची वेळ आज लोकप्रतिनिधी आणि राज्यकर्त्यांवर देखील आली आहे. आपण याठिकाणी 15 दिवसांमध्ये अहवाल मागवून घेण्यात येईल असे सांगितले. काल सभागृहामध्ये कामकाज सल्लागार समितीने आपला अहवाल ठेवला आहे. त्यानुसार हे अधिवेशन 15 दिवस चालणार नाही. त्यामुळे मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, पुढील आठवडयातील गुरुवारच्या आत या लक्षवेधी सूचनेवरील शासनाची भूमिका काय आहे? हे आपण स्पष्ट करावे. त्याकरिता आपण विधी व न्याय विभागाला कामाला लावावे. विधी व न्याय

...AA-2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

विभागाचा कारभार सर्वज्ञात आहे. या विभागाच्या माध्यमातून मंत्रालयामध्ये दुसरे कोर्ट निर्माण झाले आहे. कायदेशीर मत देण्याकरिता तारखा देणे, कोणत्याही विषयासंबंधी आपले ओपिनियन देतांना सुस्पष्ट भूमिका न मांडणे असे या विभागाचे काम आहे. तेव्हा आपण या विभागाच्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद द्यावी, आणि येत्या गुरवारच्या आत या संदर्भातील त्यांची भूमिका स्पष्टपणे विशद करावी. जेणेकरुन या लक्षवेधी सूचनेसंबंधी निर्णय घेता येईल. सभागृहातील माननीय सदस्यांच्या आग्रहाखातर ही लक्षवेधी सूचना मी गुरुवारपर्यंत राखून ठेवीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चिपळूण शहरालगत असलेल्या खेर्डी औद्योगिक वसाहतीमधील बंद पडलेले कारखाने

मु. शी : चिपळूण शहरालगत असलेल्या खेर्डी औद्योगिक वसाहतीमधील बंद पडलेले कारखाने यासंबंधी सर्वश्री. भास्कर जाधव, गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भास्कर जाधव ( रायगड,तथा रत्नागिरी,तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चिपळूण शहरालगत (जि. रत्नागिरी) असणाऱ्या खेर्डी औद्योगिक वसाहतीमधील सुमारे ९० टक्के कारखाने बंद अवस्थेत असणे, या औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक कारखाने सुस्थितीत चालू असताना योग्य उपाययोजना केल्या नसल्यामुळे सदर उद्योगाची झालेली पूर्णपणे वाताहात, बंद उद्योगामुळे परिसरामध्ये वाढत असलेली बेरोजगारी, याप्रकरणी उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील उद्योजक तसेच बेरोजगारांमध्ये पसरेलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, बंद पडलेले उद्योग लवकरात लवकर सुरु व्हावेत यासाठी त्वरीत उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यावाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...AA-4....

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

(या नंतर श्री. किल्लेदारं......)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, कोकणातील जमिनी या गुंठेवारीच्या आहेत. गुंठेवारीची जमीन एकत्र करुन शेतकऱ्यांनी इंडस्ट्रीज एरियासाठी दिलेली आहे. परंतु शासनाचे संपूर्ण निवेदन पाहिले तर या औद्योगिक वसाहतीमध्ये एकूण 222 भूखंड तयार करण्यात आलेले आहेत. त्यावरील 149 उद्योग बंद आहेत, असे शासनाने उत्तर दिलेले आहे. खरे पहाता 50 टक्के उद्योग बंद पडलेले आहेत. म्हणजेच जवळजवळ त्या ठिकाणची इंडस्ट्री ही पूर्णपणे बंद पडलेली आहे. त्या इंडस्ट्रीचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने शासनाने काही प्रयत्न केलेले नाहीत. म्हणून माझी शासनाला खास विनंती आहे की, मध्यंतरी 21 इकॉनॉमी झोन करण्याच्याबाबतीत विधानसभेमध्ये तत्कालीन उद्योगमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. त्याचेही पुढे काही झाले नाही. माझी शासनाला विनंती आहे की, त्या ठिकाणचे बंद पडलेले कारखाने लक्षात घेता, कोकणातील नैसर्गिक साधनसंपत्ती लक्षात घेता, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळ झाडांची लागवड करण्यात आलेली आहे. त्याचा रिझल्ट येत असल्यामुळे त्या ठिकाणी "फूड पार्क" होण्याच्या दृष्टीने शासन स्वत:हून पुढाकार घेणार आहे काय ? त्याचबरोबर फिश प्रोसेसिंग युनिट या इंडस्ट्री एरियामध्ये येण्याच्या दृष्टीने शासन कार्यवाही करणार आहे काय ? तिसरा प्रश्न असा की, रेडिमेड गारमेंट ही कपडयाची इंडस्ट्री कोकणामध्ये येणे आवश्यक आहे. आज कोकणामध्ये महिलांचे प्रमाण अधिक आहे. मुंबईमध्ये बॉम्बस्फोट होतात, म्हणून लोक नोकऱ्या सोडून कोकणामध्ये परत जात आहे. अशा परिस्थितीत त्या ठिकाणी रेडीमेड गारमेंटचा उद्योग सुरु झाला तर त्याचा त्यांना फायदा होईल. त्याप्रमाणे शासन कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, चिपळूण तालुक्यातील खेर्डी आणि गणेखडपोली येथील मिळून 222 औद्योगिक भूखंड आहेत. त्यापैकी 194 भूखंडांचे वाटप केलेले आहे. त्यापैकी 129 उद्योग सुरु झालेले आहेत. आजमितीला 56 उद्योग बंद पडलेले आहेत. साधरणत: 9 उद्योग हे सीक युनिट म्हणून घोषित केलेले आहेत. 16 उद्योगांनी आपल्या जागा एमआयडीसीला परत केलेल्या आहेत. 56 उद्योग बंद आहेत, त्याबाबत जिल्हयाचे डीआयसीचे जनरल मॅनेंजर यांचा अभ्यास गट नेमलेला आहे, त्यांच्याकडून रिपोर्ट अपेक्षित केलेला आहे.

सन्माननीय सदस्यांनी "फूड पार्क"च्या संबंधात उल्लेख केला. कोकणामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. रोजगार हमी योजनेमधून फळ झाडे लावण्याचा कार्यक्रम झालेला आहे. त्याचा रिझल्ट येत असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्याप्रमाणे शासनाचेही त्या ठिकाणी "फूड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (पुढे सुरु....

पार्क" करण्याविषयीचे मत आहे. त्या दृष्टीने लवकरात लवकर पावले उचलली जातील. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी टेक्स्टाईलच्या संबंधाने सुचना केली. त्याबाबतीत आता निर्णय देणे शक्य नाही. परंतु त्याबाबतीत नक्की अभ्यास केला जाईल आणि निर्णय घेतला जाईल.

श्री.विलास अवचट : त्या ठिकाणी एकूण 222 भूखंड आहेत त्यापैकी 194 भूखंडाचे वाटप केलेले आहे. उर्वरित 28 भूखंड वाटप करण्यात आले नाहीत त्याचे कारण काय आहे ? जे 16 भूखंड परत केलेले आहेत.त्या उद्योगांची आज स्थिती काय आहे, शासनाच्यावतीने त्या ठिकाणचे उद्योग का बंद पडलेले आहेत, याचा अभ्यास केला गेलेला आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : उर्वरित भूखंडाचे वाटप हे मागणी नसल्यामुळे झालेले नाही. तेथील उद्योग बंद होतात, तेव्हा एम.आय.डी.सी. त्यांना नोटीस देत असते. ते इंडस्ट्री चालवत नसतील तर तो भूखंड ते परत करतात. असे 16 भूखंड परत केलेले आहेत. सीक इंडस्ट्री होते, तेव्हा त्यांचे एमएसईबीच्या बिलाचे आणि सेल्स टॅक्सचे हप्ते पाडून दिले जातात..

यानंतर श्री.बरवड....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ....

म्हणजे मूळ रक्कम आणि 10 टक्के व्याजाची जी रक्कम येईल त्याचे समान 36 किंवा 60 हप्ते पाडून सरकार त्यांना सवलत देत असते.

श्री. मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना या ठिकाणी उपस्थित केलेली आहे. त्या ठिकाणी 16 उद्योजकांनी भूखंड परत केलेले आहेत असे म्हटले आहे. हे भूखंड कोणत्या उद्योजकांकडून परत करण्यात आलेले आहेत ? त्यांची नावे काय आहेत ? कोणत्या उद्योजकांना हे 16 भूखंड उद्योगासाठी दिलेले आहेत ? तिसरा प्रश्न असा की, एमआयडीसी एरियामध्ये महिला संस्थांना सुध्दा भूखंड दिले जातात. त्या ठिकाणी फळ प्रक्रिया किंवा इतर व्यवसायासाठी महिला संस्थेला प्राधान्य देण्यात येणार आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सन्माननीय सदस्यांनी 16 भूखंडाच्या बाबतीत जी माहिती विचारली ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. महिलांना प्राधान्य देण्याच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, सन्माननीय मत्रिमहोदय सुध्दा असेच उद्योग बद पडलेल्या जिल्ह्यातून आलेले आहेत. अशा ठिकाणी उद्योग चालू होण्यासाठी उद्योजकांना येणारा ज्या मुख्य अडचणी आहेत त्याबाबत विचार केला पाहिजे. आपण महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन बंद केलेले आहे. मुंबईतील बऱ्याच उद्योजकांनी पैसे घेतले आणि ते पैसे लुटले त्यामुळे एमएसएफसी बंद पडले. एमएसएफसी तसेच सिकॉम या संस्था चालू झाल्या पाहिजेत. दुसरे म्हणजे उद्योग मित्राच्या बाबतीत रत्नागिरी, लातूर अशा ठिकाणी ग्रामीण भागात नियमित बैठक व्हावी याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : एमएसएफसी हे स्वत:च सिक आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. ते किती दिवसात करणार हे सांगता येणार नाही. परंतु एमएसएफसीला नवीन रुप देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. उद्योग मित्राच्या बाबतीत आपली सूचना मान्य करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : चिपळूणच्या एमआयडीसी क्षेत्रामध्ये जे कारखाने आले ते त्या ठिकाणी स्वत:हून गेलेले नाहीत तर त्यासाठी त्यांना काही तरी इन्सेन्टिव दिले आहे. किती कारखानदारांनी इन्सेन्टिव मिळविण्यासाठी, सबसिडी मिळविण्यासाठी त्या ठिकाणी कारखाने काढले ? असे किती कारखाने त्या ठिकाणी सबसिडी घेण्यासाठी आले ? शासनाच्या वतीने त्यांना किती सबसिडी देण्यात आली ? ज्यांनी चुकीच्या मार्गाने सबसिडी मिळविण्याचा प्रयत्न केला आणि त्या ठिकाणी उद्योग सुरु केला नाही किंवा उद्योग सुरु केला असेल तर सबसिडी घेण्यासाठी सुरु केला, अशा प्रकारे किती लोकांना शासनाकडून सबसिडी देण्यात आलेली आहे ? नोसिल सारखा कारखाना की ज्या ठिकाणी शेकडो कामगार काम करीत होते आणि कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे, तो कारखाना बंद झालेला आहे. अशा कारखान्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शासनाच्या वतीने काय प्रयत्न करण्यात येणार आहे ? सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याप्रमाणे त्या ठिकाणी फूडपार्क किंवा फूड प्रोसेसिंग युनिट तसेच टेक्टाईल युनिटच्या बाबतीत विचार करणे आवश्यक आहे. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक कामगार गिरण्यांमध्ये काम करीत होते. गिरणी कामगारांची संख्या 2 लाख 25 हजार होती. त्यांची संख्या आता 18 ते 19 हजारावर आलेली आहे. हे सर्व कामगार कोकणातील असल्यामुळे त्या ठिकाणी टेक्स्टाईल युनिट किंवा त्यासंदर्भातील इन्फ्रॉस्ट्रक्चर तयार करुन कापड तयार करण्याचा उद्योग त्या ठिकाणी सुरु करु शकणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, इन्सेन्टिवच्या बाबतीतील माहिती पटलावर ठेवण्यात येईल. किती उद्योगांनी इन्सेन्टिव घेतले हे आता सांगणे शक्य नाही म्हणून ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. नोसिलसारखा उद्योग जेव्हा सिक होतो त्यावेळी ते प्रकरण बीआयएफआरकडे रेफर होते. बीआयएफआरच्या माध्यमातून कर्ज असेल किंवा व्याज असेल त्याचे रिशेडयुलिंग केले जाते. सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी फूड पार्क तसेच टेक्स्टाईल किंवा गारमेंट पार्कच्या बाबतीत प्रश्न विचारला. फूडपार्कच्या बाबतीत केंद्र सरकारची योजना आहे. त्यामध्ये 25 टक्के अनुदान केंद्राच्या फूड प्रोसेसिंग मंत्रालयाकडून दिले जाते. त्या ठिकाणी फूडपार्क योजना निश्चितपणे राबवू परंतु टेक्स्टाईल किंवा गारमेंट पार्कच्या बाबतीत अभ्यास करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:55

( श्री. राणा जगजितसिंह पाटील...

टेक्सटाईल पार्कसाठी लागणा-या गोष्टी त्याठिकाणी उपलब्ध होऊ शकतात काय हे पाहून टेक्सटाईल पार्कच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. मागासलेल्या भागामध्ये उद्योग उभारण्यासाठी सवलती दिल्या जातात, सबसिडी दिली जाते. या सबसिडीचा फायदा घेण्यासाठी अनेक उद्योग सुरु केले जातात. सबसिडी संपली की ते उद्योग बंद पाडले जातात. तेव्हा अशा किती उद्योजकांनी सबसिडी घेऊन उद्योग बंद पाडलेले आहेत ? रत्नागिरी जिल्ह्यातील खेरडी याठिकाणच्या औद्योगिक वसाहतीमधील 90 टक्के कारखाने बंद पडलेले आहेत. सवलतीच्या दराने मिळालेले भूखंड, उद्योग बंद पाडलेल्या उद्योजकांनी दुस-यांना भाडेतत्वावर दिलेले आहेत हे खरे आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मागासलेल्या भागामध्ये इन्सेन्टिव्हज् मिळण्यासाठी उद्योग सुरु केले जातात आणि इन्सेन्टिव्हज् बंद झाल्यानंतर ते उद्योग बंद पाडले जातात हे खरे आहे, अशा ब-याच कसेस आहेत. याबाबतीत अभ्यास केलेला आहे. याबाबतीत आता इंडस्ट्रियल पॉलिसी 2006मध्ये काळजी घेण्यात येणार आहे. उद्योग सुरु असेपर्यन्तच इन्सेन्टिव्हज मिळेल आणि तिही एकरकमी न मिळता जो पर्यन्त उद्योग सुरु असेल तोपर्यन्तच मिळेल. उद्योग बंद पडला तर तो प्लॉट सबलिज केला जातो. याबाबतीत एमआयडीसी वेगळा कर लावून परवानगी देते.

श्री. जयंत प्र. पाटील : 16 बंद पडलेल्या उद्योगाच्या उद्योजकांनी कोणकोणत्या वित्तीय संस्थांचे कर्ज घेतलेले आहे ? एमएसएफसी सोडून इतर बँकांचे कर्ज उद्योजकांनी घेतलेले असेल तर तेथील जमिनीचे अधिकार शासनाला प्राप्त होतील काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : ही माहिती मी पटलावर ठेवीन.

श्री. जयंत प्र. पाटील : शासनाने उद्या जागा ताब्यात घेतल्यानंतर त्या जागेवर जर वित्तीय संस्थांचे कर्ज असेल तर त्या जागेचे अधिकार शासनाला प्राप्त होतील काय ? उद्योजकांनी सबसिडीचा लाभ घेऊन कोकणातील उद्योग बंद पाडलेले आहेत. तेव्हा या बंद पडलेल्या उद्योगांच्या बाबतीत किती लायबिलिटी आहे हे समजणे आवश्यक आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, 16 भूखंड परत केलेले असून ते नवीन उद्योजकांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. याचा अर्थ या 16 भूखंडावर कोणतीही लायबिलिटी नव्हती त्यामुळे ते दुस-यांना देण्यात आलेले आहेत.

श्री. भास्कर जाधव : औद्योगिक धोरण 2006 येणार असून त्यामध्ये अनेक गोष्टी स्पष्ट असतील असे मंत्री महोदयांनी सांगितले. कोकणामध्ये उद्योग सुरु व्हावेत हा या लक्षवेधी मागील माझा प्रामाणिक हेतू आहे. सिक युनिट चालू करण्यासाठी शासनाने 1996 साली धोरण ठरविले होते. त्यावेळी कोकणाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केला होता. आता 1996ची परिस्थिती आणि 2006ची परिस्थिती यामध्ये खूप बदल झालेला आहे. आताची कोकणातील भौगोलिक परिस्थिती, तेथील हवामान, साधनसंपत्तीची उपलब्धता, रेल्वे वाहतूक या सर्व गोष्टींचा विचार करुन

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 13:00

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.......... श्री.भास्कर जाधव.......

1996 च्या नियमामध्ये किंवा सर्क्युलरमध्ये शासन बदल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करील का आणि प्रयत्न करावा अशी माझी विनंती आहे. आजारी युनिट म्हणून कारखाने बंद पडतात, या नावाखाली भूखंड खाजगी लोकांना देण्याचा सपाटा सुरु आहे. कंपन्यांच्या नावावर वस्त्या वाढू लागल्या आहेत, खाजगी बंगले उभे राहू लागले आहेत. शासन औद्यागिक वसाहतीचे पुनरुज्जीवन करण्याचा विचार करीत आहे, असे असताना या गोष्टीला तात्काळ आळा घालणार का?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 1996 चा जी.आर.सीक इंडस्ट्रीबद्दल आहे. स्मॉल स्केल इंडस्ट्री रिहॅबिलिट करण्याबाबतचा जी.आर. 1996 सालातील आहे. दहा वर्षानंतर खूप गोष्टी बदलल्या आहेत. निश्चितच या धोरणामध्ये बदल करण्याची गरज आहे. त्याचा विचार करुन बदल करण्यात येईल. सीक युनिट निवासी वापरासाठी दिल्या जातात असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. याबाबत स्पेसिफिक माहिती दिली तर निश्चित त्याबाबत कारवाई केली जाईल.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षात संपूर्ण भारतामध्ये गुंतवणुकीचे नवीन वातावरण निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये मात्र एकंदरीत उदासिनता दिसते. मुंबई ते गोवा हा संपूर्ण पट्टा देशात प्रगतीशील पट्टा होऊ शकतो. परंतु नवीन उद्योग काढण्यासाठी, गुंतवणूक वाढण्यासाठी शासन प्रोॲक्टिव्ह होताना दिसत नाही. अनेक उद्योजकांना यायचे असून सुध्दा अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणून रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये औद्योगिक गुंतवणूक वाढण्यासाठी काय प्रयत्न करणार आहे?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, इंडस्ट्रीअल धोरण, 2006 मध्ये अविकसित भागांना विशेष इन्सेन्टिव्हज द्यायचा विचार आहे. मेगा प्रॉजेक्ट ही संकल्पना आपण स्वीकारली आहे. त्यामध्ये 500 कोटीची गुंतवणूक असावी किंवा 1 हजार लोकांना रोजगार मिळावा असे आपले नियोजन असते. या अविकसित भागात हे पॅरामीटर कमी करावयाचे ठरविले आहे. त्याचबरोबर इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन देण्याबरोबरच फूडपार्क सुध्दा सुरु करावयाचे ठरविले आहे. या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्या लेखी स्वरुपात द्याव्यात, त्यांचा अभ्यास करुन कार्यवाही करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाचे औद्योगिक धोरण या एका लक्षवेधी सूचनेतून ध्वनित होते. चिपळूणची ही औद्योगिक वसाहत आहे, या वसाहतीचे थोडक्यात चित्र समोर मांडले गेले आहे. किती भूखंड गेले, किती कारखाने आले, किती चालू आहेत आणि किती बंद आहेत याची माहिती याठिकाणी दिली गेली. गेल्या पाच वर्षापासून हजारो कारखाने बंद होणे, नवीन कारखाने न येणे, परिणामी स्थानिक स्तरावर जो रोजगार उपलब्ध होता तो न मिळणे, त्यामुळे तेथील तरुण मुंबईमध्ये येणे, मुंबईतील बॉम्बस्फोटाला बळी पडणे हे जे सगळे दृष्टचक्र चालू आहे या संदर्भात एमआयडीसीने कोणत्या उपाययोजना सुचविल्या? जे 2006 चे औद्योगिक धोरण आहे ते अंमलात येण्यास अद्याप खूप वेळ आहे. गेल्या पाच वर्षात यादृष्टीने शासनाने कोणती पावले उचलली आहेत? सन्माननीय उपसभापती हे ठाण्याचे आहेत. ठाण्यातील वर्तकनगरमधील औद्योगिक वसाहत ही एकेकाळी आशिया खंडातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत होती.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

आज त्याची परिस्थिती काय झालेली आहे याची आपल्याला चांगली कल्पना आहे. आज या ठिकाणला काही औद्योगिक वसाहत म्हणता येणार नाही इतकी ती उद्ध्वस्त झालेली आहे. या पार्श्वभूमीवर माझे प्रश्न असे आहेत की, या ठिकाणी जे 56 उद्योग घटक बंद पडलेले आहेत यासंदर्भात आपण कारणमिमांसा केलेली आहे काय? तसेच या ठिकाणी कोणते उद्योग आले तर ते चालू शकतील याचा आपण विचार केलेला आहे का? कोणते उद्योग येथे आर्थिक दृष्टया सक्षमपणे चालतील याबाबत आपल्या खात्यामार्फत विचार केलेला आहे का? औरंगाबाद तसेच लोटे परशूराम येथे कोणत्या प्रकारचे उद्योग आले तर ते चांगल्या प्रकारे चालू शकतील याबाबत आपण काही अभ्यास केलेला आहे काय? स्थानिक युवकांना नोकरी उपलब्ध होणे ही आता काळाची गरज झ ालेली आहे. या तरुणांनी रोजगारासाठी मुंबईत न येता त्यांना तेथेच उद्योग मिळण्याच्या संदर्भात आपल्या खात्यामार्फत आपण काही पाऊले उचलली आहेत काय यासंदर्भातील माहिती कृपया सदनाला उपलब्ध करुन दिली जाईल काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, एमआयडीसी प्रायमरी रिस्पॉन्सीबिलीटी इन्फ्रास्ट्रक्चर नुसार जमीन विकत घेऊन तेथे उद्योग विकसीत करणे तसेच तेथे वीज, पणी, रस्ते अशा सुविधा पुरविणे असे घोरण आहे. अशा सोई या दोन्ही एमआयडीसीला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. खरे म्हणजे उद्योग बंद पडण्याची अनेक कारणे आहेत. याची कारणमिमांसा समजून घेण्यासाठी एक अभ्यासगट तयार करण्यात येणार आहे. जनरल मॅनेजर डीआयसी यांना यासंदर्भात नेमून एक महिन्यात अहवाल मागविला जाणार आहे. नैसर्गिक साधनसामुग्रीचा कसा वापर करावयाचा असा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. यांसदर्भात मी आपल्याला सांगू इच्दितो की, नैसर्गिक साधन सामुग्रीचा अभ्यास वेगळा केलेला नाही. परंतु त्याचाही अभ्यास करण्यात येईल. वागळे इस्टेट मध्ये कॉर्पोरेशन आणि एमआयडीसी यांच्यामध्ये ही सर्व जबाबदारी नेमकी कोणाची आहे यामुळेच या ठिकाणी प्रश्न निर्माण झालेले आहेत. यासंदर्भात अनेक वेळा बैठकाही झालेल्या आहेत परंतु त्यावर सोल्यूशन निघत नाही अशी परिस्थिती आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागास भागातील उद्योगांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. उद्योगांच्या संदर्भात 1996 मध्ये जे धोरणात्मक सर्क्युलर काढण्यात आले होते त्यामध्ये बदल केला जाणार आहे का ? असा त्यांचा प्रश्न आहे. मला माननीय मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, उद्योगधंद्यांच्या संदर्भात आम्हाला शासनाकडून ठोस भूमिका हवी आहे. गेल्या 4-5 वर्षात उद्योगांच्या संदर्भात सरकारने आपली भूमिका मांडलेली आहे. मागास भागातील उद्योगांना "डी" वर्ग दर्जा देऊन जास्तीत जास्त सवलती देऊन जास्तीत जास्त उद्योग येतील यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मराठवाडा, कोकण आणि विदर्भात या ठिकाणी उद्योग आणून त्या भागातील जनतेला, युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या ठिकाणच्या तरुणांना नोक-या उपलब्ध व्हाव्यात हा उद्देश आहे. घटनेच्या 371(2) मध्ये हेच प्रावधान आहे. ज्या भागात उद्योग उभे होतात त्या उद्योगामध्ये 80 टक्के स्थानिक युवकांना रोजगांराची संधी उपलब्ध झाली पाहिजे यासंदर्भात आपण भूमिका घेणार आहात काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ग्लोबलायझेशन आणि ओपन मार्केटच्या स्थितीमध्ये अशा प्रकारची कंडीशन आपण टाकू शकत नाही. अशा ठिकाणी वर्ग 3 आणि वर्ग 4 च्या पदांमध्ये 80 टक्के स्थानिक तरुणांना संधी उपलब्ध करुन देत असतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभांजी नगरमधील स्कोडा कंपनीत 80 टक्के लोक बाहेरचे आहेत व 20 टक्केच लोक स्थानिक घेतलेले आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

तेथे उद्योग कोणी आणला याला महत्व नाही. तेथे जो उद्योग आला त्याठिकाणी फक्त 200 जणांना रोजगार मिळाला. त्यामध्ये फक्त 20 टक्के लोक स्थानिक होते. बाकीचे 80 टक्के लोक बाहेरचे होते. मुंबईतील गिरण्या बंद झाल्यामुळे अनेकजण गावी गेले आहेत. आपण स्थानिक लोकांना नोकऱ्यामध्ये 80 टक्के प्रमाण ठेवले पाहिजे. परंतु शासनाने असे धोरण स्वीकारलेले नाही. त्याठिकाणी परप्रांतियाचा भरणा मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. तेव्हा याबाबत शासनाची कोणती भूमिका आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या संदर्भात शासनाचे जे धोरण आहे त्यानुसार स्थानिक लोकांनाच घ्यावे असे फोर्स करु शकत नाही. आपण उद्योजकांना काही सवलती देतो. तसेच डायरेक्ट इम्प्लॉयमेंट आणि इनडायरेक्ट इम्प्लॉयमेंट असा फरक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या विषयावर चर्चा घडवून आणली तर फार बरे होईल. कारण गुजरात सरकारने 80 टक्के भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घेण्याचा ठराव करुन तो मंजूर देखील केला आहे आणि गुजरात सरकार ते धोरण राबवीत आहे. जर गुजरात राज्याला घटनेचे बंधन येत नाही तर महाराष्ट्र राज्याला असे धोरण स्वीकारण्यात कोणती अडचण आहे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की, आपण या राज्यात गुंतवणूकदारांना आकृष्ट करण्यासाठी वेगवेगळ्या सवलती देत असतो. गुंतवणुकदार गुंतवणूक करतात.त्यानंतर त्या शहरातील लॅग्वेज बदलते, लोक मोठ्या प्रमाणावर हिंदी बोलायला लागतात. स्कील्ड आणि सेमी-स्कील्ड बाहेरुन घेण्याची टेंडन्सी आहे. त्यामुळे स्थानिक भूमिपुत्राला न्याय मिळत नाही. असे प्रकार अनेक ठिकाणी होत आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक याठिकाणी असे निदर्शनास आले आहे. जर एखाद्या राज्याने स्थानिक भूमिपुत्रांना मोठ्या प्रमाणावर सामावून घेण्याचे धोरण स्वीकारले असेल तर ती बाब तपासून घेऊन आपल्याकडे काय करता येईल याबाबत निश्चितच विचार केला जाईल.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये उडालेली झुंबड

**मु. शी.** : अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये उडालेली झुंबड

या विषयासंबंधी प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई व उपनगरातील वेगवेगळया शासन मान्य महाविद्यालयात दहावीच्या निकालानंतर अकरावीच्या प्रवेशासाठी जून, 2006 मध्ये विद्यार्थ्यांमध्ये उडालेली झुंबड, मॅनेजमेंट कोटयातून प्रवेश मिळावा म्हणून एजंटांचा झालेला सुळसुळाट, त्यामुळे लाखो रुपयांचे दर लावले जाणे, वेगवेगळया महाविद्यालयात पन्नास हजार ते सव्वा लाख रुपये घेऊन प्रवेश दिला जात असणे, त्यामुळे यावर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे मेरिटमध्ये आलेल्या व आर्थिक परिस्थिती नसलेल्या विद्यार्थ्यांची झालेली कुचंबना, प्रवेशासाठी विद्यापीठाने 15 टक्के कोटा राखीव दिलेला असतानाही महाविद्यालयीन व्यवस्थापनाने हे सर्व नियम धाब्यावर बसवून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे उघडकीस येणे, व्यवस्थापन कोटयातून सर्रासपणे काळाबाजार चालत असल्याचे उघडउघड दिसूनही शासन कोणत्याही प्रकारची संबंधित कॉलेजवर कारवाई करत नसल्यामुळे गरजू व गरीब विद्यार्थ्यांवर शिक्षणाविना राहण्याची आलेली पाळी, त्यासाठी शासनाने तातडीने प्रवेशासंबंधी ठोस उपाययोजना आखण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, दहावीतून अकारावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. नुकताच दहावीच्या परीक्षेचा निकाल लागला. त्यानंतर मुंबई शहरातील विद्यार्थ्यांना त्यांची इच्छा असलेल्या महाविद्यालयात, त्यांना हवा असलेला अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी झुंबड उडालेली आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देण्याच्या प्रक्रियेमध्ये गोंधळ झालेला आहे. विद्यार्थ्यांना पहिजे असलेल्या महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही. त्यांना हवे असलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळत नाही. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश देतो असे सांगून विद्यार्थ्यांकडून हजारो रुपये घेण्यात येत आहेत. सभापती महोदय, निवदेनाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद करण्यात आले आहे की, मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यांतून कोणीही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही. सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. निरनिराळ्या अभ्यासक्रमासाठी किती जागा उपलब्ध आहेत ? विशेषत: विज्ञान शाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. तेव्हा विज्ञान शाखेसाठी किती जागा उपलब्ध आहेत ? कला शाखेसाठी आणि वाणिज्य शाखेसाठी किती जागा उपलब्ध आहेत ? याची माहिती मंत्रिमहोदयांनी निवेदनात दिलेली नाही. तसेच दुसऱ्या परिच्छेदमध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, "माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व्यवस्थापन कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश व्यवस्थापन स्तरावर दिले जातात....

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित.. 13:15

प्रा.शरद पाटील...

त्यामुळे याठिकाणी गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो असे म्हणणे कितपत योग्य आहे ? निरनिराळया वृत्तपत्रामध्ये महाविद्यालयातील मॅनेजमेंट कोटयाचे दर वाचून आम्हाला धक्काच बसतो. जयहिंद महाविद्यालयाचा कला शाखेचा प्रवेशाचा दर 50 हजार रुपये, वाणिज्य शाखेचा 69 हजार रुपये, विज्ञान शाखेचा दीड लाख एवढा आहे. के.सी. महाविद्यालयातील कला शाखेचा प्रवेशाचा दर 40 हजार रुपये, वाणिज्य शाखेचा 60 हजार रुपये आणि विज्ञान शाखेचा सव्वा लाख रुपये एवढा दर आहे. सेंट झेव्हीअर्स, रुपारेल, रुईया, पोतदार, किर्ती, झुनझुनवाला महाविद्यालयांचीही अशाच प्रकारची आकडेवारी आहे. त्यामुळे अशा प्रकारे महाविद्यालयातील व्यवस्थापन प्रवेशाची आकारणी करत असेल तर शासन यासंबधी काही करणार आहे की नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मला उत्तरामध्ये थोडीशी दुरुस्ती करावयाची आहे. मी घाईघाईमध्ये आल्यामुळे ती सांगणे राहून गेले. निवेदनातील दुसऱ्या परिच्छेदामध्ये "उपलब्ध प्रवेश क्षमता 1,34,248 च्या ऐवजी 1,30,168 असे वाचावे."

सभापती महोदय, आताच दहावीचा निकाल लागलेला आहे. त्यानुषंगाने मुंबईमध्ये एकूण 1,10,753 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच...

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय जी माहिती देत आहेत, ती निवेदनामध्ये आहे. त्यांनी फक्त आमच्या स्पेसिफीक प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थी क्षमतेचा उल्लेख केल्यामुळे मी उक्त माहिती देत होतो. महाविद्यालयास जोडलेली कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशाच्या बाबतीत पुढील प्रमाणे माहिती आहे. उत्तर विभागामध्ये कला शाखेत 1730, विज्ञान शाखेत 3194, वाणिज्य शाखेत 5980, दक्षिण विभागामध्ये कला शाखेत 5614, विज्ञान शाखेत 8700, वाणिज्य शाखेत 11043, पश्चिम विभागात कला शाखेत 5280, विज्ञान शाखेत 7200, वाणिज्य शाखेत 18940 अशा प्रकारे आपण एकूण 67681 ची क्षमता देत आहोत. त्याचबरोबर माध्यमिक शाळांना जोडलेली उच्च माध्यमिकचे वर्गातील प्रवेशाची माहिती पुढीलप्रमाणे आहे. उत्तर विभागामध्ये कला शाखेतील 2911, विज्ञान शाखेत 6400, वाणिज्य शाखेत 12698, दक्षिण विभागामध्ये कला शाखेत 2687, विज्ञान शाखेत 1760, वाणिज्य शाखेत 14249, पश्चिम विभागामध्ये कला शाखेत 1520, विज्ञान शाखेत 4300, वाणिज्य शाखेत 15962 अशा प्रकारे आपण एकूण 1,30,168 ची क्षमता देत आहोत.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...

गुणवत्ता हे मेरीट धरुन प्रवेश द्यावा अशा प्रकारे ठरले आहे. त्यामध्ये 5 टक्के प्रवेश व्यवस्थापनामार्फत घ्यावा असे अपेक्षित असून तेही मेरीटनुसारच प्रवेश देतात, असे अपेक्षित आहे. खाजगी व्यवस्थापनाच्या प्रवेशाच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार आल्यास त्याबाबतीत आमचे भरारी पथक आहे. त्यामार्फत तपासणी करुन त्याबाबतीत गुन्हे दाखल करण्यास मान्यता देण्यात येत असते. असे प्रकार कुठे घेडले असतील तर त्याबाबतीत शो-कॉज नोटीस देण्यात येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी जागा उपलब्ध आहेत, असे म्हटले आहे. परंतु याठिकाणी महाविद्यायालच्या दर्जाचाच प्रश्न आहे. ज्या खाजगी महाविद्याचा दर्जा चांगला नाही अशा संस्थावर काय कारवाई करणार आहे ? तसेच, खाजगी महाविद्यालयातील शिक्षणाच्या दर्जाच्या बाबतीत ठोस धोरण ठरविले जाणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रवेशाची जबाबदारी ही त्या त्या खाजगी कॉलेजची बाब आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आम्हाला त्यामध्ये हस्तक्षेप करता येत नाही. परंतु ज्या मुलाला कमी मार्क्स असतात ती मुले रुपारेल सारख्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळण्यासंबंधी प्रयत्न करतात. त्याठिकाणी अगोदरच 80-85 टक्क्यांच्या वर ॲडमिशन्स गेलेली असतात, मग त्यांना त्या कॉलेजमध्ये ॲडमिशन कसे मिळणार ? दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने आपण शासकीय शाळांमध्ये ज्याप्रमाणे गुणवत्ता विकास आणला आहे त्याप्रमाणे खाजगी शाळांमध्येही गुणवत्ता विकास आणून दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. शाळा व महाविद्यालयातील दर्जा वाढविण्यासाठी शासन जागरुक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जी आकडेवारी दिलेली आहे, ती खरी आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

परंतु, मुद्दा असा आहे की, महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी एकूण 67 हजार जागा उपलब्ध आहेत, असे सांगण्यात येते. या एकूण जागांमध्ये मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटीं महाविद्यालयातील जागांचाही अंतर्भाव आहे. मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयातील जागा वगळल्या तर एकूण 67 हजार जागांपैकी ओपन मेरिटसाठी प्रत्यक्षात 25 ते 30 हजार जागाच उरतात. के.सी., सेंट झेविअर्स, एन.एम.,मिठीभाई अशा सारख्या मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयातील जागा वगळल्या तर या जागा 25 ते 30 हजार राहतात व त्यामुळे प्रवेशाचा प्रश्न निर्माण होतो. 80 टक्क्यांच्या वर ज्या विद्यार्थ्यांना मार्क्स मिळतात त्यांना सुध्दा प्रवेश मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. परिस्थिती अशी आहे की, मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयांमधील 50 टक्केही जागा भरल्या जात नाहीत आणि मग ज्या जागा शिल्लक राहतात त्या जागा मॅनेजमेंट डोनेशन घेऊन, वाट्टेल तेवढे पैसे घेऊन भरतात. त्यामुळे मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयांमधील जागा देखील मेरिटप्रमाणेच भरल्या गेल्या आहेत किंवा नाही हे तपासण्यासाठी एखादी यंत्रणा शासन निर्माण करणार आहे काय ? अशा महाविद्यालयांमधील ज्या जागा भरल्या जाणार नाहीत त्या ओपन मेरिटमध्ये आणल्या गेल्या आहेत किंवा नाहीत ? त्या जागा मॅनेजमेंटने डोनेशन घेऊन कमी गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमधून भरल्या आहेत किंवा कसे ? हे तपासणारी यंत्रणा निर्माण करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयांना प्रवेशाबाबत स्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु, या महाविद्यालयांनी सर्व जागा मेरिटनुसारच भरल्या पाहिजेत, असे शासनाचे आदेश आहेत. त्यांनी जागा कशा पध्दतीने भरल्या आहेत, याबाबत शासनाकडून मॉनिटरिंग करण्यात येईल. परंतु, राज्यातील एकही विद्यार्थी अकरावीमध्ये प्रवेशापासून वंचित राहणार नाही, हेही मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. तसेच, मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयांमध्ये देण्यात आलेल्या प्रवेशांची तपासणी करण्यात येईल.

.2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सर्व प्रवेश मेरिटनुसार देण्यात येतील, अशा प्रकारचे उत्तर महाविद्यालयीन प्रवेशाबाबत शासनाने दिलेले आहे. शासनाने महाविद्यालयांना अनुदानित तुकडयांबरोबरच विनाअनुदानित तुकडयाही मंजूर केलेल्या आहेत. अनुदानिक तुकडयांमध्ये मेरिटनुसार प्रवेश द्यावयाचा व विनाअनुदानित तुकडयांमध्ये डोनेशन घेऊन प्रवेश द्यायचा, अशी पध्दत काही महाविद्यालयांकडून स्वीकारण्यात आलेली आहे व याबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झालेली आहे. विनाअनुदानित तुकडयांमध्ये कमी गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन प्रवेश दिला जात आहे, असा उल्लेख सन्माननीय सदस्य, श्री.शरद पाटील यांनी या ठिकाणी केला. महाविद्यालयांना जरी विनाअनुदानित तुकडयांना परवानगी दिलेली असली तरी महाविद्यालय बांधण्यासाठी शासनाने जागा दिलेली आहे. अशा महाविद्यालयांमध्ये सर्व तुकडयांमध्ये मेरिटनुसारच प्रवेश देण्याचे बंधन शासन संबंधित महाविद्यालयांवर घालणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मघाशी सांगितले की, जी महाविद्यालये पैसे घेऊन प्रवेश देत आहेत, त्यांच्यासंदर्भातील लेखी तक्रार मिळाली पाहिजे. अशा महाविद्यालयांची तक्रार ॲन्टी करप्शन विभागाकडे करण्यात येईल, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील व आवश्यकता असेल तर मान्यताही रद्द करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. परंतु, स्पेसिफिक लेखी तक्रार करण्याची गरज आहे. तसेच, मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटी महाविद्यालयांनी मेरिटनुसारच प्रवेश दिला पाहिजे असे अपेक्षित असल्याने 'विशेष पथक' नेमून प्रवेशाबाबतची चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

GRB/ SBT/ KGS/ MAP/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर .......... 13:25

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शासन मान्य महाविद्यालय तसेच काही प्रतिष्ठित व नामांकित महाविद्यालयांना 11 वी 12 वीचे वर्ग संलग्न आहेत. तेथे व्यवस्थापन कोटयातून विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना पैशांचा व्यवहार चालतो, याबाबत सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. शासन मान्य महाविद्यालयांमध्ये जो व्यवस्थापन कोटा निश्चित केला आहे त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना जो पैशाचा व्यवहार चालतो तो शासनाच्या माध्यमातून कसा थांबविता येईल, हा या लक्षवेधी सूचनेचा मुख्य उद्देश आहे. माझा प्रश्न असा आहे की, विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना व्यवस्थापन आपल्या मर्जीप्रमाणे कोणालाही प्रवेश देते काय ? विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना व्यवस्थापनाने मेरिटचा विचार करावा किंवा नाही ? व्यवस्थापन कोटयातून विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना महाविद्यालय कोणते निकष लावते ? विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना डोनेशन घेतले जाते हे ओपन सिक्रेट आहे, हे सर्व जगाला माहीत आहे. अशा प्रकारची तक्रार आम्हाला द्यावी, असे माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे बरोबर नाही. माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे डोनेशन घेऊन जी महाविद्यालये विद्यार्थ्यांना प्रवेश देतात त्यांचा कडक बंदोबस्त शिक्षण विभागातर्फे केला जाणार आहे किंवा नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्या भावनांशी मी सहमत आहे. महाविद्यालयांना 5 टक्के मॅनेजमेंट कोटा दिलेला आहे आणि मॅनेजमेंट कोटयातून विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना पैसे घेतले जातात, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. परंतु अडचण अशी आहे की, कोणीही अशा प्रकारची तक्रार देत नाही. जर कोणी तक्रार दिली तर कारवाई करण्यात येईल. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना मेरिटचा विचार करावा अशी शासनाची अपेक्षा आहे. परंतु असे होत नसेल तर त्या महाविद्यालयाने मेरिट प्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे किंवा नाही याचा तपास केला जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबईमध्ये बहुसंख्य महाविद्यालये भाषिक अल्पसंख्यांकांची आहेत. त्या महाविद्यालयांचा 50 टक्के मॅनेजमेंट कोटा असतो. 50 टक्के मॅनेजमेंट कोटा वजा केल्यानंतर किती जागा शिल्लक राहतात, यासंदर्भातील आकडेवारी मंत्री महोदयांनी द्यावी. जी भाषिक अल्पसंख्यांक महाविद्यालये आहेत त्या महाविद्यालयातील आरक्षण भरले जात नाही. ते आरक्षण उर्वरित ओपन 50 टक्क्यांमध्ये टाकले जाते. त्यामुळे अल्पसंख्याक

...2/-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपील पाटील ........

विद्यार्थ्यांसाठीचे आरक्षण अधिक सर्वसाधारण आरक्षणामुळे ओपन कॅटेगरिच्या विद्यार्थ्यांसाठी जागा कमी राहतात. यासंदर्भातील आकडेवारी माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटीची आकडेवारी माझ्याकडे नाही. कोणताही विद्यार्थी प्रवेश विना राहणार नाही. मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटीची आकडेवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, मायनॉरिटी महाविद्यालयामध्ये 50 टक्के कोटयामधून त्या त्या समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे अपेक्षित असते. परंतु ब-याच ठिकाणी 50 टक्के कोटातून त्या समाजातील किंवा अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरल्या जात नाहीत. 50 टक्के जागा भरल्या गेल्या नाहीत तर त्या जागा ओपन कॅटेगिरीमधून भरण्याबाबत नियम आहे काय ?

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया पार पाडावयाची आहे. तसे होत नसेल तर पथके नेमून आपण त्यासंबंधात चौकशी करू. आपले सारे निरीक्षक त्याच कामामध्ये आहेत आणि मी असेही सांगू इच्छितो की, एकही विद्यार्थी हा प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत. तसेच प्रवेश प्रक्रिया नियमानुसार, कायदेशीरपणे पार पाडली गेली आहे की नाही हे आपण नंतर तपासू, आणि त्याची माहिती देखील आवश्यक तर पटलावर ठेवू. अर्थात या वर्षीच्या प्रवेशासंबंधात मी हे सांगतो आहे.

डॉ. एम.ए.अझिज : सभापती महोदय, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालये चालविणे हे सध्या संबंधित संस्थांना खूप कठीण होऊन बसले आहे. मी हे विल्सन कॉलेज वगैरे सारख्या मोठ्या महाविद्यालयांसंबंधात बोलत नाही. मात्र लहान लहान संस्थांची जी कॉलेजेस आहेत ती चालविणे सध्या या संस्थांना कठीण होऊन बसले आहे. त्यासाठीच त्यांना 5 टक्के मॅनेजमेंट कोटा दिलेला आहे. शासन या संस्थांना कॉलेजेस चालविण्यासाठी नॉन सॅलरी ग्रँट देत नाही, इमारत बांधणी वा दुरूस्ती यासाठी अनुदान देत नाही. 1998 पासून हे नॉन सॅलरी अनुदान शासन या संस्थांना देत नाही. म्हणून मग या संस्था मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश देताना जादा पैसे घेतात. म्हणजे याला शासनच सर्वस्वी कारणीभूत आहे. तेव्हा 1998 पासून शासन या संस्थांना कॉलेजेस चालविण्यासाठी नॉन सॅलरी ग्रँट देत नाही ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सदनापुढे चुकीची माहिती येत आहे. किंबहुना मार्च 2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान द्यावे असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे आणि त्यातील 90 कोटी इतकीच रक्कम सध्या शिल्लक राहिलेली आहे बाकी सगळी नॉन सॅलरी ग्रँट दिली गेलेली आहे.

**उपसभापती** : या लक्षवेधी सुचनेवरील चर्चा आता संपलेली आहे. यापुढील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे. तेव्हा आता यानंतर 'विशेष उल्लेख' घेण्यात येतील.

***

..... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.** : उल्हासनगर महानगरपालिकेकडे शववाहिनीची व्यवस्था नसणे.

**मु.शी.** : उल्हासनगर महानगरपालिकेकडे शववाहिनीची व्यवस्था नसणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी 'विशेष उल्लेखा'ची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे 'विशेष उल्लेखा'ची सूचना मांडतो.

" उल्हासनगर शहराची महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे 8 लाखापेक्षा अधिक आहे. सध्या उल्हासनगर महानगर प्रशासनाकडे 27 वाहने असून विविध विभागांसाठी 29 वाहने करार पद्धतीने भाडे तत्त्वावर घेतली जातात. महानगरपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे 123 कोटी रूपयांचे असून सुमारे 138 लाख रूपये वाहनांसाठी खर्च केले जातात. त्यामध्ये नवीन वाहन खरेदीसाठी सुमारे 31 लाख रूपये व 77 लाख रूपये वाहने भाडेतत्त्वावर घेण्यासाठी आणि 30 लाख रूपये इंधन व दुरूस्तीसाठी खर्च खर्च केले जातात. मात्र शव वाहिनीसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद नाही.

सभापती महोदय, बीपीएमसी ॲक्ट 1949 मधील संविधानिक तरतुदीनुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेकडे शववाहिनी असणे बंधनकारक असूनही गेल्या पाच वर्षांपासून उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाकडे शव-वाहिनी उपलब्ध नाही. प्रशासनाकडे असलेली शव-वाहिनी गेल्या पाच वर्षांपासून नादुरूस्त अवस्थेत भंगारात पडलेली आहे. उल्हासनगर शहरात सध्या तीन चाकी टेम्पोमधून अग्निशामक दलामार्फत उघड्या स्थितीत शव वाहून नेले जाते.

शव-वाहिनी ही अत्यावश्यक बाब असल्याने व महापालिकेकडे निधीची अडचण नसल्याने शासनाने उल्हासनगर महापालिका प्रशासनाला आदेश देऊन शववाहिनीची व्यवस्था उपलब्ध करून देण्याकरिता मी हा विशेष उल्लेख करीत आहे. "

....... केके 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : उल्हासनगर महानगरपालिकेमधील ही बाब सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी येथे उघडकीस आणली आहे. मी माझ्या आमदार फंडातून एक शव वाहिनी या महानगरपालिकेला उपलब्ध करून देत आहे. कारण महानगरपालिकेकडून अशी अपेक्षा करण्यापेक्षा जनतेच्या सोयीसाठी मी माझ्या आमदार फंडातून शववाहिनी साठी लागणारी सर्व रक्कम त्वरित देत असल्याचे येथे जाहीर करतो.

***

( यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील शासकीय जमीन हस्तांतरणावर आणलेली बंदी

मु.शी. : अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील शासकीय जमीन हस्तांतरणावर आणलेली बंदी याबाबत श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ाची सूच□.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपिकिशन बाजोरिया, यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. गोपिकिशन बाजोरिया ( अकोला, वाशिम, बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या पाच जिल्हयामधील शासकीय जमीन (ब वर्ग) 99 वर्षांच्या कालावधीसाठी नागरिकांना लिजवर देण्यात येणे. परंतु नुकतीच शासनाने हस्तांतरणावर बंदी आणल्यामुळे नागरिकांना सदरहू जमीन कायम पट्टयांवर दिल्यानंतर ही हस्तांतरण करतांना 50 टक्के किमत बाजारभावाने द्यावी लागणे. सदरहू हस्तांतरणाची रक्कम शासनास भरल्यानंतरही नागरिकांना सदरहू जमीन हस्तांतरण करण्यास परवानगी देण्यात न येणे. परिणामी नागरिकांना शासनाने जमीन कायम पट्टयावर देऊनही ती नागरिकांनी हस्तांतरण केल्यास त्यास परवानगी देण्यास शासनाकडून होत असलेल्या विलंबाबाबत नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, अशाप्रकारे शासकीय जमिनीवरील हस्तांतरणाची प्रकरणे शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असणे याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, यावर निवेदन करावे".

सभापती महोदय, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा यासह संपूर्ण मराठवाडयामध्ये ब वर्ग जमीन हस्तांतरणासंबंधी शासनाने नुकतेच 50 टक्के अनर्जित रक्कम घेण्याचे ठरविल्यामुळे संपूर्ण विदर्भ व मराठवाडयामध्ये जनसामान्यांमध्ये असंतोषाची भावना पसरली आहे. शासनाने नागरिकांना सदरहू जमीन कायम पट्टयांवर दिल्यानंतर व काही प्रमाणात शासनाच्या आदेशानुसार ब वर्ग जमीन घेतल्यानंतर अनर्जित रक्कम महसूल विभागाकडे भरल्यानंतरही शासनाकडून फेरफार रेकॉर्डमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत नागरिकांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाजोरिया...

असंतोषाची व संतापाची भावना पसरली आहे. कायम पट्टयावर दिलेल्या ब वर्ग शासकीय जमिनीच्या हस्तांतरणाचे प्रकरण शासनाकडे आल्यानंतर शासनाकडून जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

सभापती महोदय, ज्या काही नागरिकांनी 4 लाखाचा फ्लॅ्ट खरेदी केला आहे, व तो पुन्हा विकण्यासाठी 2 लाख रुपये त्याला भरावे लागत आहेत. त्यामुळे त्या फ्लॅटची किंमत 5 लाख होत आहे. अशा परिस्थितीत 50 टक्के अनर्जित रक्कम शासनाने 10 टक्के करावी अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी सभागृहाचे लक्ष वेधतो."

-*---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ईरला गावठाण, जि. मुंबई येथील रस्त्यावर होत असलेले बांधकाम थांबवून गावठाणाचा रस्ता मोकळा करुन देणे

**मु.शी.**: ईरला गावठाण, जि. मुंबई येथील रस्त्यावर होत असलेले बांधकाम थांबवून गावठाणाचा रस्ता मोकळा करुन देणे याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ाची सूच□.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे, यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मुंबईच्या विलेपार्ले विभागातील ईरला गावठाणामध्ये काही धनदांडग्या बिल्डर्सनी अतिक्रमण केले आहे. त्याबाबत शासनाने न्याय द्यावा म्हणून ही विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे.

"ईरला गावठाण (जि.मुंबई) येथील सी.टी. एस. नं. 805, 806, 807, 808 व 809 या सर्व सिटी सर्व्हे नंबरच्या जागा गावठाणाच्या रस्त्याला लागून आहेत. या रस्त्याचा वापर सन 1936 पासून स्थानिक रहिवाशी करीत आहेत. सदर रस्ता पुढे जावून एस.व्ही. रोडला मिळतो. दिनांक 19 जानेवारी 2006 रोजी 792 ते 793/1ते 12 या जागेवरील बांधकाम श्री. नरेंद्र शहा यांनी महानगरपालिकेचे अधिकारी आणि पोलिसांच्या उपस्थितीत तोडून गावठाणासाठी असलेल्या रस्त्यामध्ये पत्र्याचे शेड टाकून गावठाणाचा रस्ता कायमस्वरुपी बंद केला. या रस्त्याची देखरेख यापूर्वी एक्स अंधेरी पार्ले म्युनिसिपल बघत होती आता या रस्त्याची देखरेख महानगरपालिका के-वेस्ट विभाग करीत आहे.

उपरोक्त जागेवर श्री. शहा यांनी बांधकामास सुरुवात केली असून आजूबाजूच्या इमारतींना पुरवठा करणारे पिण्याच्या पाण्याचे पाईप व ड्रेनेज पाईप बांधकाम होत असलेल्या जागेतून येतात. ते तसेच ठेवून त्यावर बांधकाम करण्यात येत आहे. शेजारी स्थानिक रहिवाशांच्या चर्चची जागा असून त्या जागेवरसुध्दा बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर रस्ता बंद झाल्यामुळे गावठाणात राहणाऱ्या लोकांवर आपत्ती आल्यास एस.व्ही. रोडकडून जाणे येणे सोईचे होऊ शकते. परंतु रस्ता बंद केल्यामुळे संपूर्ण गावठाणास वळसा मारुन जावे लागते. प्रस्तुत प्रकरणी गावठाणाच्या रस्त्यावर

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

होत असलेले बांधकाम थांबवून गावठाणाचा रस्ता मोकळा करण्याचे शासनाने तात्काळ निर्देश द्यावेत अशी विनंती करतो". धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुरुड जंजिरा शहरातील लेडी कुलसूम बेगम प्रसूतीगृह पूर्ववत सुरु करणे

मु.शी. : मुरुड जंजिरा शहरातील लेडी कुलसूम बेगम प्रसूतीगृह पूर्ववत सुरु करणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"भारतास स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी रायगड जिल्हयातील मुरुड-जंजिरा हे सिद्दी नबाब यांचे संस्थान होते. तेथील सिद्दी नबाब यांनी महिलांच्या वैद्यकीय तपासणीकरिता व बाळंतपणासाठी मुरुड शहराचे मध्यवर्ती लेडी कुलसुम बेगम प्रसूतीगृह व दवाखाना बांधला. या दवाखान्यामध्ये गरोदर व प्रसूत महिलांच्या तपासणीकरिता महिला वैद्यकीय अधिकारी कार्यरत असत. या दवाखान्यामध्ये बाळंत महिलांना पिण्यास दूध, सकाळी नाश्ता, गरम पाणी वगैरेची सोय केली जात असे. त्याचबरोबर दवाखान्यात दाखल होणाऱ्या गरीब व सर्वसामान्य महिलांना मोफत औषधोपचार केले जात असत. या दवाखान्यामध्ये मुरुडपासून सुमारे 22 कि.मी. अंतरावरील भालगांव, सावली पासून नांदगाव, मजगावपर्यंत सर्व लगत खेडेगावामधून महिला बाळंतपणासाठी येत असत. या दवाखान्यामध्ये सिझरीन पासून कुटुंब कल्याण पर्यंतच्या सर्व शस्त्रक्रिया केल्या जात असत. त्यामुळे या दवाखान्यात दाखल होणाऱ्या महिलांना बाळंतपणासाठी कोठेही बाहेरगावी जावे लागत नसे.

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जंजिरा संस्थान विलीन झाली त्यावेळी मुरुड-जंजिरा येथील कार्यरत दवाखाने शासनाकडे वर्ग करण्यात आले. त्यावेळी मुरुड मधील दवाखाने रायगड जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले. जिल्हा परिषदेमार्फत या दवाखान्यामध्ये महिला वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करण्यात येत असत. त्यामुळे येथील महिलांना बाळंतपणासाठी जिल्हा रुग्णालयात किंवा अन्य खाजगी रुग्णालयात जाण्याची वेळ येत नसे. हा दवाखाना महिलांकरिता असल्याने यामध्ये महिलांना स्वातंत्र्य व महिलांची सोय होत असे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सन 2004 मध्ये मुरुड-जंजिरा येथील दोन्ही दवाखाने शासनाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे या रुग्णालयाचे ग्रामीण रुग्णालय म्हणून रुपांतर करण्यात आले आणि महिलांकरिता असणारे लेडी कुलसुम बेगम प्रसूतिगृह कायम बंद करण्यात आले आहे. त्यामुळे मुरुड शहरातील व लगतच्या खेडेगावातील गरोदर महिलांचे अतोनात हाल होत आहेत.

तरी शासनाने लेडी कुलसुम बेगम व फातिमा बेगम हॉस्पिटलचे रुपांतर केलेल्या ग्रामीण रुग्णालयात खास करुन महिला वैद्यकीय अधिकारी नेमून येथील महिलांची समस्या दूर करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे".

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु.शी.** : सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा.

**उपसभापती** : मला पोलीस अधीक्षक, अकोला यांच्याकडून कळविण्यात आले की, सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांना दिनांक 9 जुलै,2006 रोजी मुंबई पोलीस अधिनियम,1951 च्या कलम 69 अन्वये अकोला येथे 13.35 वाजता स्थानबध्द करण्यात येऊन त्यांना त्याच दिवशी 15.00 वाजता मुक्त करण्यात आले आहे.

आता मध्यंतरासाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात येत आहे. यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 2-15 वाजता सुरु हाईल.

( दुपारी 1-41 ते 2-15 वाजेपर्यन्त मध्यंतर )

---

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी )**

**मु.शी.**: कर विषयक कायदे ( कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण ) विधेयक.

**L. A. BILL NO. LXIX OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.)**

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 69 - महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 69- महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या विधानसभेत हे बिल पारित करताना जवळजवळ तीन चार तास चर्चा झालेली आहे. आपण आपल्या राज्यामध्ये व्हॅल्यू ॲडेड टॅक्स लागू केला त्या व्हॅटच्या अनुषंगाने काही बदल करणे आवश्यक होते आणि तसे काही बदल या बिलामध्ये सुचविलेले आहेत. एंट्री टॅक्समध्ये काही बदल आवश्यक होते तसे बदल या बिलामध्ये सुचविलेले आहेत. त्याचबरोबर प्रोफेशनल टॅक्समध्ये मूल्यवर्धित कराच्या अनुषंगाने काही व्याख्या होत्या त्याबाबतच्या सुधारणा या बिलामध्ये सुचविलेल्या आहेत. एंट्री टॅक्समध्ये किंवा मूल्यवर्धित करामध्ये व्यापारनाम किंवा ब्रँडनेमच्या बाबतीत क्लॅरिफिकेशन करावयाचे होते. त्याअनुषंगाने काही सुधारणा सुचविलेल्या आहेत. विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये जे धोरण अभिप्रेत होते त्याविषयी आवश्यक त्या सुधारणा आपण

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. जयंत पाटील .....

सुचविलेल्या आहेत. कार्यकंत्राटाच्या बाबतीत, टी.डी.एस.च्या बाबतीत काही सुधारणा यामध्ये सुचविलेल्या आहेत. या विधेयकामध्ये आपण फारसे मूलभूत बदल करीत नाही. व्हॅटमध्ये ज्या गोष्टी राहिलेल्या होत्या आणि गेल्या दीड वर्षात लोकांनी, वेगवेगळ्या संघटनांनी ज्या गोष्टी सुचविलेल्या होत्या त्यांचा विचार करुन काही सुधारणा या बिलामध्ये सुचविलेल्या आहेत. या विधेयकाच्या संदर्भात चर्चा करणे आवश्यक असेल तर सन्माननीय सदस्यांनी चर्चा करावी नाही तर हे विधेयक संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**तालिका सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते व पांडुरंग फुंडकर यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 69 - महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 50 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या बिलाच्या संदर्भात आम्ही एक उपसूचना दिलेली आहे. हे विधेयक उभय सभागृहाच्या प्रवर समितीकडे पाठवावे. कारण या संपूर्ण विषयाच्या बाबतीत चर्चा होण्याची खूप आवश्यकता आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 2.20 वा.

(श्री. मधुकर सरपोतदार...)

व्हॅटच्या संदर्भात जे जे काही निर्णय शासनाने घेतलेले आहेत ते निर्णय या विधेयकामध्ये मांडून त्यावर कोणत्याही प्रकारची चर्चा न होता, त्यामधील फायदे नुकसानीच्या बाजू न तपासचा आपण हे विधेयक मंजूर करावे अशा प्रकारची सूचना सन्माननीय अर्थमंत्र्यांनी केली. विधानसभेमधून हे विधेयक मंजूर होऊन आले. त्या सभागृहामध्ये देखील असेच झाले. विधानसभेमध्ये 288 सदस्य असताना केवळ चार-पाच सदस्य या विधेयकावर बोलले आणि त्यानंतर सन्माननीय अर्थमंत्र्यांनी उत्तर दिले. उत्तराच्या वेळी त्या सदनामध्ये गोंधळ सुरु होता, अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये म्हणजे without application of mind हे विधेयक मंजूर झाले अशी आमची भावना झालेली आहे. या संदर्भातील वस्तुस्थिती काय आहे हे माननीय मंत्री महोदय सांगतील. या विधेयकाला न्याय मिळावा, या विधेयकातील सर्व बाजू नीट समजल्या जाव्यात या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, गट नेता म्हणून मी आणि सन्माननीय सदस्य दिवाकर रावते, आम्ही हे विधेयक उभय सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठवावे असा प्रस्ताव दिलेला आहे.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006चे वि.स.वि.क्रमांक 69 - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक दोन्ही सभागृहांच्या 50 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवावे असा प्रस्ताव दिलेला आहे. मुळामध्ये जेव्हा व्हॅटचा प्रस्ताव मंत्री महोदयांनी या सदनामध्ये आणला त्यावेळी विरोधी पक्षाच्या बाकावर कोणीही सदस्य नव्हते. मला तो दिवस चांगला आठवतो. याठिकाणी मी अत्यंत खेदाने नमूद करु इच्छितो की, लोकशाही प्रणालीमध्ये सभागृहाचे कामकाज नियमाने चालते, घटनेप्रमाणे चालते. पक्षाला एखादी गोष्ट योग्य वाटते की अयोग्य वाटते हा विषय सदनामध्ये उपस्थित होऊ शकत नाही. घटनेची पायमल्ली करण्याचा अधिकार कोणाही सदस्याला नाही, आणि तसे घडत असेल तर ते रोखण्याचे घटनात्मक अधिकार पीठासीन अधिका-यांना आहेत. मला आठवते, त्या दिवशी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये विवक्षित मुद्यांवर चर्चा होत असताना विरोधी पक्षाच्या बाबतीत घेतलेल्या अन्यायकारक भूमिकेमुळे संपूर्ण विरोधी पक्ष सभात्याग करुन बाहेर गेला होता. नियमाप्रमाणे सदनामध्ये विरोधी पक्ष नसताना सभागृहामध्ये आवश्यकती गणपूर्ती ठेवणे हे सत्ताधारी पक्षाचे काम असते. परंतु मला शंभर टक्के आठवते की, त्या दिवशी रात्रीचे पावणेअकरा-अकरा वाजले होते आणि सत्ताधारी पक्षाला सभागृहामध्ये गणपूर्ती ठेवणे शक्य झाले नव्हते. सत्ताधारी पक्षाला सभागृहामध्ये गणपूर्ती ठेवता येत नाही याची जाणीव करुन देण्याकरिता विरोधी पक्ष सभात्याग करुन लाबीमध्ये बसला होता. त्यावेळचे आपण कार्यवृत्त पहावे किंवा वाटल्यास त्यावेळची कॅसेट ऐकावी. या सभागृहापुढील पूर्ण कामकाज संपलेले असल्यामुळे आणि अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे राष्ट्रगीत म्हणण्याची वेळ झाली होती. राष्ट्रगीत झाल्यानंतर हे सत्र संपल्याचे जाहीर करण्यात येणार होते. सरकारी पक्ष अडचणीमध्ये येत होता. सभागृहामध्ये विरोधीपक्ष नव्हता आणि कोरमही नव्हता.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

सभागृहात कोरम नसताना कामकाज आटोपलेच. सात-आठ बिले मंजूर करुन घेतली. आम्ही त्यावेळी सभापतींच्या अधिकारासंदर्भात बोलू इच्छित नव्हतो. बिले मंजूर झाली हे ठीक आहे. आम्ही खूप आरडाओरडा केला. त्या गोंधळामध्ये बिले मंजूर केली. शेवटी आम्ही या सदनामध्ये कशासाठी येतो? कायदे बनविण्याकरीता येतो. हे कायदेमंडळ आहे. या सदनामध्ये सरकारकडून कायदे आणले जातात. तेव्हा त्या कायद्यांची सर्वसामान्य जनतेवर होणाऱ्या परिणामांची चर्चा व्हावी. काय योग्य आहे, काय अयोग्य आहे याबद्दल सूचना कराव्यात. काही उपसूचनांच्या माध्यमातून सरकार पक्षाला उपसूचना स्वीकारण्याची विनंती केली जाते. बहुमताच्या जोरावर कायदा करण्याचे परिणाम सरकार भोगत असते. परंतु विरोधी पक्षाला आपले काम चोखपणे बजावावे लागते. उलट खालच्या सभागृहात ते बिल मंजूर झाले नव्हते आणि खाली बिल मंजूर झाल्याशिवाय ते वरच्या सभागृहात येऊ शकत नाही. आमच्या सभागृहाचे कामकाज संपत आले तरी खालच्या सभागृहात ते बिल मंजूर झाले नव्हते. या सभागृहाचा शेवटचा कार्यक्रम पुकारला गेला. यानंतर फक्त वंदे मातरम् होणार होते. खालचे सभागृह आणि या सभागृहाचा कार्यक्रम मिनिट टू मिनिट लक्षात घेतला तर कळेल की, आमचे सभागृह संपत आले तरी खालच्या सभागृहात बिल मंजूर झाले नव्हते. अशा वेळी सभागृहाची बैठक स्थगित केली गेली. गोंधळ घालणारा विरोधी पक्ष बाहेर होता. सभागृहात चार सदस्य आणि एक कॅबिनेट मंत्री असे एकूण 5 जण होते. आम्ही दरवाजा उघडून मोजणी करीत होतो आणि सभापतींना सांगत होतो की, सभागृहात फक्त 5 जण आहेत, कोरम नाही. विनंती करीत होतो की, कोरमअभावी सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात यावे. परंतु तसे घडले नाही. अशा वेळेला ती तहकूब केलेली सभा कायदेशीर आहे का, योग्य की अयोग्य यावर चर्चा करणार नाही. सभापतींचा तो अधिकार आहे. दोष सभापतींचा नाही. सरकार पक्षाचा दोष आहे. खालच्या सदनामध्ये सरकार त्यावेळेला बिल मंजूर करुन घेऊ शकले नाही. तेथे चर्चा चालू होती. आमचे सभागृह चालावे आणि वरचे सभागृह संपू द्यायचे नाही असे खालच्या सभागृहाचे डावपेच नव्हते. त्यावेळेला बिल मंजूर झाले नसते तर पुढील अधिवेशनात मांडता आले असते. परंतु रात्री 12.00 नंतर व्हॅट कायदा लागू करावयाचा होता तो लागू झाला नसता. आमची मागणी एवढीच होती की, सभापतींनी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी तहकूब केली असती व विरोधी पक्षाला विश्वासात घेतले असते आणि मंत्रिमंडळाची अडचण सांगितली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

असती तर वादाचा विषय उत्पन्न झाला नसता. परंतु विरोधी पक्षाला विचारात घ्यायचे नाही आणि सत्तारुढ पक्षाने कामकाज रेटण्यासाठी कळत नकळत सभापतींनी निर्णय घेण्याची वेळ आणायची. या सदनाचे कामकाज चालविण्याची पीठासीन अधिकारी म्हणून आपली जबाबदारी आहे. म्हणून आम्ही आपल्याला दोष देत नाही. सभागृहात एखादी घोषणा घडून त्याची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी होणे ही नकळत आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. याठिकाणी आलेला प्रत्येक कायदा तावून सुलाखून तपासला गेला पाहिजे. तो योग्यायोग्यतेच्या कसोटीवर मंजूर झाला पाहिजे ही भूमिका तुम्हा-आम्हा दोघांची असली पाहिजे. आम्ही विरोधाकरीता बसलो म्हणून विरोध करावयाचा असे नाही. कुठलीही बाब असली तरी बहुसंख्येच्या जोरावर ती मंजूरच होणार आहे. परंतु विरोधकांना आपला विरोध मांडण्याचा अधिकार आहे. आपल्याकडे संख्या मोठी असली तरी एखाद्या बिलावर विरोधकांना असे वाटते की, हे योग्य नाही, हे जनतेच्या हिताचे नाही. त्याप्रमाणे भूमिका आम्ही मांडतो. ती भूमिका मांडल्यानंतर मतदान करुन विरोध प्रदर्शित करावयाचा प्रयत्न केला जातो. तो कायदा अमूक मतांनी मंजूर झाला हे रेकॉर्डवर येते. जनतेच्या मनात सरकारच्या विरोधात भावना निर्माण झाली तर विरोधी पक्ष छातीवर हात ठेवून सांगू शकतो की, आम्ही सरकारला ताकिद दिली होती, सरकारला बजावले होते. परंतु सरकारने संख्याबळाच्या जोरावर रेटून नेले अशा प्रकारची मांडणी असते.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, त्या दिवशी बरोबर 11.50 वाजता व्हॅट बील मंजूर करुन घेण्यात आले आणि त्यानंतर राष्ट्रगीत होऊन सभागृहाचे काम पुढील अधिवेशनापर्यंत संस्थगित झाले. घाईघाईने बील मंजूर करुन घेण्यात आल्यामुळे त्यावेळी आम्हाला बिलावर आमचे विचार व्यक्त करता आले नाहीत. ज्या दिवसापासून व्हॅट मंजूर झाला त्या दिवसापासून शासनाला व्हॅटचे आणि इतर करांचे पैसे मिळायला सुरुवात झाली. माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते आहे की, गाडी रुळावर येण्यासाठी काही वेळ लागत असतो. परंतु सभापती महोदय, आमची कुचंबणा अशी आहे की, ज्यावेळी खालच्या सभागृहात बील पास होते तेव्हा अधिकारी धावत धावत ते बील विधान परिषदेत घेऊन येतात आणि विधानसभेने हे बील मंजूर केले असल्यामुळे हे बील त्वरीत चर्चेला घेतले जावे असे सांगण्यात येते. परंतु बील मांडण्याच्या संदर्भात काही प्रावधारन आहेत, नियम आहेत. आपल्याला कोणतेही बील आणावयाचे असेल तर आपण ते खुशाल आणावे परंतु हे बील येथे येण्यापूर्वी आम्हाला त्या बिलावर अभ्यास करण्यासाठी कमीतकमी 8 दिवसाचा अवधी मिळाला पाहिजे. आम्ही काही तुमच्यासारखे सर्वज्ञानी नाही. आम्हाला कॉमर्सच्या संदर्भात जास्त काही समजत नाही त्यामुळे ही सर्व बाब समजून घेण्यासाठी आम्हाला कमीतकमी आठ दिवसाचा अवधी मिळणे आवश्यक आहे. या सभागृहात सदस्य जे काही वक्तव्य करतात ते सत्य मानले जाते. त्यामुळे या ठिकाणी सदस्यांना जे काही बोलावयाचे असते ते अभ्यास करुन बोलावे लागत असते. जर अभ्यास करुन विचार मांडले गेले नाहीत तर त्याचे चुकीचे रेकॉर्ड तयार होंईल व काही कालावधी नंतर हे हे सदस्य किती अज्ञानी होते हे दिसून येईल. अशामुळे भविष्यात अज्ञानीपणा दिसून येईल. त्यामुळे सदस्यांना सभागृहात जे काही बोलावयाचे असते त्यासाठी अभ्यास करावा लागत असतो. अभ्यास केल्यानंतर सदस्यांना समजून येईल की, यामध्ये काय योग्य आहे व काय अयोग्य आहे, त्यामुळे सदस्यांना कमितकमी 8 दिवस अगोदर बील मिळाले पाहिजे जेणे करुन सदस्य त्यावर अभ्यास करुन आपले विचार व्यक्त करु शकतील. सभापती महोदय, मला असे वाटते की, या सदनातील जवळ जवळ 90 टक्के सदस्य अभ्यास करुन बोलत असतात. आपल्याकडून असत्य माहिती बोलली जाणार नाही याची ते काळजी घेत असतात. सभापती महोदय, उद्देश व कारणामध्ये म्हटले आहे की, "करविषयक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यावरील कर अधिनियम, 1975, महाराष्ट्र ऐषआराम सेवावरील कर अधिनियम, 1987, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटारवाहने आणण्यावरील कर अधिनियम, 1987, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम 2002 आणि महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते." सभापती महोदय, या बिलात मोठया प्रमाणात ॲक्ट इनक्ल्यूड झालेले आहेत. एवढया मोठया प्रमाणात ॲक्ट इनक्ल्यूड झाल्यानंतर माझ्या सारखा अनपढ माणूस त्वरीत यावर विचार कसे काय मांडू शकेल? मी काही प्रा. जोगेंद्र कवाडेसारखा ज्ञानी माणूस नाही. कारण ते प्राध्यापक आहेत व मी त्यांच्या मानाने विद्यार्थीच आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या विधेयकामध्ये जी सूची देण्यात आलेली आहे, त्यामध्ये विविध बाबी आहेत उदा. मोटार वाहन कर, दारुवरील कर असे विविध कर आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, याठिकाणी जी विधेयके चर्चेसाठी येतात, त्यातील सर्वच विषयांमध्ये आपण दर्दी असू शकत नाही. याठिकाणी अनेक विषयांवर चर्चा होत असते. त्यामुळे आम्हालाही काही ज्ञान प्राप्त होत असते. त्याचा बाहेरील जगात आम्हाला उपयोग होतो. बाहेर जर कोणी आपल्याशी टॅक्स विषयावर बोलत असेल तर आपल्यालासुध्दा तो विषय थोडफार समजतो. सभापती महोदय, व्हॅट लागू झाल्यावर कर रद्द करण्यात येणार असे सांगण्यात आले. मी जकात कर या विषयात जात नाही. काही ठिकाणच्या जकात कर आपण रद्द करु शकत नाही अशी सध्या परिस्थिती आहे. मुंबई महानगरपालिकेला जकात करातून 2000 कोटी रुपये मिळतात. माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणावर बोलताना सांगितले होते की, व्हॅट लागू झाल्यानंतर कर पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. जकात कराबाबत सांगण्यात आले होते की, जकात कर बंद करण्यामुळे राज्याच्या महसुलात जी घट होणार आहे, ती घट केंद्र शासनाकडून राज्याला भरुन मिळणार आहे. तेव्हा आपण समजू शकतो की, आपल्याला जर घट आली तर केंद्र शासनाकडून तेवढी घट मिळणार आहे. परंतु राज्याच्या जकात करात दरवर्षी 10 टक्क्यांनी वाढ होत असते ती वाढ केंद्र सरकारकडून राज्याला मिळणार आहे का, हे मला समजलेले नाही. राज्य महसूलावर चालते. आज आपल्या राज्यावर जवळपास 1 लाख 15 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. ही आकडेवारी खरी आहे किंवा कसे, याचे उत्तर मंत्रिमहोदय त्यांच्या भाषणात देतील.

सभापती महोदय, आज राज्याचा महसूल किती आहे ? हे विधेयक मंजूर झाल्यानंतर महसुलामध्ये किती टक्के वाढ होणार आहे ? किती नवीन महसूल निर्माण होणार आहेत ? याची माहिती मिळालेली नाही. सभापती महोदय, जकातीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, शिवशाहीचे सरकार असताना मोठ्या महानगरपालिका सोडून राज्यातील सर्व नगरपालिकांतून जकात कर रद्द करण्यात आला होता. अशा नगरपालिकांना सांगण्यात आले होते की, सरकारकडून तुम्हाला तीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

वर्षे दहा टक्क्यांनी वाढ करुन जकातीची रक्कम दिली जाईल. मात्र या तीन वर्षात नगरपालिकांनी स्वत:च्या उत्पन्नाचा सोर्स शोधून काढायचा आहे. राज्यात व्हॅट लागू झाल्यानंतर इतर सर्व कर रद्द केले तर राज्याच्या महसुलाची परिस्थिती काय होणार आहे ? कोठून महसूल निर्माण होणार याची माहिती त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिली असेल.

सभापती महोदय, याठिकाणी वाद निर्माण झाल्यावर मग तो सिंचनाचा असेल वा अन्य कोणताही वाद असेल तर, अंगावरील झुरळ झटकावे तसे ऊठून सांगायचे की, विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष आहे ना, मग त्यांना एकदा एक हजार कोटी रुपये देऊन टाका. मला असे विचारावयाचे आहे की, सरकारची कर्ज घेण्याची क्षमता वाढली आहे काय ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 14:40

श्री.दिवाकर रावते....

अर्थमंत्र्यांनी सामर्थ्य दाखविल्याशिवाय माननीय मंत्री महोदय असे वक्तव्य करु शकत नाहीत. ते ज्या पध्दतीने बोलले त्या पध्दतीला आमची हरकत आहे. आज विदर्भाच्या सिंचनाच्या अनुशेषाबाबत आमचा आक्रोश आहे. सरकारच्या या मानवनिर्मित अनुशेषासाठी आमचा आक्रोश आहे. हा अनुशेष निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत स्टेटमेंट येते ते आम्हाला मान्य आहे. अपूर्ण कामे पूर्ण झाली पाहिजेत. आमच्या कार्यकाळात आम्ही मोठया प्रमाणात कोकणात पाटबंधाऱ्याची कामे केली, तेवढी तळमळ आपल्यामध्ये दिसून येत नाही. माननीय राज्यपालांनी निर्देश दिले की, पूर्वीचीच कामे पूर्ण करा, नवीन कामे घेऊ नका. अनुशेषाची लढाई सरकार आणि विरोधी पक्षामध्ये नाही तर माननीय जयंतरावांमध्ये व आमच्यामध्ये आहे. परंतु एखादी बाब पुढे कशी घेऊन जायची याचे वकब आपण याठिकाणी दाखविले. त्यावेळी आपण याठिकाणी सर्वांना संभ्रमित करुन टाकले. खरे काय आणि खोटे काय, हे आम्हाला कळले नाही. नक्कीच माननीय राज्यपालांनी पत्र दिले का, नक्कीच त्यांनी अशा प्रकारचे निर्देश दिले का, हे सर्व आपल्यालाच माहीत आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या बिलाच्या बाबतीत चिंता व्यक्त करावी. या बिलामध्ये ज्या काही लहान-सहान सूचना आहेत त्या त्यांनी सुचवाव्यात. सन्माननीय सदस्य बिलाच्या बाहेरील माहिती विस्तृतपणे देत आहेत. या बिलाच्या बाबतीत प्रत्येक क्लॉजवाईज माहिती पाहिजे असेल तर ती मी देण्यास तयार आहे. त्यानंतरच आपण हे बिल पारित करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अजिबात विषयाच्या बाहेर जात नाही. सभापती महोदय, आपल्या तिजोरीमध्ये पैसे असतील तरच महाराष्ट्राचा कारभार चालणार आहे. हे बिल मंजूर झाल्यानंतर किती दिवसांमध्ये आपल्याला पैसे मिळणार, असे मी विचारले. त्यामुळे याठिकाणी मी विषयाच्या बाहेर जाऊन बोललो नाही. मला जे आठवले ते मी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. हे बिल हातामध्ये घेतल्यानंतर माझ्या लक्षात आले की, आपण फार मोठे जादूगार आहात. आपण फार मोठी जादू करता. आपण असे जर करीत असाल तर याबाबतीत पहिल्यांदा आपल्यावरच कारवाई होण्यासारखी परिस्थिती आहे. याठिकाणी मी सांगू इच्छितो की, हा कुठल्या पक्षाचा विषय नाही.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 14:40

श्री.दिवाकर रावते...

परंतु विदर्भाचा जो 10 हजार कोटी रुपयांचा अनुशेष आहे तो कर्ज काढून एकदाचा देऊन टाका, अशा प्रकारची जी भूमिका घेण्यात आली, त्याला आमचा आक्षेप आहे. सरकारच्या तिजोरीमध्ये पैसे नसताना व राज्यावर एवढे कर्ज असताना आपण आणखी कर्ज घेणार का ? आपला दोन वर्षापासून जी.डी.पी. वाढला आहे, हे खरे आहे. त्याबद्दल मी आपल्या धन्यवादही देऊ इच्छितो. याबाबतीत दोन वर्षात चांगले काम झालेले आहे. निश्चितच आपला जी.डी.पी. वाढला आहे. परंतु आपण कोकणासाठी नवीन वैधानिक विकास महामंडळ करण्याचा विषय घेतला. अगोदरच आपल्याकडे पैसा नाही. शिक्षकांच्या पगारासाठी पैसा नाही, सर्व शिक्षा अभियानाच्या पैशावर शिक्षणाचा सर्व कारभार चालला आहे. अशावेळी विदर्भातील, मराठवाडयातील, कोकणातील वंचित लोकांनी आपल्याकडे काय म्हणून पहावे ? त्यामुळे या बिलाच्या माध्यमातून आपण आम्हास किती पैसे उपलब्ध करुन देणार आहात, यातून किती योजना मार्गी लावणार आहेत, याबाबतची माहिती द्यावी. आपल्याकडील उपलब्ध उत्पन्नावरुनच बाकीच्या खात्यांचा कारभार चालणार आहे. या बिलाच्या माध्यमातून आपण निश्चितपणे वेगवेगळी करप्रणाली मांडलेली आहे. आता व्हॅट लागू झाला आहे. मग बाकीच्या करांचे काय ? या सर्व व्यवस्थेबाबत आपण अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत आणखी काही उणीवा दूर करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हे बिल आपण जर संयुक्त समितीकडे पाठविले तर त्यावेळी यावर पूर्ण विचार होऊन सर्व उणीवा दूर होतील, असे मला वाटते.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

सन्माननीय मंत्री महोदयांनी विनंती केली असल्यामुळे मी प्रत्येक क्लॉजबद्दल या ठिकाणी बोलणार नाही. परंतु, या आमच्या भावना आहेत. विदर्भ, मराठवाडयाच्या सिंचनाकरिता पैसे उपलब्ध होत नसतांना ही करप्रमाणाली ज्यावेळी मंजूर केली त्यावेळी आम्हाला आमच्या भावना व्यक्त करता आल्या नव्हत्या. कोणतेही विधेयक गोंधळात पास होऊ नये, या मताचे आम्ही आहोत. या सभागृहात तुम्ही, आम्ही आलो आहोत ते कायद्यावर चर्चा करण्याकरिता आलो आहोत, कायदा समजून घेऊन कायदा मंजूर करण्याकरिता आलो आहोत. गेली 4/5 वर्षे आम्ही पाहतो आहोत की, सभागृहात गोंधळ होतो कधी आणि कामकाज उरकतो कधी, अशी प्रवृती निर्माण झाली आहे. काही विधेयके जाणुनबुजून शेवटच्या आठवडयात सभागृहात आणली जातात. अंधश्रध्दा विधेयकही असेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पास झाले. अशा प्रकारची तुमची वृत्ती चांगली नाही, मन साफ नाही. आम्ही असे सांगितले होते की, हे विधेयक अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आणा, परंतु तुम्ही ते आणले नाही. या अधिवेशनाच्या आधी आम्ही शासनाच्या लक्षात आणून दिले की, हे विधेयक अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आणा, परंतु अद्याप आणलेले नाही. हेतू हा आहे की, या ठिकाणी विधेयकांवर विस्तृत चर्चा झाली पाहिजे. कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले होते की, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सर्व विधेयके सादर करण्यात येतील आणि मग अधिवेशन काळात त्यावर कधीही चर्चा करता येईल.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी अंधश्रध्दा विधेयकाचा या ठिकाणी उल्लेख केला आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये यासंदर्भात चर्चा झाली होती. यासंदर्भात सन्माननीय गृहमंत्र्यांनी 17 तारखेला बैठक बोलाविण्यात येईल आणि नंतर हे विधेयक सभागृहात आणण्यात येईल, असे सांगितले होते. मी हे केवळ माहितीसाठी सांगत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये सन्माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, अधिवेशनाच्या पहिल्या किंवा दुस-या दिवशी बैठक घेऊ. परंतु, अद्यापपर्यन्त ही बैठक झालेली नाही. आता हे विधेयक शेवटच्या आठवडयात येईल आणि मग

श्री.मधुकर सरपोतदार...........

गोंधळात ते पास होईल. गोंधळात विधेयक पास होणे, हा या सभागृहाचा स्थायीभाव होऊ नये, धर्म ठरु नये, अशी आमची सूचना आहे. या सभागृहाला वरिष्ठ सभागृह मानले जाते, विधेयकांवर विस्तृत चर्चा व्हावी, त्यामधून मार्ग निघावा म्हणून आम्ही उपसूचना दिली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाकडे आणि सदनातील सन्माननीय सदस्यांकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टीकोन कसा आहे, हे मी सांगण्याचा प्रयत्न केला. विधेयकांवर चर्चा करण्यासाठी आम्ही या ठिकाणी येतो. लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे हे कामकाज तर चालूच असते. कधी त्यासंदर्भातील उत्तरे शासनाकडून मिळतात, कधी मिळत नाहीत. परंतु, विधिमंडळात कायद्याशी संबंधित कामकाजाला सर्वोच्च महत्व आहे. कायदा कायमस्वरुपी घडत असतो, तो चुकीच्या स्वरुपाचा झाला तर पापाचे धनी आपण सर्वजण होऊ नये, या प्रवृत्तीतून आम्ही हे सर्व आपणासमोर मांडित आहोत. म्हणून मी अजूनही माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, खालच्या सदनामध्ये सुध्दा सन्माननीय मंत्रीमहोदयांचे भाषण झाले तेंव्हा प्रचंड गोंधळाची परिस्थिती होती. सन्माननीय मंत्रीमहोदयांचे वैशिष्टय आहे की, सभागृहात गोंधळ चालू असतांना ते लांबलचक भाषण करतात. सन्माननीय सदस्यांची गोंधळ घालण्याची ताकद किती आहे, हे ते पहात असतात. हे सर्व ठीक आहे, तो तुमच्या बुध्दिचा कस आहे. परंतु, या विधेयकावर विधानसभेतील सन्माननीय सदस्यांना विचार मांडावयाचे आहेत, त्यांना काही सांगावयाचे आहे. आता सुध्दा आम्ही क्लॉज-टू-क्लॉज बोलू शकतो. सभापती महोदय, या बिलाच्या उद्देश व कारणांमध्ये असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम 1975 मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते." त्यामुळे वेळ काढण्याकरिता नाही तर सर्वंकष चर्चा व्हावी, महाराष्ट्रातील जनतेवर, सर्व वर्गातील जनतेवर याचा परिणाम होणार असल्यामुळे सर्वकष छाननी व्हावी, या विधेयकाला पूर्णत्व येऊन आपल्या राज्याचा निधी योग्य खिशातून यावा, अयोग्य खिशावर भार पडू नये याची काळजी घेऊन हे विधेयक पास व्हावे म्हणून आम्ही उपसूचना मांडली आहे. या विधेयकाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या तिजोरीला सक्षम करण्याची संधी मिळावी, एवढी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

---------------------

..3........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या लक्षात आणून देतो की, यामध्ये 2 मुद्दे आहेत. मुल्यवर्धित करप्रणालीचे विधेयक दोन्ही सभागृहाने मंजूर केलेले आहे आणि त्या कायद्याची अंमलबजावणीही सुरु झालेली आहे. आता या विधेयकाच्या माध्यमातून कोणती नवीन तरतूद आपण करु इच्छिता ? कशासाठी हे विधेयक आलेले आहे ? याचा खुलासा प्रथम आपण करावा व त्यानंतर या विधेयकावर चर्चा करता येईल.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मुल्यवर्धित करप्रणालीमध्ये एकाच वस्तूवर दोनदा कर आकारला जातो. उदाहरण द्यावयाचे झाले तर ज्यावेळी आपण हॉटेलमध्ये जातो त्यावेळी झ ाालेल्या बिलावर एकदा कर आकारला जातो, त्याचप्रमाणे अन्नपदार्थ बनविण्यासाठी जे धान्य लागते त्यावर हॅाटेल मालकाने कर दिलेला असतो. म्हणजे एकाच वस्तूवर दोन वेळा हा कर आकारला जातो. म्हणूनच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या बिलाला उपसूचना दिली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विधेयकाच्या उद्देश व कारणांच्या परिच्छेद दोन (1) मध्ये असे म्हटलेले आहे की, "तंबाखूवरील कर आकारणीच्या संबंधात, मेसर्स गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेड विरुध्द उत्तर प्रदेश राज्य (139 एसटीसी 537) या प्रकरणामधील सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय अंमलात आणणे......" केवळ असे नमूद करुन उपयोगी नाही तर या न्यायनिर्णयाची सविस्तर माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की, हे विधेयक मूळ कायद्यात सुधारणा सुचविणारे विधेयक आहे. या विधेयकाअन्वये आपण व्हॅल्यू ॲडेड टॅक्समध्ये सुधारणा करीत आहोत. व्हॅटच्या अंमलबजावणी नंतर वर्क्स कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, प्रोफेशनल टॅक्स, एन्ट्री टॅक्स यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आले. या विधेयकातील पहिले प्रकरण प्रोफेशनल टॅक्सच्या संदर्भातील आहे. प्रकरण एक मध्ये "तो दिनांक 20 जून, 2006 रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल." असा उल्लेख केलेला आहे. आपण 20 जूनला अध्यादेश काढलेला आहे. प्रकरण दोनमधील काही सुधारणा प्रोफेशनल टॅक्स संदर्भातील आहेत. प्रकरण एक हे करविषयक कायद्याचे आहे. प्रकरण दोन प्रोफेशनल टॅक्स संदर्भातील आहे. जेथे सेल्स टॅक्स ऐवजी व्हॅल्यू ॲडेड टॅक्स असा रेफरन्स आलेला आहे तेथे सुधारणा करणे प्रस्तावित आहे. प्रकरण तीनमध्ये कॅटेगरीखाली शेडयुलमध्ये नोंदणीच्या संख्येत बदल झाल्यामुळे, म्हणजे एक-दोन संख्या कमी झाल्यामुळे तेथे दुरुस्ती करणे आवश्यक होते म्हणून ही दुरुस्ती प्रस्तावित आहे. प्रकरण चारच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, पूर्वी एकच रिटर्न भरता येत होते. अडचण आली तर आयुक्तांची परवानगी घेऊन अनेक ठिकाणी रिटर्न्स भरता यावेत यासाठी तरतूद

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील .........

केली आहे. उदाहरणार्थ, एखादी कंपनी असेल आणि त्या कंपनीचे 4-5 ठिकाणी व्यवहार होत असतील तर त्या ठिकाणच्या माणसाला त्याच ठिकाणी प्रोफेशनल टॅक्स भरता यावा म्हणून आपण ही सुधारणा केली आहे. प्रकरण दोनमध्ये आपण 5 वी सुधारणा प्रोफेशनल टॅक्समध्ये करीत आहोत. यामध्ये एखाद्या व्यक्तीला डिमांड नोटीस पाठविल्यानंतर 15 दिवसांची मुदत संपल्यानंतर व्याज सुरु करावे, अशी दुरुस्ती आहे व त्यासाठी कालावधीची डेफिनेशन करण्याची आवश्यकता होती.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

म्हणून आपण डिमांड नोटीस दिल्यानंतर याचे स्पष्टीकरण करीत आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कृपया माननीय मंत्री महोदयांनी माझ्या ज्ञानात थोडी भर घालावी. प्रोफेशनल टॅक्स आला कशासाठी ? त्याचे दर त्यावेळेस काय होते आणि आज काय आहेत ? तसेच त्या करातून येणाऱ्या निधीचा विनियोग कशा प्रकारे केला जातो ? म्हणजे ज्यासाठी आपण हा कर लावला त्यासाठीच विनियोग होतो आहे का ? किंबहुना हा कर रद्द करावा असेच माझे मत आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे हे मत आहे, त्याबद्दल दुमत नाही. या प्रोफेशनल कराचा कायदा आहे आणि तो कसा आला, केव्हा आला हे आपणा सगळ्यांनाच माहिती आहे. या कराविषयीचे आपले मत सन्माननीय सदस्यांनी येथे आता सांगितले. पण या कराच्या कायद्यामध्ये आपण काय सुधारणा करीत आहोत तेच मी येथे सांगतो आहे.

सभापती महोदय, यातील प्रकरण 2.5 मध्ये आपण निर्धारण डिमांड नोटीस बजावल्या पासून 15 दिवसात त्याप्रमाणे कराचा भरणा करण्याविषयी सुस्पष्ट केले आहे आणि तसे झाले नाही तर व्याज आकारणी केली जाईल हेही सांगितले आहे म्हणजे व्याज लावण्याबाबतची जी संदिग्धता होती ती दूर करण्याचा प्रयत्न आपण यात केला आहे. दरमहा 1.25 टक्के व्याज आकारणी करण्याची तरतूद आहे. हे व्याज केव्हापासून सुरू करावयाचे हे याच्या व्याख्येत बसत नव्हते म्हणून ते आपण येथे स्पष्ट केले आहे. डिमांड नोटीसनंतर 15 दिवसात हे होणार आहे.

त्यानंतर प्रकरण 2 मधील 6, 7 व 8 हे मुद्दे आहेत त्यात ही तांत्रिक सुधारणा आहे. म्हणजे जेथे व्हॅल्यू ॲडेड टॅक्स आहे, तेथे विक्रीकर नाही त्यामुळे त्या संबंधातील जुनी पदनामे काढून नवीन पदनामे आपण करीत आहोत. उदाहरणार्थ, विक्रीकरासाठी उपआयुक्त होते त्या ऐवजी आता 'सह आयुक्त' हे पदनाम होईल. तसेच 'सहाय्यक व्यवसाय कर आयुक्त' ऐवजी "व्यवसाय कर उप आयुक्त" असे पदनाम होईल.

त्यानंतर प्रकरण 2 मधील 10 मध्ये मुद्दा असा आहे की, पूर्वी व्यापाऱ्यांच्या ठिकाणाला एन्फोर्समेंटचे अधिकार असलेले सगळेच आपले अधिकारी भेट देत असत. पण अशा प्रकारे सगळ्यांनाच हे अधिकार असणे योग्य नाही हे लक्षात घेऊन आपण त्यात सुधारणा करीत आहोत आणि आयुक्त ज्यांना यासाठी प्राधिकृत करतील त्यांनाच हे एन्फोर्समेंटचे अधिकार राहतील अशी सुधारणा आपण यात करीत आहोत.

...... व्हीव्ही 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या ठिकाणी आम्हाला जे काही आपण करीत आहात ते समजावून सांगता आहात. पण मूळामध्ये असे आहे की, हा प्रोफेशनल टॅक्स आला कशासाठी ? तर त्यातून येणाऱ्या पैशातून आपण रोजगार हमी योजना सुरू केली. पण हा पैसा आज त्यासाठी वापरला न जाता दुसरीकडेच वापरला जातो. ज्यासाठी आम्ही हा कर लावला आहे आणि सर्वसाधारण नागरिकांकडून पैसे वसूल करतो आहोत त्याचा उद्देश असा आहे की, ग्रामीण भागातील लोकांच्या हाताला काम मिळावे. त्यासाठीच हा पैसा खर्च झाला पाहिजे. पण आज प्रत्यक्षात त्यासाठी हा पैसा खर्च होत नाही. आता या विधेयकावर बोलावयाचे तर प्रत्येक कलमाची उपयुक्तता आणि त्याचा वापर या बाबतीत आम्हाला बोलता येइल. पण तसे करण्याचा आमचा उद्देश नाही. म्हणूनच आम्ही संयुक्त समितीकडे अधिक विचारार्थ हे विधेयक पाठवावे अशी सूचना येथे केली आहे जेणे करून मूळापासून या संबंधात विचार करता येईल. आता यामध्ये आपण करीत असलेल्या सुधारणा आपण सांगता तेवढ्या साध्या नाहीत. त्यातून आपला महसूल निश्चितपणे वाढणार आहे. तेव्हा हे विधेयक आपण संयुक्त समितीकडे पाठवावे असा आमचा आग्रह आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, प्रोफेशनल टॅक्सचा उद्देश आणि मेरिट यावर आपण स्वतंत्र चर्चा करू शकतो. ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रोफेशनल टॅक्सवर माननीय मंत्री महोदय म्हणतात त्याप्रमाणे आता वेगळी अशी चर्चा होऊ शकत नाही. जेव्हा आपण कायदा आणतो तेव्हा तो कशासाठी आणला आहे, त्यामागील उद्देश काय आहे, त्याचे मेरिट काय आहे, ही चर्चा तो कायदा आणतानाच केली जाऊ शकते. पण आता ज्यासाठी आपण तो कायदा केला त्यासाठी त्यातून येणाऱ्या निधीचा वापर केला जात नसेल तरीही लोकांनी तो कर भरत राहायचे काय ?

**तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी)** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मूळच्या कायद्यात काही त्रुटी आहेत असे शासनाला वाटले म्हणून तेवढ्या त्रुटी भरून काढण्याच्या उद्देशानेच हे सुधारणा विधेयक नामदार मंत्र्यांनी आणले आहे हे आपण लक्षात घ्यावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... 2डब्ल्यू 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : प्रकरण 3 मध्ये महाराष्ट्र लक्झरी टॅक्समधील कलम 11, 13, 14, 15, 16 ते 28 मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. मेसर्स गॉडफ्रे फिलिप्स इंडिया ही कंपनी सर्वोच्च न्यायालयामध्ये गेली होती. सर्वोच्च न्यायालयाने कापड, तंबाखू या वस्तू लक्झरी टॅक्समध्ये मोडत नाहीत. अशाप्रकारचा निवाडा 20 जानेवारी 2005 रोजी दिला होता. त्यामुळे या विधेयकाव्दारे आपण 20 जानेवारी 2005 पासून या बाबी अंतर्भूत करीत आहोत. अशाप्रकारे प्रकरण 3 मध्ये तांत्रिक स्वरुपाची दुरुस्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम 1987 च्या प्रकरण 4 व खंड 27 मध्ये तांत्रिक बदल करुन सुधारणा अंतर्भूत केली आहे. त्यातील 4 ची सुधारणा ही वाहन प्रवेश मूल्य किंमत कर दायित्वासाठी सुस्पष्ट व्हावी, विक्री कर परिवहन वाहतूक शिर्षकाचा त्यामध्ये समावेश असणार नाही हे स्पष्ट करणारी सुधारणा असल्यामुळे खंड क्र. 28, 29, 31 मध्ये तांत्रिक स्वरुपाची सुधारणा करण्यात आली आहे.

शेजारच्या राज्यामधून व्हेईकल डिलर हे व्हेईकल्स इंपोर्ट करीत असल्यामुळे त्यावर पूर्वी सेल्स टॅक्स आकारला जात होता. परंतु व्हेईकलवर एंट्री टॅक्स कुठेही नव्हता. आता यापुढे व्हेहिकलवर एंट्री टॅक्स लावण्यात येईल आणि त्या टॅक्सचा परतावा व्हॅटमधून मिळेल अशी याठिकाणी तरतूद केली आहे. त्यामुळे या करप्रणालीतून कुणीही सुटणार नाही. डिलरची कर चुकवेगिरी कमी होईल. याच प्रकरणातील खंड 30 व 32 मधील कलम 1 व 2 मध्ये Areas of the operations of Officers बाबत सुधारणा करीत आहोत. याबाबत आयुक्तांनी कार्यक्षेत्र निश्चित करावे अशाप्रकारची ही सुधारणा आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यांनी कर निर्धारणात काही चुका केल्यानंतर त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला पुर्ननिरिक्षणाचे आदेश प्राप्त करता यावेत अशी दुसरी सुधारणा करण्यात आली आहे, ही तरतूद यापूर्वीच्या कायद्यामध्ये नव्हती.

डॉ. दीपक सावंत : आपण विम्याच्या व ट्रान्सपोर्टच्या रकमेचे इंटरप्रिटेशन केले. प्रकरण 27/4 मध्ये सुधारणा केली आहे. त्यामध्ये बेसिक प्राईज अधिक एक्साईज डयुटी अंतर्भूत होती. पूर्वी ट्रान्सपोर्टवरच्या इन्शुरन्सवर टॅक्स लागावयाचा, आता ट्रान्सपोर्टवरील इन्शुरन्स टॅक्स आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

काढून टाकीत आहात. आणि आता बेसिक प्राईज अधिक एक्साईजवर टॅक्स बसावावा, अशाप्रकारची सुधारणा करीत आहात. पूर्वी इन्शुरन्स टॅक्स समाविष्ट करुन त्या रकमेवर टॅक्स भरावा लागावयाचा.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 15:05

श्री.जयंत पाटील : प्रकरण पाचच्या कलम 33 व 34 मध्ये सुधारणा आहेत....(अडथळा)... माझे काय म्हणणे आहे, ते मी सांगितले. त्याबाबत शंका असतील तर त्याचे स्पष्टीकरण मी करीन.

श्री.दिवाकर रावते : बिलाच्या मेरिटमध्ये आम्ही बोललेलोच नाही.

श्री.जयंत पाटील : यामध्ये काय काय सुधारणा केलेल्या आहेत, हे आयटमवाईज सांगावे, अशी सभापती महोदयांनी सूचना केल्यानंतर मी त्याचे स्पष्टीकरण करीत आहे.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : या बिलामध्ये कोणत्या सुधारणा आहेत, याची माहिती सन्माननीय सदस्यांना नाही, त्यामुळे त्या अनुषंगाने महत्वाच्या सुधारणा काय आहेत, हे माननीय मंत्रीमहोदयांना सांगण्यास सांगितले.

श्री.जयंत पाटील : मी आयटेमवाईज सांगतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)

**तालिका सभापती** : आपल्याला या बिलामध्ये कोणत्या अमेंडमेंट आहेत याची माहिती पाहिजे होती, त्याबाबत मंत्रीमहोदय अमेंडमेंट सांगून जस्टीफिकेशन करीत आहेत.

श्री.दिवाकर रावते : हे सगळे जाणूनबुजून चाललेले आहे. बील जाईन्ट सिलेक्ट कमिटीमध्ये गेल्यानंतर, त्याबाबत अधिक बोलता येईल. मी आपल्याला दोन वेळा सांगितले की, मी मेरिटवर नंतर बोलेन. सन्माननीय सदस्य जमविण्याकरिता आपण वेळ काढत आहात. आमची सूचना अमान्य झाली तरी चालेल. पण आपण आमची सूचना मतास टाकावी.

श्री.जयंत पाटील : पहिल्यांदा ज्यावेळेस बील मांडले त्यावेळेला विरोधी पक्षाचे सगळे सदस्य उपस्थित नव्हते, म्हणून मी त्यावेळी जास्त बोललो नाही. सभागृहाला व्यवस्थित माहिती मिळाली पाहिजे. सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सूचना मताला टाकण्यापेक्षा चर्चेमधून जे प्रश्न उपस्थित होतील, त्याची उत्तरे मी देईल. कोणत्या सुधारणा केलेल्या आहेत, हे मी सांगतो आहे. त्याबाबत अधिक चर्चा करावयाची असेल तर चर्चा करु. चर्चा सुरु करुन बील पारित करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय अर्थमंत्री महोदयांनी या ठिकाणी....

श्री.दिवाकर रावते : आता सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही. ही चुकीची पध्दत आहे.

श्री.जयंत पाटील : आपण हे बील कशासाठी आणलेले आहे, यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला गेला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

**तालिका सभापती** : आपण आपली भूमिका मांडली. सन्माननीय सदस्यांना त्यांची काय भूमिका आहे, ती त्यांना मांडू द्यावी.

यानंतर श्री.बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाने, कायद्याने चालते. माझ्या प्रस्तावावर माननीय मंत्रिमहोदय उत्तर देण्यास उभे राहिले त्याच्या अगोदरच सन्माननीय सदस्यांनी या बिलाच्या संदर्भात बोलावयास पाहिजे होते.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते यांनी जी उपसूचना मांडलेली आहे त्यासंदर्भात मी बोलत आहे. मी या बिलावर चर्चा करीत नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी बिल मांडले. हे बिल मी का मांडलेले आहे याचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला करावयास पाहिजे होता.

श्री. जयंत पाटील : मी सुरुवातीला खुलासा केलेला आहे.

श्री. अरविंद सावंत : माननीय मंत्रिमहोदयांनी बिल मांडल्यानंतर ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, या बिलाच्या बाबतीत आमची उपसूचना आहे. हे बिल संयुक्त समितीकडे पाठवावे अशी त्यांनी मागणी केली. त्यांनी आपले म्हणणे दोन मिनिटांमध्ये आटोपले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या बिलाच्या मेरिटवर चर्चा केली नाही. त्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जी उपसूचना मांडलेली आहे त्याचे मी समर्थन करतो आणि हे बिल संयुक्त समितीकडे पाठवावे अशी त्यांनी मागणी केली. आता त्या प्रस्तावाच्या संदर्भात भाष्य व्हावयास पाहिजे किंवा निर्णय व्हावयास पाहिजे. आता पुन्हा बिलाच्या मेरिटवर चर्चा सुरु होत आहे. सन्माननीय सदस्यांनी जी उपसूचना मांडली आहे त्यावर आधी मतदान व्हावयास पाहिजे. आता बिल बाजूला राहिले. सन्माननीय सदस्यांनी जी उपसूचना मांडलेली आहे त्याबद्दल मतदान व्हावयास पाहिजे

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी)** : याबाबतची क्रोनॉलॉजी अशी आहे की, या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी बिल मांडण्याची परवानगी मागितल्यानंतर सभागृहाने त्यांना परवानगी दिली. त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय ताबडतोब या बिलाचा हेतू आणि उद्देश

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**तालिका सभापती** ......

सांगण्यासाठी उभे राहिले. त्यांनी या बिलाचा हेतू आणि उद्देश सांगितला. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार बोलण्यासाठी उभे राहिले. त्यांनी सांगितले की, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा आमचा ठराव आहे. हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे अशी त्यांनी मागणी केली. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलण्यासाठी उभे राहिले. त्यांनी सांगितले की, हे बिल काय आहे हे आम्हाला माहीत नाही त्यामुळे उद्या या ठिकाणी....

श्री. दिवाकर रावते : त्यावेळी या उपसूचनेला सपोर्ट का करीत आहे हे मी सांगितले. यामध्ये चार कायद्यांचा संबंध आहे त्यासंदर्भात चर्चा झाली पाहिजे. त्यासंदर्भात समजून घेतले पाहिजे. आम्ही अज्ञानी आहोत. मी विद्यार्थी आहे अशा प्रकारचे भाष्य झाले.

**तालिका सभापती** : ज्या क्वेरीज निर्माण झाल्या होत्या त्याचा खुलासा करण्यासाठी माननीय मंत्रिमहोदय उभे राहिले.

श्री. दिवाकर रावते : आपण त्यावेळी असे म्हणाला की, बिलावर बोला. त्यावर मी असे सांगितले की, मी बिलावर नंतर बोलेन..

**तालिका सभापती** : बिल आणि आपला प्रस्ताव सभागृहासमोर चर्चेला आल्यानंतर बिलावर चर्चा होऊ नये काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण नियमाप्रमाणे कामकाज करावे अशी अपेक्षा आहे. माझे भाषण झाल्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांना या बिलावर चर्चा करावयाची होती त्यांना चर्चा करण्याचा अधिकार आहे पण त्यावेळी सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहिले नाहीत. त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय आमच्या उपसूचनेच्या संदर्भात उत्तर देण्यासाठी उभे राहिले. त्यावेळी चर्चेचा विषय थांबलेला होता.

**तालिका सभापती** : या ठिकाणी आपला प्रस्ताव आणि विधेयक या दोन्ही विषयावर एकत्रित चर्चा होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पीठासीन अधिकारी म्हणून आपण नियमाने कामकाज करावे अशी माझी नम्र विनंती आहे.

...3...

RDB/ SBT/ MHM/

**तालिका सभापती** : आपला प्रस्ताव आणि विधेयक यावर एकत्रित चर्चा व्हावी. यामध्ये गैर काय आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून नियमाप्रमाणे काम करावे अशी विनंती आहे. पीठासीन अधिकाऱ्यांकडून अन्यायाची अपेक्षा नाही. या सदनामध्ये पीठासीन अधिकाऱ्यांनी सरकारच्या बाजूने काम करु नये.

**तालिका सभापती** : मी नियमानुसार काम करीत आहे. आपण मांडलेला ठराव सभागृहासमोर आहे तसेच विधेयक सुध्दा सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:15

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे हेही बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : हे विधेयक आणि त्यावरील प्रस्ताव या दोहोंवर एकत्रितपणे चर्चा सुरु झ ाालेली आहे.

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाला सांभाळण्याचे काम आपण करु नका..

श्री. विलास अवचट : माझा हरकतीचा मुद्दा आहे. जेव्हा विधेयक सभागृहामध्ये चर्चेला येते त्यावेळी त्या विधेयकाचे उद्दिष्ट काय आहे हे माननीय मंत्री महोदय सांगतात, त्यानंतर सन्माननीय सदस्य चर्चा करतात, त्या चर्चेला मंत्री महोदय उत्तर देतात आणि त्यानंतर त्यावर मतदान होते. त्यानंतर चर्चा संपते. आता सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या संदर्भात उपसूचना मांडल्यानंतर त्याला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे आता ही उपसूचना मतदानाला टाकण्याची आवश्यकता आहे. तेव्हा उपसूचनेवर मतदान घ्यावे.

**तालिका सभापती** : विधेयक आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याच्या प्रस्तावावर एकत्रितपणे चर्चा घेण्याची प्रथा आहे. त्यानुसार एकत्रितपणे चर्चा सुरु झालेली आहे.

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

श्री. मधुकर चव्हाण : उपसभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : उपसभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उपसभापती** : मी दोन्ही सन्माननीय सदस्यांचे हरकतीचे मुद्दे ऐकून घेणार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. महानगरपालिकेचे सभागृह असो की विधानसभा अथवा विधानपरिषदेचे सभागृह असो, पध्दत अशी आहे की, मूळ विधेयक प्रथम मांडले जाते. परंतु जेव्हा त्या विधेयकाला उपसूचना केली जाते त्यावेळी त्या उपसूचनेवर प्रथम मतदान होते. या विधेयकाला उपसूचना मांडणा-या सन्माननीय सदस्यांची नावे वाचून दाखविण्यात आली. उपसूचनेला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पाठिंबा दिला. त्यानंतर त्या उपसूचनेला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले. सभागृहातील कामकाजाची पध्दत अशी आहे की, जेव्हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

एकाच बाबी संबंधीचे दोन भाग सभागृहामध्ये चर्चेला येतात त्यावेळी whichever is later - दुस-या भागावर प्रथम मतदान होते आणि त्यानंतर मूळ बाबीवर मतदान होते. तेव्हा याठिकाणी हे विधेयक उभय सभागृहांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीची जी उपसूचना मांडण्यात आलेली आहे त्या उपसूचनेवर पहिल्यांदा मतदान व्हावयास पाहिजे आणि त्यानंतर विधेयक संमत करण्यासंबंधीच्या प्रश्नावर मतदार व्हावयास पाहिजे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : आपण सर्वांनी सहकार्याने काम करु या.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही उपसूचना मान्य करु. परंतु नियमाच्या आणि कायद्याच्या बाहेर काम चालत असेल तर आम्ही सहन करणार नाही. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांना या प्रश्नावर बोलता येणार नाही असे माझे ठाम मत आहे. माझ्या सूचनेनंतर उत्तर देण्याकरीता मंत्रीमहोदय उभे राहिले होते. याठिकाणी जमवाजमव करणे चालू आहे. हे करु नये. सरकारचे धिंडवडे निघू देत. त्यांनी निवडून आणलेले सदस्य कसे सरकारला अडचणीत आणतात हे कळू देत.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय सदस्य याठिकाणी आपल्याला दमबाजी करीत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आपल्या कार्यक्षमतेबद्दल शंका आहे का? आमचा आपल्यावर विश्वास आहे.

**उपसभापती** : संसदीय प्रथेप्रमाणे विधेयक आणि संयुक्त समितीचा प्रस्ताव सभागृहासमोर आहे. त्यावर एकत्रित चर्चा होऊन प्रस्ताव अगोदर मताला टाकला जातो आणि त्यानंतर विधेयक मताला टाकले जाते. याप्रमाणे आता चर्चा होईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, मी तोच हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. चर्चा झालेली आहे. मंत्रीमहोदय उत्तर द्यावयास उभे होते.

(दोन्ही बाजुचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**उपसभापती** : मी रुलिंग दिलेले आहे व ते आपण मान्य केलेले आहे. मी पुन्हा एकदा रुलिंग वाचून दाखवितो. संसदीय प्रथेप्रमाणे विधेयक आणि संयुक्त समितीचा प्रस्ताव सभागृहासमोर आहे. त्यावर एकत्रित चर्चा होऊन प्रस्ताव अगोदर मताला टाकला जातो आणि त्यानंतर विधेयक मताला टाकले जाते. याप्रमाणे आता चर्चा होईल.

श्री.विलास अवचट : चर्चा झालेली आहे.

(दोन्ही बाजुचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**उपसभापती** : सभागृहाची बैठक मी दुपारी 3.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.23 वाजता 3.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्रीमती सुधा जोशी : माननीय सभापती महोदय, या बिलानंतर अडीच तासाचे अशासकीय कामकाज बाकी आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, या कर विषयक बिलावर सोमवारी चर्चा घेऊन आता अशासकीय कामकाजाला सुरुवात केली तर चालणार नाही का?

श्री. जयंत पाटील : माननीय सभापती महोदय, हे बील संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे यसंदर्भात अगोदर चर्चा चालू होती.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सभापती महोदय, मला बोलण्याची प्रथम आपण संधी द्यावी. आज या ठिकाणी विधेयक क्रमांक 68 मांडले गेले आहे. हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याच्या संदर्भात आम्ही उपसूचना दिली होती. हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यात यावे असा कार्यक्रम पत्रिकेत सुध्दा उल्लेख करण्यात आलेला आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आज या ठिकाणी जे विधेयक मांडले होते त्यावर त्यांनी दोन मिनिटात आपले विचार व्यक्त करुन ते खाली बसले. माननीय मंत्रीमहोदय खाली बसल्यानंतर मी ताबडतोब उठलो आणि आमची उपसूचना, जी कार्यक्रम पत्रिकेत दिलेली आहे ती मांडली. ही उपसूचना मी केवळ दोन मिनिटातच मांडली होती. मी सचना केली की, या उपसूचनेचा प्रथम निर्णय घ्यावा व त्याचा निकाल लागल्यानंतर मुळ विधेयकावर चर्चा घ्यावी, एवढे बोलून मी खाली बसलो. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब उभे राहिले. माननीय रावते साहेबांनी सुध्दा या विधेयकावर चर्चा केली नाही. हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यात यावे अशी सूचना केल्यानंतर ते खाली बसले सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब खाली बसल्यानंतर सन्माननीय मंत्रीमहोदय उभे राहिले व त्यानी माहिती दिली. आतापर्यंत जे घडले ते मी आता आपल्याला सांगितले आहे व त्यानंतर काय घडले याची आपल्याला पूर्ण माहिती आहे. त्यामुळे आमची मागणी एकच आहे की, आम्ही जी उपसूचना मांडलेली आहे त्यावर प्रथम निर्णय घ्यावा. या विषयावरील चर्चा थांबलेली आहे त्यामुळे आता आपण मतदान घ्यावे व त्यानंतर पुढील कामकाजाला सुरुवात करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकाला माननीय सरपोतदार साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब तसेच मी सुध्दा हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याच्या संदर्भात उपसूचना दिली होती. हा विषय सुरु झाल्यानंतर मी मिटिंगसाठी काही वेळ बाहेर गेलो होतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.पांडुरंग फुंडकर..........

हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे अशाप्रकारची उपसूचना दिली. हे विधेयक संयुक्त समितीकडे का पाठवावे यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी विवेचन केले. त्यानंतर माननीय वित्तमंत्र्यांचे उत्तर देखील झाले. हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावयाचे किंवा नाही हे मतास न टाकता, दोन्हीवर एकत्रित चर्चा करुन मग मतास टाकावे अशी प्रोसिजर नाही. विधेयक मतास टाकण्याची मागणी झाली व चर्चा मध्येच थांबली, उपसूचना मताला टाकून मगच या विधेयकावर चर्चा करता येईल, अशी आमची सूचना आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा आहेत. शासनाच्या वतीने एखादे विधेयक मांडण्यात येते त्यावेळी प्रथम मंत्रिमहोदय ते विधेयक मांडण्यासाठी उभे राहतात......

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, सभागृहात जी घटना घडली त्यावेळी आपण तालिका सभापती म्हणून सभागृहाचे कामकाज पाहत होता.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मूळ विधेयक मांडण्यात आल्यानंतर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याची उपसूचना करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी याबद्दल त्यांची मते मांडली. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे तालिका सभापती म्हणून कामकाज पाहत होते. त्यांनी मला सांगितले की, उपस्थित झाल्याचे मुद्यांचे मी स्पष्टीकरण करावे. त्यानुसार मी माझे स्पष्टीकरण करीत होतो. अजून माझे स्पष्टीकरण पूर्ण झालेले नाही.....

( अडथळा )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : मी चौथ्या कलमापर्यंत आलो होतो. माझे स्पष्टीकरण अजून पूर्ण झालेले नाही. मध्येच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते उठून उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, मेरिटवर चर्चा करु नये. अजून मी मेरीटवर बोललो नाही......

**उपसभापती** : पहिली गोष्ट अशी की, याठिकाणी जे काही घडले त्याबाबतची चर्चा मी ऐकली आहे. आपण नियमाप्रमाणे कामकाज करायचे म्हटले तर आजचे शासकीय कामकाज सकाळी 10.30 ते दुपारी 3.30 पर्यंत पूर्ण करायचे होते. त्यानंतर अशासकीय कामकाज पूर्ण करायचे होते. आता या विधेयकावर चर्चा सुरु आहे, परंतु त्यावर काही मतभेद झालेले दिसतात. तेव्हा मी या विधेयकावरील चर्चा येथेच थांबवित आहे. आता हे विधेयक पुढील आठवडयातील सोमवार किंवा मंगळवारी घेण्यात येईल.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुढील दोन दिवसांत या विधेयकाचा चांगला अभ्यास करता येईल. त्यांचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर ते त्यांची उपसूचना मागे घेतील अशी माझी खात्री आहे.

( अडथळा )

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझे अजून स्पष्टीकरण झालेले नाही. पुढील दोन दिवसांत सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाचा अभ्यास केल्यावर ते त्यांची उपसूचना मागे घेतील अशी मला खात्री आहे......

( अडथळा )

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : माननीय विरोधी पक्षनेत्यांना व माननीय श्री.रावते साहेबांना या बिलावर अजून अभ्यास करावयाचा असेल, त्यासाठी आपण त्यांना 2-3 दिवसांचा वेळ देऊन मंगळवारी हे बिल घ्यावे. माननीय श्री.रावते साहेबांनीच त्यांच्या भाषणात सांगितले की, या बिलाच्या बाबतीत आम्हाला अभ्यास करण्यास वेळ मिळाला नाही. त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 17 जुलै, 2006 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 55 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 17 जुलै, 2006 रोजीच्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही